स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १२८




# मराठवाड्यातील आधुनिक कविता.

REFBK-0005855

लेखक :—
कृष्णाकुमार एम्.

किंमत १॥ रुपया

मराठवाड्यांतील

# आधुनिक कविता.

स. नि ५५७
९२८

REFBK-0005855

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. ९(५५
मुंबई शाखा (स्थापना)

लेखक :-
कृष्णाकुमार एम्. ए.
'उषा' लघुकथा संग्रहाचे कर्ते

प्रकाशक :—

ग. ना. अंबेकर

गोदावरी प्रिंटिंग प्रेस नांदेड

× × ×

एप्रिल १९३२

मुद्रणस्थळ :—

गोदावरी प्रिंटिंग प्रेस नांदेड.

क्रम

- कोरेकल.
- दत्तकिंकर.
- पद्माकर.
- महाजन.
- गाडगीळ.
- दीक्षित.
- नांदापूरकर.
- मनाठकर.
- मुकुंद
- पार्थिव.
- पोहनेरकर.
- कृष्णाकुमार.
- कांत

बहुतेक लेख

'**निजामविजयांतून**' आले आहेत.

# मराठवाड्यांतील आधुनिक कविता.

या घटकेस मराठवाड्यांत खालील तेरा कवि प्रमुख आहेत. (१) कोरेकल, (२) महाजन, (३) दत्तकिंकर, (४) गाडगीळ, (५) मनाठकर, (६) पद्माकर, (७) नांदापूरकर, (८) बेदरकर, (९) कृष्णाकुमार, (१०) कांत, (११) पार्थिव, (१२) पोहनेरकर, आणि (१३) दीक्षित हे ते कवी होत. साधारणपणें इ. स. १९२० पासून या कवींच्या कविता लोकांच्या नजरेस भरूं लागल्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. यापैकी सर्वांत वयस्कर यशवंतराव कोरेकल आहेत. त्यांचें वय आज त्रेपन्न वर्षांचें आहे. कोरेकल-चा जन्म इ. स १८८५ चा आहे. दत्तकिंकरांचा जन्म इ. स. १८८६ चा आहे. पद्माकरांचा १८९५ व देवीदासराव महाजन १८९६ त जन्मले, श्रीकृष्ण वामन गाडगीळांचा जन्म इ. स. १८९८ तला, दुर्गादयाळ चंडीप्रसाद दीक्षित इ. स. १९०१ मध्यें जन्मले. नारायण

गोविंद नांदापूरकर १९०१ मधले. सीताराम गणेश मनाठकरांचा जन्म १९०२ मध्यें, बिदरकरही त्याच सालांत जन्मले, पार्थिवांचा जन्म इ. स. १९०७ मध्यें, नरहरराव पोहनेरकर १९०८ मधले, कृष्णाकुमारही त्यांच्याच वयाचे, सर्वांत वयानें लहान कांत आहेत. त्यांचा जन्म इ. स. १९१३ मधें झाला. म्हणजे आज त्यांचें वय अवघें पंचवीस वर्षांचें आहे. मराठवाड्यांतल्या कोणत्याकोणत्या जिल्ह्यांतले हे कवि राहणारे आहेत हें पाहण्यासारखें आहे. महाजन, कांत, पार्थिव, कृष्णाकुमार, मनाठकर, व दत्ताकिंकर हे नांदेड जिल्ह्याचे, पद्माकर हे औरंगाबादचे, पोहनेरकर बीड जिल्ह्यांतील परळीचे, नांदापूरकर परभणी जिल्ह्याचे, बेदरकर, गाडगीळ व कोरेकल हे हैद्राबादचे व दीक्षित हे उस्मानाबाद जिल्ह्याचे. म्हणजे या तेरा कवीपैकीं सहा कवी नांदेडच्या वांट्याला आले आहेत. औरंगाबाद, बीड, परभणी व उस्मानाबाद, यांच्या वांट्याला प्रत्येकीं एक एकच कवि आला आहे. नांदेडचा कवीविषयींचा लौकिक फार पूर्वीपासून आहे वामन पंडित, शुकानंद महाराज, कमलाकर सरदेशपांडे, सदानद महाराज, इत्यादींचीच परंपरा नांदेडकर मंडळींनी चालविली आहे, यांत शंका नाहीं.

वरील तेरा कवींच्या कविता म्हणजेच आमच्या प्रांतांतली इ. स. १९२० ते १९३८ मधली आमची संपत्ति होय. इंग्रजी इलाख्याच्या मानानें आमची संपत्ति अल्प आहे यांत शंका नाहीं पण त्यामुळें तिचें महत्व कमी होत नाहीं. उलट गुणानें आमची काव्यें इंग्रजी इलख्यांत प्रत्यहीं निपजणाऱ्या बऱ्याच कवितांपेक्षां सरसच ठरतील.

या सर्व कवींच्या कवितांतून ठळकपणें कोणत्या गोष्टी आपल्या दृष्टीस पडतात? सर्वांत पहिली गोष्ट म्हणजे या कवींनीं आपल्या कवितांमधून प्रगट केलेला स्वभाषेविषयींचा जाज्वल्य अभिमान होय. यशवंतराव कोरेकल म्हणतात.

'कोणी पोहति संस्कृतार्णवीं, कुणी हिंदी नदीमाजिंही
बंगाली मधु, रम्यशी उपवनें जो रंजवीती तिही
भाषा आंध्रहि, कोणी गुर्जर गणी कर्नाटकी सोज्वळा
सर्वाधिक्य अशी गमेहि भुवनीं माझी मराठी मला

यशवंतराव कोरेकल हे फारशी व उर्दूचे अभ्यासक असून उर्दू भाषेंतील ते एक उत्कृष्ट कवी आहेत. बरेच दिवसांपर्यंत त्यांचें लक्ष उर्दू भाषेमध्येंच कवित्व करण्याकडे होतें पण त्यांना मराठींतून कवित्व करावें अशी इच्छा झाली.

'कुणी तरि म्हणे असें किंतिक आज राष्ट्रें जगीं
सुभाग्य-तरि आजही म्हणवि हें महाराष्ट्र कीं
तिथेंच तव जन्मही–असुनि मातृभाषा तुझी
जिला विबुध वानिती म्हणविते महाराष्ट्र जी
तुझ्या वरि गमे कृपा स्फुरण देवतेची जनीं
तदीय यश गाइ रे सतत तें स्वभावेंतुनी '

असें यशवंतराव म्हणतात. कृष्णाकुमारांच्या खालील ओळी पहा.

'मराठवाणी जाते तुमची आज लयाला ती इथलीं
सेवेमाजी जिच्या लेखणी आणिक काया ही झिजली'

—फटत्कार पान २१

कांतांच्या ओळी पहा:—

मात तुझ्या गोड दुग्धामृताची, सवे आमुची तोडल्यापासुनी
तूझ्याच दुग्धावरी मायभाषे, आम्ही वाढलों पोसलो आननीं

कवि गाडगीळांचे उद्‌गार पहा:—

'माझे ज्ञानेश्वर, माझा तुकाराम, माझे रामदास, माझा शिवाजी,

माझे टिळक, माझा महाराष्ट्र - असें म्हणतांना माझें हृदय अत्यंत उचंबळून येतें माझ्या मायबोलीचा तरी मला केवढा अभिमान वाटतो! मला कोणी मायबोलीचा पाईक म्हटलें कीं माझ्या अंतःकरणाला आनंदाच्या गुद-गुल्या होतात आणि आकाश अगदी ठेंगणें होतें.' ( यशवंत अंक ९८ वा; लेख "चाळीसावें वर्ष" )

महाजनांचे उद्‌गार पहा:—

"अमृतास जी पैजा जिंकी
कांजीहुनि ती आज कां फिकी
म्हणवील कोण तरि पुत्र जन्मुनी
तिजला 'माता धन्या'"

या कवींचें दुसरें वैशिष्ट्य म्हटलें म्हणजे ज्या गोष्टींमुळें मराठी काव्याला आधुनिकपणा प्राप्त झाला आहे त्या गोष्टी या कवींच्या काव्यां-तूनहि दिसून येतात. सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, मध्ययुगीन मराठी काव्याचें वैशिष्ट्य ईश्वर गुणगानांत, पौराणिक देवदेवतांच्या कथानक वर्णनांत, व अध्यात्मानुभव निवेदनांत होतें. अर्थातच त्या काळीं सुद्धां शाहिरी वाङ्मय समाजाच्या गरजा भागवीत होतें हें नाकबूल करतां येत नाहीं. पण एकंदरीत पाहतां मध्ययुगीन मराठी काव्याचें वैशिष्ट्य वरील प्रमाणें होतें यांत शंका नाहीं. अर्वाचीन कवीचें लक्ष्य अध्यात्मा कडून हळुहळू निघून समाज, देश, निसर्ग व व्यक्तींचें विचार, भावना, आकांक्षा इत्यादिकडे वेधलें आहे म्हणून आधुनिक काव्याचें वैशिष्ट्य हेंच आहे, असें म्हणतां येईल. अर्थात् हा बदल हळुहळू होत गेला आहे. भावनेची उत्कटता ही दोन्हीं युगाच्या कवींमधून सारख्या प्रमाणांत दिसून येते पण विषय निराळे आहेत. आमच्या मराठवाड्यांतसुद्धां हा बदल होत गेला आहे. हंसराज ( १७९८–१८५५ ) विष्णु कवी

माहूरकर ( मृत्यु शके १८२६ ) सदानंद महाराज उमरीकर ( १८३८-१९२४ ) व सध्यां विद्यमान असलेले संतश्रेष्ठ दासगणू यांनीं संत वाङ्मयाची परंपरा आतांपर्यंत आणून सोडली आहे. पण वाङ्मयध्येयांत फरक आमच्या येथें साधारणपणें १८९० पासून सुरू झाला व तोंडेवाले यांनीं नोकरीवर कटाव रचून व इतर सामाजिक विषयावर कविता करून मराठवाड्यांतील अर्वाचीन कवितेचा पाया घातला. अर्थात् इंग्रजी इलाख्याच्या मानानें हें फार उशीरा घडून आलें. महाराष्ट्रांत इ. स. १८१८ हें साल महत्वाचें आहे व अर्वाचीन युगाला सुरवात त्याच सालापासून झाली असें समजण्यांत येतें. कारण त्याच वर्षी पेशवाई जाऊन इंग्रजी राजवटीला सुरवात झाली व नवीन विचार, नवीन ध्येयें व नवीन आकांक्षा ही नवीन शिक्षणाच्या मागोमाग धावरूं लागली. पण इ. स १८१८ हें साल मराठवाड्याच्या दृष्टीनें निरर्थक ठरतें; कारण आमच्या येथें एकच राजवट अविच्छन्नपणें चालत आली आहे. त्यामुळें पूर्वकाल, यवन काल, शिव काल, स्वराज्य काल व इंग्रजी काल, असे आमच्या वाङ्मयाच्या इतिहासाचे कालखंड पाडतां येत नाहींत. पाश्चात्य संस्कृतीशीं व तत्प्रणीत विचारांशीं मराठवाड्याचा संबंध फार उशीरा आला व त्यामुळें आमच्या वाङ्मयांत व इंग्रजी इलाख्यांतील वाङ्मयांत पन्नास वर्षांचा फरक पडला आहे. हैद्राबादेंत इंग्रजी शाळेची स्थपना इ. स. १८३४ मध्यें प्रथम झाली. आणि निजाम कॉलेजची स्थापना होण्यास अजून चाळीस वर्षें लोटावीं लागलीं. त्याच सुमारास औरंगाबादेंत प्रथम हायस्कूल स्थापन झालें. या गोष्टीमुळें शिक्षणाचा प्रसारच मुळीं उशीरा झाला. महाराष्ट्रांत आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते म्हणून जी मंडळी पुढें आली त्यांचा आधुनिक शिक्षणाशीं कोणत्याना कोणत्यारितीनें संबंध आला होता. तो प्रकार मराठवाड्यांत घडून आला नाहीं व आमच्या येथें अर्वाचीन काव्यास

सुरवात साधारणपणें इ. स. १८९० त झाली. व वाङमयांत आधुनिक-पणाची झांक येण्यास इ. स. १९२० साल उघडावें लागलें.

श्री. महाजन, पद्माकर, दासगणू इत्यादि कवींच्या काव्य संपत्तीचा उगम कीर्तन व्यवसायांतून झाला असला पाहिजे. कोरेकलांच्या काव्यांत अध्यात्माची झांक इतकी मारते कीं, ते मनानें संतवर्गकालीन वातावरणांतच वावरताहेत असें वाटतें. पण या सर्व कवींचा महाराष्ट्राशीं या ना त्या कारणानें संबंध आल्यामुळें सामाजीक, राष्ट्रीय, लौकिक व निसर्गपर विषयांकडे त्यांचें लक्ष वळलें. शिक्षणापेक्षां सामाजीक दळणवळणाचाच परिणाम आमच्या आधुनिक काव्यावर झाला आहे. आमच्या तेरा कवींपैकीं अवघे तीनच कवी विश्वविद्यालयांचे पदवीधर आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे. अव्वल मराठी वाङमयांत सुद्धां विश्वविद्यालयीन पदवीधरांचें वाङमयीन कार्य अपेक्षेप्रमाणें मुळींच झालें नाहीं, हें श्री. जोशांनीं आपल्या आढाव्यांत उत्कृष्टपणें दाखविलें आहे. पद्माकर, महाजन, दीक्षित, कांत वगैरे मंडळीची कामगिरी कोणापेक्षांही कमी नाहीं. यावरून असें वाटतें कीं, इंग्रजी शिक्षणापेक्षां महाराष्ट्राच्या व मराठवाड्याच्या सामाजिक दळणवळणांतच आमच्या आधुनिक वाङमयाचें वैशिष्ट्य शोधावें लागेल.

तरी पण आमच्या वाङमयांत अजून अध्यात्मिकतेची झांक बरीच आहे. कोरेकल, महाजन, पद्माकर, दत्तकिंकर व गाडगीळ हे कवि १८८५ ते १९०० या कालांत जन्मले आहेत. कोरेकलांच्या निम्याच्यावर कविता ईश्वरवर्णनपर आहेत व त्यांच्या एकंदर काव्यावर वेदांताची दाट छाया पसरली आहे. देशभक्तीवर कविता जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल प्रणयपर कवितांचाही अभावच आहे. विनोददृष्टि पण नाहीं. रचनेंत शिथिलता, सुटसुटीतपणाचा अभाव हे दोष श्री. चाफेकरांच्या नजरेंत

ठळकपणें भरले. पण करिकलांनी निव्वळ आध्यात्मिक विषयावरच कविता केल्या नाहींत तर इतर विषयहि त्यांनीं हाताळले आहेत. निसर्गाकडे त्यांची दृष्टि आहे. जनरीती, सामाजिक विषय वगैरे त्यांच्या दृष्टिपथांत आलेले आहेत. श्री. दत्तकिंकरांच्या कवितांतूनहि-एका प्रेमळ, कळवळीच्या तळमळणाऱ्या भक्तकवीची उत्कटता दिसून येते. ऐतिहासिक व्यक्तींच्या गुणवर्णनांत व चहा तंबाखू सारख्या व्यसनाच्या निषेधपर कवितांत दत्तकिंकरांच्या कविता अलीकडील वळणाच्या वाटतात. पद्माकरांच्या कविता निसर्गवर्णनपर आहेत; पण आध्यात्मिकतेकडे व वर्णनाकडे त्यांची ओढ सारखीच असून त्यांचें मन द्विधा झाल्यासारखें वाटतें. श्री. गाडगीळांच्या सारखा पट्टीचा Subjective (आत्मनिष्ठ) कवी अद्यापि आमच्याकडे झाला नाहीं. घरगुती भावनांना काव्याची योग्यता देणारे गाडगीळ हे आमचे पहिले कवि आहेत; पण इतर लौकिक विषयाकडे त्यांचें विशेष लक्ष नाहीं. श्री. महाजनांच्या कविता पंडिती थाटाच्या आहेत पण 'मातृहृदय' 'सिंहगड' इत्यादि कवितांतून त्यांचें सुधारणाप्रवण मन दिसून येतें; पण पौराणिक विषयाकडे व वेदांताकडे त्यांची आवड आहे. निव्वळ आधुनिक म्हणतां येतील असे कवि म्हणजे दीक्षित, मनाठकर, कृष्णाकुमार, कांत, बेदरकर व पार्थिव हे होत. त्यांतल्या त्यांत कांतांच्या कवितांतून बंडखोरीचा संदेश आहे. कृष्णाकुमार Rationalism चा पुरस्कार करतात व दीक्षित राष्ट्राला ध्येयाची निश्चिती करण्याचें सांगून क्रांतीचा मंत्र प्रतिपादितात.

आतां निरनिराळ्या विषयांबद्दल यांचे काय विचार आहेत तें पाहूं. कवींच्या योग्यतेबद्दल व कामगिरीबद्दल निरनिराळ्या कवींचे निराळे विचार आहेत. महाजन म्हणतात -

मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

" काव्यासवें पूर्ण तादात्म्य पावें, तया नाठवे काव्यकर्ता कवि
आर्धीच तो काव्यरूपें नटोनी रसांची रसज्ञास दावी चवी "

म्हणजे कवि हा रसांची रसज्ञास चव दाखविणारा मर्मज्ञ होय. अशी कवीची व्याख्या केली आहे. कोरेकल कवीवर यापेक्षांहि मोटी जबाबदारी टाकतात. कवि पद्माकर ' कवीस ' या कवितेंत म्हणतात.

" कशास कविता हवी कविवरा! तुझी संप्रती ?
अचेतन शवास जी न नव जीवना देइ ती
मृतापरि जगीं जिणें जरि न जाइ तें भालिचें
न मोल कवडीहुनी अधिक ये तुझ्या वाणिचें "

तसेंच दुसऱ्या एका कवितेंत पद्माकर म्हणतात,

" जाणुनि त्यांच्या दुःखातें
सांगा उपाय तुम्हि त्यांतें
ना तरि कर्तव्य—चुकला—कवि रायांनों! या कालां "

दत्तांकिकरांची कवीविषयी कल्पना खालील प्रकारें आहे —

' कोणतीहि कविता किंवा लेख इत्यादि वाङमय निर्माण करावयाचें तर त्यापासून वाचकांस कांहीं तरी तत्वज्ञान मिळून त्यांचे कल्याण झालें तरच त्याचें सार्थक होय असें मला वाटतें. '

कवि पोहनेरकरांच्या मतें कवीचें काम

' ऐश्वर्य हें जगाचें कवि सार्वभौम त्याचा
अपुल्या मृदूकरांनीं खुलवी रवी फुलांना
ठावें जगीं कुणाला कवि जाणता तयाचा
मधु गंध तो फुलांचा भ्रमरा कळावयाला '

म्हणजे सृष्टिचें गुपित उलगडून दाखविणारा तो कवि अशी पोहनेरकरांची कल्पना दिसते. श्री. गाडगीळ म्हणतात.

## — प्रास्ताविक

'मानवी अंतर्मनाच्या ऐश्वर्याचें सौंदर्य व निसर्गांतील अथवा विश्वांतील मूर्त आणि अमूर्त सौंदर्य हें कवि, म्हणजे सारस्वत सेवक आणि शास्त्रज्ञ आपापल्या परीनीं शोधून काढीत असतात आणि त्या सौंदर्यास वाणीच्या साह्यानें अगर अन्य साधनांनीं पार्थिव रूपही देत असतात.'

एकंदरींत पाहतां आमच्या कवीमंडळींनीं कवीच्या शक्तीबद्दल केशवसुतासारखी अवास्तव कल्पना करून घेतलेली दिसत नाहीं. कवि हा सृष्टिसौंदर्याचा मर्मज्ञ रसिक आहे, त्याला निसर्गाची गूढ तत्वें उकलण्याची शक्ति आहे व तो तीं तत्वें रसिकांसमोर मांडतो हीच भावना दिसून येते. बरें यांत त्यांचा उद्देश काय? तर गाडगीळांच्या मतें मनाच्या आनंदाकरितां तो करतो. पण दत्तकिंकरांच्या मतें लोकांना सन्मार्गावर आणणें हें त्याचें कर्तव्य असतें व पद्माकरांच्या मतें चेतना उत्पन्न करण्याचें कवीचें काम असलें पाहिजे. हेंच मत पोहनेरकरांचें हि आहे.

> तुणतुण्याच्या तारेनें त्या हृदये भर भरूं दे
> वीरवरांच्या बंदबंदिचे आज फिरुनि तुटूं दे

असें ते म्हणतात. गाडगीळांची भूमिका भावकवीची आहे, दत्तकिंकरांची प्रचारकाची आहे नि पोहनेरकरांची शाहीराची आहे. तिन्हीं भुमिका आपापल्या परीनें बरोबर आहेत. भावनांची उत्कटता असल्याशिवाय जीवंत काव्य निपजणें अशक्य. मानवाचें व समाजाचें जीवन ज्यांत चित्रित असेल, तें काव्य समाजनिष्ठ होय. व ज्या काव्यांत स्वतःचे भाव चित्रित आहेत तें काव्य भावानिष्ट होय आपल्या मराठवाड्याच्या कवितेंत समाजाचें व मानवी जीवनाचें प्रतिबिंब पडलें आहे काय? याचाच एक भाग म्हणजे, प्रादेशीक उल्लेख आमच्या कवितांतून आढळून येतात काय? या बाबतींत रसिकांची तीव्र निराशा झाल्याशिवाय राहत नाहीं. कांतांच्या कवितेंतील गोदावरीची स्तुति, दीक्षितांची 'मराठवाडा' हा कविता

## मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

गाडगीळांची अलीकडे प्रसिद्ध झालेली निजामसागरावरील कविता, नांदापूरकरांची '.पूर्णाकांठीं ' ही कविता, ही दोन चार उदाहरणें सोडून दिल्यास मराठवाड्याविषयीं कांहींच उल्लेख आमच्या कवितांतून आढळत नाहींत. नाहीं म्हणावयास मनाठकरांचें ' जानकी काव्य ' हें या विधानाला अपवादभूत आहे. त्यांतील निसर्गवर्णनें व गांवांचे उल्लेख हदगांव तालुका जिल्हा नांदेडचे आहेत, व समाजस्थिति हुबेहुब मराठवाड्यांतली आहे याबद्दल मनाठकरांचें अभिनंदन केलें पाहिजे; पण इतर कवींनीं या बाबतींत अक्षम्य अपराध केला आहे यांत शंका नाहीं. महजनांनां सिंहगड पाहून कवित्व सुचावें, पण नांदेड व तेथें निजलेला महात्मा गुरु-गोविंदसिंह यापासून स्फूर्ति होऊं नये यापेक्षां आमचें दुर्दैव कोणतें. कां मराठवाड्याला स्वतंत्र अस्तित्व नाहीं, कां त्यांत स्फूर्तिस्थळें नाहींत, कां याचा इतिहास रोमहर्षक प्रसंगांनीं भरलेला नाहीं? ज्ञानराज व त्यांचे बंधू मुकुंदराज, दासोपंत, एकनाथ, वामन पंडित, अमृतराय, रामदास, हंसराज इत्यादि महाभागांनीं आपल्या चारित्र्यानें ज्याला पुनीत केलें, यादव राजे, शहाजी राजे, मलिकंबर, निजाम शहा, विठ्ठल सुंदर, रावरंभा इत्यादि वीरांची जी कर्मभूमि होता, आंब जोगाई, तुळजापुर, बांसर, अंबड, औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ, घृष्णेश्वर इत्यादि देवस्थानें आमच्या राष्ट्रीय जीवनाचीं प्रतीकें म्हणून जेथें उभीं आहेत, देवगिरी, परंडा, धारूर, इत्यादि ठिकाणचे किल्ले ज्या प्रांताचा इतिहास आपल्या मुखांनीं सांगत आहेत, उद्गीर व राक्षस भुवन, असई व परंडा येथील रणक्षेत्रें जेथें अजून अभ्यासकांच्या मनांत विचारांचे हलकल्लोळ उडवून देतात, त्या मराठवाड्याच्या अलीकडील सुपुत्रांना या देशाच्या गतेतिहासाची आठवण सुद्धां होऊं नये व पोहनेरकरांसारख्यांनीं.

' थाप डफाची पुन्हां घुमवि तूं साऱ्या भीमथडी '

असें उद्‌गार काढावेत व भीमथडीपुढें त्यांना गंगथडीची आठवण होऊं नये यापरीस आमचें दुर्दैव कोणतें. या वरील कारणामुळें मराठवाड्याच्या गतेतिहासाचें, आधुनिक जीवनाचें किंवा भविष्यकालाचें चित्रण आमच्या काव्यांतून अभावानेंच जाणवतें असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. आमच्या काव्याची ध्येयनिश्चिति करण्याची वेळ खचित आलेली आहे. मराठवाड्याला रास्त संदेश फक्त श्री दुर्गादयाळ दिक्षित यांनी दिला आहे. ध्येयनिश्चितिची आवश्यकता व क्रांतीच्या मार्गाचा पुरस्कार हे ते दोन संदेश होत.

पण प्रादेशिक उल्लेख रास्त आले नसले तरी आमच्या कवींच्या कवितांतून सामाजिक दुस्थितींचें चित्र रेखाटलेलें दिसून येतें. कांत, कृष्णाकुमार, महाजन, दिक्षित, इत्यादि कवि या बाबतींत उल्लेखनीय आहेत. महाजनांचें 'मातृहृदय' हें सामाजिक कवितांत प्रमुख आहे. कांतांचा बंडखोरीचा पुरस्कार, व कृष्णाकुमारांचा दांभिक समाजावरचा प्रखर हल्ला, व दिक्षितांचा रूढि नष्ट करण्याकरितां क्रांति तत्वांचा पुरस्कार ही विचारसरणी आमच्या तरुणांच्या आकांक्षावर व ध्येयावर झगझगीत प्रकाश पाडते. आणि म्हणूनच आमच्या प्रांताचा भविष्य काळ उज्वल आहे. असें आम्हांस वाटते. कृष्णाकुमारांची शेतकऱ्यावरची कविता व कांतांची मजूरावरील कविता या नवीन विचारांच्या द्योतक म्हणतां येतील. मराठवाड्याचें लक्ष स्वतःकडे नाहीं हा आरोप जितका मुद्देसूद आहे तितकेंच बाहेरील घडामोडीकडे आमच्या कवींचें लक्ष चांगलेंच आहे हा सिद्धांत खरा ठरतो.

सामाजिक तत्वज्ञानांतहि आमच्या काव्यांत मतभेद दिसून येतो, सामाजिक विषमता कां आहे यांचें उत्तर कोरेकल व गाडगीळ पूर्व-

जन्मांच्या कर्मामुळें, असें देतात, तर दीक्षितांना हा निवळ योगायोग वाटतो, कृष्णाकुमारांना व कांतांना व्यक्तींचा दांभिकपणा व स्वार्थी वृत्ति यांत आमच्या विषमतेचें कारण सांपडते. ही दूर होईल तर कांतांच्या मते वेडखोरीनें, कृष्णाकुमारांच्या मते नीतितत्वांच्या अस्मानें, दीक्षितांच्या मतें क्रांतीनें व गाडगीळांच्या मतें उत्क्रांतीनेंच होऊं शकेल. कोरेकल सहनशीलेतचा पाठ देतात, तर महाजन कांहीच बोलत नाहींत. तर पद्माकर

"तदा सकल आयका प्रभुची या रवा देउनी
सदा श्रवण, ना तरी कुणि न तारि त्या वांचुनी"

असें म्हणतात. पण समाजांत दोष आहेत. ते दूर झाले तरच आपली उन्नति होऊं शकेल याची जाणीव सर्वांनांच आहे यांत शंका नाहीं. राष्ट्रीय व सामाजिक विषयांकडे वाढतें लक्ष दिलें जात आहे व आमच्या गुणदोषांची प्रखर चिकित्सा होऊं लागली आहे यांतच आमच्या मराठवाड्याच्या काव्याचा आधुनिकपणा दिसून येतो.

बहुतेक कवींनीं निसर्गाकडे दृष्टि वळविली आहे. पण विशेष हृदयंगम कविता पद्माकर व नांदापूरकरांच्या म्हणतां येतील, पद्माकरांना निसर्ग, निसर्ग म्हणून आवडतो, पण महाजनांना तत्वज्ञानाचा संदेश देणारा म्हणून निसर्गाचा उपयोग करून घ्यावासा वाटतो, कोरेकलांना तर जगाकडून फक्त नाशवंतपणाचाच संदेश मिळतो. दीक्षित निसर्गाचा उपयोग सामाजिक दुर्गुणांच्या वर्णनाकरितां कुशलतेनें करतात. नांदापूरकर, गाडगीळ व पद्माकर यांची निसर्गपर काव्ये अकृत्रिम नि हृद्य वाटतात.

ईश्वराविषयीं व परलोकाविषयीं जवळ जवळ सर्वचजणांनीं विचार केला आहे. कोरेकलांच्या कवितावर अध्यात्माचें गाढ आवरण आहे. पण ज्ञानमार्गाचा अवलंब करून त्यांनीं शांति मिळविली आहे असें वाटतें

ज्ञानमार्गाचा अवलंब करून त्यांनीं शांति मिळविली आहे असें वाटतें. गाडगीळांच्या कविता भक्तियुक्त आहेत. नांदापूरकर उदासीन भावानें कर्म करणारे आहेत. श्री. दिक्षित यांना अजून शांतीचा लाभ झाला नसून देवास ते—

" वकील वद पाहिजे प्रभु तुला जरी भेटण्या "

असें विचारतात. पार्थिवांची सुद्धां जवळजवळ अशीच स्थिती झाली आहे. एक कृष्णाकुमार व कांत या गोष्टींचा विचारच करीत नाहींत. बेदरकरांचे ' प्रेमांजली ' व मानाठकरांचे ' जानकी काव्य ' यांचे विषयच निराळे असल्यामुळें, त्यांविषयीं येथें लिहितां येत नाहीं.

आतां काव्यगुणाविषयीं लिहायचें तर प्रसाद व लालित्य हे गुण बहुतेकांमधून दिसून येतात. तरी पण पद्माकर; महाजन, गाडगीळ व कांत यांचीं नांवें या बाबतींत चटकन् डोळ्यासमोर उभी राहतात. कोरेकलांचें वृत्तकौशल्य, गाडगीळांचा हळुवारपणा, पद्माकरांचें निसर्गप्रेम, दत्तार्किकरांची तळमळ, दीक्षितांचा आवेश, कांतांची उत्कटता व पार्थिवांची धीरता इत्यादि गुण नजरेंत भरल्याशिवाय राहत नाहींत.

या सर्व कवींत महाजनांचें व्यक्तित्व वैशिष्ट्यपूर्ण आहे. नांदेडच्या कवींना त्यांच्याकडूनच प्रोत्साहन मिळालें आहे असें म्हणणें वावगें होणार नाहीं. बऱ्याचजणांनीं याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. दत्तार्किकर " महाजन प्रशस्ति " कवितेंत म्हणतात —

" ज्यानें देउनि धैर्यबुद्धि मजला लोकांपुढें आणिलें
शंका दूर करोनिया मज जयें काव्यांगणीं ओढिले
माझा हा नच मित्र, जो गुरु खरा साक्षात् मला वाटला
काव्याचा म्हणूनीच हार विनयें तत्कंठिं मी अर्पिला "

नांदेडचे उदयोन्मुख कवि यादवसुत म्हणतात —

**मराठवाड्यांतील आधुनिक कविता —**

" मदीय कविता–रसा कुशल जो गुरु लाभला
' महाजन ' असा मला तुजमधें दिसूं लागला

ह्याच आदरभाव कृष्णाकुमार, कांत व पार्थिव या कवींनीं व्यक्त केला आहे. या घटकेला तरी महाजन हे मराठवाड्यांतील कविराज आहेत यांत शंका नाहीं.

आमच्या प्रांतांत उर्दू भाषेचें चांगलेंच वळण आहे पण त्या मानानें पाहतां आमच्या काव्यांत उर्दू कवितेचें व विचारांचें प्रतिबिंब फारच थोडे पडलें आहे. कोरेकल व बेदरकर यांच्याच कवितांतून थोड्याबहुत फारशी व उर्दू कल्पना दिसून येतात पण त्या फारच थोड्या. याला कारण आमच्या कवींचा उर्दू व फारशी वाङमयाच्या व्यासंगाचा अभाव होय. पण ही गोष्ट विशेष प्रशंसनीय नाहीं. कारण भौगोलिक परिस्थितीमुळें उर्दू वाङमयाचें व उर्दूनिष्ठ समाजाचें हृद्गत महाराष्ट्रासमोर मांडणें हें आमच्या प्रांताच्या अनेकविध कार्यांपैकीं एक प्रमुख कार्य ठरतें.

चाली व वृत्ताबद्दल मराठवाड्याचा लौकिक उज्ज्वल आहे. श्री. कोरेकलाइतका वृत्तांचा सूक्ष्म अभ्यास उभ्या महाराष्ट्रांत पटवर्धनाशिवाय कुणी केला नसेल. तसेंच मुक्तछंद इत्यादि छंद अजून मराठवाड्यांत रूढ झाले नाहींत व इकडील कवींना त्यांचा प्रचार आवडला पण नाहीं. तसेंच गजलादि परकी वृत्तांचा प्रसारही इकडील मराठी काव्यांत विशेष नाहीं.

एकंदरींत काय आमचें आधुनिक काव्यवाङमय अनेक रीतीनें वैशिष्ट्यपूर्ण आहे. जुन्या वाङमयाची परंपरा अजून चालूं असून नवीन वाङमयाची परंपरा झपाट्यानें रूढ होत आहे. आमच्या प्रांतांतील काव्यवाङमयांत १९२० ते १९३८ चें युग हें संक्रमणयुग आहे. आमची कवितादेवी नवीन ध्येयाकड मार्ग आक्रमण करीत आहे. स्वभाषेचा प्रखर अभिमान, भाषा शुद्ध ठेवण्याविषयींची त्यांची धडपड, समाजोन्नतीबद्दल

त्यांची तळमळ, त्याकरितां त्यांनीं सुचविलेले उपाय व कार्यांत जाणीव-पणाचें अस्तित्व ही आमच्या काव्याची वैशिष्ट्यें होत. हीन शृंगाराच्या कल्पनांनीं व लैंगिक नवमतवादानें आमच्या काव्यावर अजून आक्रमण केलें नाहीं. थोडक्यांत सांगायचें तर आमच्या काव्याची उन्नति निरोगी व शुद्ध मार्गानें होत आहे.

हा आतांपर्यंतचा आढावा झाला. पण पुढचें काय? नवीन कवि उदयास येत आहेत काय? याला अस्तिपक्षीं उत्तर द्यावें लागेल. श्री. फुलारी, हर्सूलकर, यादवसूत, पुरवार इत्यादि नवीन कवि पुढें येत आहेत. गाडगीळ, नांदापूरकर, मनाकठर, महाजन इत्यादिकांनीं बऱ्याचशा कविता लिहून ठेविल्या आहेत. त्या फक्त प्रकाशनाचीच वाट पाहात आहेत. या बाबतींत निव्वळ साहित्य सेवेस वाहिलेल्या एखाद्या मासिकाची उणीव फार तीव्रतेनें भासत आहे. या बाबतींत व्हावे तसे प्रयत्न झाले नाहींत असें आमचें मत आहे. एखादें मासिक निघालें तर इकडिल होतकरू लेखकां-वर मोठे उपकार होऊन एक मोठें राष्ट्रकार्य बजावल्यासारखें होईल. तसेच पुस्तकांच्या प्रकाशनाची एखादी निश्चित योजना आंखण्यांत येणें आवश्यक आहे. म्हणजे गरीब लेखकानां पुढें येण्यास वाव मिळूं शकेल. आमच्या येथें प्रतिभेची वाण नाहीं, पण तिचें चीज झालें पाहिजे.

असो, आमच्या प्रांतांतील १९२० पासून पुढच्या काव्य वाङमयाचा आढावा हा असा आहे. आमची संपत्ति कमी असली तरी तिचें मोल कमी नाहीं हें अगोदरच सांगीतलें आहे. ही संपत्ति कमी असण्याचें कारण काय हेंहि वर आलेंच आहे. आमच्या काव्यवाङमयाचा भूतकाळ उज्ज्वल आहे, वर्तमान ही उत्साहवर्धक आहे. भविष्यकाळहि तसाच राहील हें काय सांगण्यास हवें.!

— कृष्णाकुमार एम्. ए.

## १

# कोरकलांची कविता

**जन्म १२ डिसेंबर १८८५**

विद्यमान कवींत यशवंतराव कोरकल हे सर्वांत वयानें श्रेष्ठ ठरतात. महाजन व गाडगीळ यांनीं चाळीसी ओलांडिली आहे. त्यांच्या खालोखाल पद्माकर येतात. नांदापूरकर, बेंदरकर हे पस्तीसच्या जवळ पास आहेत. सध्यांच्या कवींत कांतच वयानें सर्वांत लहान आहेत. दासगणू हे इंग्रजींतील आहमदनगर जिल्ह्याचे असल्यामुळें मराठवाड्यांतील कवींमध्यें मोडतील किंवा नाहीं शंकाच आहे. म्हणून पन्नाशीच्या जवळ पास असलेले कोरकल हेच आजच्या कवींत वयोवृद्ध ठरतात. त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या कविता संग्रहापैकीं फक्त पहिले दोन संग्रह माझ्यापाशीं आंहेत. पण त्यांच्या काव्याचे पहिले दोन भाग वाचले तर त्यांच्या एकंदर तत्वज्ञानाबद्दल व काव्याबद्दल माहिती वाचकांना मिळूं शकते.

— कोरेकल.

कोरेकलांची आतांपर्यंत काव्यरचना उर्दू भाषेंतून झाली होती. त्यांचे त्या भाषेंतील काव्यसंग्रह प्रसिद्धही आहेत. पण साधारणपणें वीस वर्षांपासून आपल्या मातृभाषेंत काव्यरचना करावी असें त्यांना वाटलें व त्यानीं आपली दृष्टि मराठीकडे वळविली. मातृभाषेचा अभिमान या काल-खंडांत आमच्या बऱ्याच साहित्यिकांत उत्पन्न झाला, पण याला काय कारणें झालीं हा प्रश्न खरोखरीच विचार करण्यासारखा आहे. देशी भाषेंतून शिक्षणाचें तत्व सरकारनें मान्य केल्यापासून आपल्या भाषांबद्दल एकंदरींत अभिमान उत्पन्न झाला व त्यामुळें परदेशी भाषांवरून देशी भाषांकडे व देशी भाषेवरून मातृभाषेकडे आमच्या विद्वानांचें लक्ष वेधलें गेलें. मातृभाषेची आतांपर्यंत उपेक्षा केल्याबद्दल क्षमा मागून आपल्या 'स्फुरणदेवत' या कवितेंत कोरेकल म्हणतात —

" कुणी तरि म्हणे असें ' कितिक आज राष्ट्रें जगीं
सुभाग्य–तरि आजही म्हणवि हें महाराष्ट्र कीं
तिथेंच तव जन्मही–असुनि मातृभाषा तुझी –
जिला विबुध वानिती म्हणविते महाराष्ट्र जी '
तुझ्या वरि–गमे कृपा स्फुरणदेवतेची–जनीं
तदीय यश गाई तूं सतत तें स्वभाषेंतुनी "

पूर्वी कवि उर्दूतून कविता करीत असे परंतु मग त्यानें निश्चय केला कीं,

' वचेन नच त्या पुन्हां चुकुनिही न कीं पाहिले! त्वदीय पदिं एकदां मम सुचित जें असे वेधलें ' मातृभाषेविषयींचा हाच अभिमान कोरेकलांनीं 'माझी मराठी मला ' या कवितेंतून व्यक्त केला आहे ते म्हणतात —

" कोणि पोहति संस्कृतार्णवि, कुणी हिंदी नदीमाजिही
बंगाली मधु, रम्यशी उपवनें जीं रंजवीतीं तिहीं

भाषा आंध्रहि, कोणि गुर्जर, गणी कर्नाटकी सोज्वला
सर्वाधिक्यें अशी गमे भुवनिहीं माझी मराठी मला "

आपल्या कवितासंग्रहाच्या दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत तें म्हणतात.

' या अतुल रत्नभांडाराकडे पाठ करून परक्या गजल चालीच्या कवड्या गोळा करण्याचा व गजलांना बळजबरीनें आपलीशी करण्याचा मोह धरावा व ज्या चालीरीतीस काव्यशास्त्रांत यद्यपि शास्त्रीय एखादें नांव नसलें तरी रूढींतून क्वचित्‌—स्वजातीय नांव सुद्धां आढळतें तिकडे दुर्लक्ष करून बोजड नांव धारण करावें म्हणजे दुराग्रहच नव्हे कां ?........ ' गजल ' या बोजड नांवापेक्षां ' रसना ' हें नांव किती गोड दिसते.

काव्यरचनेंत कवीची मातृभाषेविषयींची अभिमानबुद्धीच कारणीभूत झाली आहे. यांत शंका नाहीं.

कोरेकलांच्या काव्यावर तत्वज्ञानाचा व त्यांतल्या त्यांत अध्यात्मिक तत्वज्ञानाचा पगडा दिसून येतो. त्यांच्या दोन कविता संग्रहांतून एकंदरींत तीनशें अकरा कविता छापल्या आहेत. यापैकीं दोनशेच्या जवळ जवळ कविता अध्यात्मिक विषयावर वा ईशस्तुतीपर आहेत. कवितांच्या निवडीवरून सुद्धां कवीची मनःप्रवृत्ती अजमावतां येते. या तत्वज्ञानप्रधान कविता पाहून हा विचार मनांत येतो कीं, तत्वज्ञान व काव्य हीं परस्पर विरोधी असतांना ज्या काव्यांत तत्वज्ञान जास्त तें काव्य या नांवास पात्र ठरूं शकेल काय ? याचा विचार तूर्त बाजूस ठेवून कोरेकलांनीं आपल्या काव्यांतून जीवनाविषयीं व अध्यात्मिक विषयाविषयीं काय तत्वज्ञान आंखलें आहे हें आपण पाहूं.

कोरेकल हे अद्वैतवादी वेदांती आहेत. हें त्यांच्या कवितांचें परिशीलन करणारांना तेव्हांच समजून येईल. पण त्यांचा वेदांत हा निवृत्तिपर आहे.

प्रवृत्तिपर नाहीं. मनुष्यप्राणी हा विषय वासनेंत गुरफटलेला आहे. त्याला मिळणारी सुखें शाश्वत नाहींत. हीं सुखें अंतीं दुःखाला कारणीभूत होतात. म्हणून त्यानें लौकिक सुखाचें व सुखाच्या विषयाचें सेवन करूं नये. आपलें मन त्यानें प्रभुचरणीं लावावें तरच त्याला चिरशांतीचा लाभ होईल.

सुखाब्धी नर हा परी बुडत शोकाकूपीं कसें
असेल जगिं दुःख, तें विषयवासना वीतसे

तसेंच —

" वाहुनि फलभोगाची पडशी
वारिवरि तोंडघशीं कीं, पडशी
तरिहि विषय सौख्या धडपडशी
दुर्दैवावरि उगि चडफडशी "
जाया, सुत यांच्या ज्या गांठी
जन म्हणती जन्माच्या गांठी
परि होती पथिकांच्या गांठी
प्रेम हि, जोवरि भेटी गांठी

या विषयवासनेमुळें मानवाला पुन्हां पुन्हां जन्म घ्यावा लागतो.

आपल्या ' तत्वपंचक ' या कवितेंत त्यांनीं पांच मूलतत्वें विशद केलीं आहेत. जो सतत वसतो तोच आत्मा खरा आहे. आधीं इच्छा करून मग इच्छित प्राप्त झालें नाहीं म्हणजे 'मनुज मनिं म्हणे "दुःख दुर्दैव योगें "' हा लोभ जेव्हां निघून जाईल तेव्हांच मानवाला मुक्ति मिळेल. चवथें तत्व म्हणजे:—

' ठेवा अद्वैत भावा, निज मनिं ठसवा तो सदा वापरावा
जावा हा भेद तेव्हां जिवाशिव अथवा आपुला वापरावा '

आणि पांचवें तत्व म्हणजे या वृत्ती राहिल्यामुळे मनुष्य ब्रम्हानंद भोगूं

शकतो. हें जग नाशवंत आहे. ' व्यर्थ जगत् नाशिवंत, एकचि सत्य प्रभु आमुचा ' अथवा खरें म्हणायचें तर हें जग जें दिसतें तें सत्यच नाहीं. ही सर्व परमेश्वराची माया आहे. " 'मा' म्हणजे नाहीं, 'या' म्हणजे जी सरळ, अर्थ हा पाही." " मायामय सृष्टी ही ' माया म्हणजे मुळांत जी नाहीं. " " दोराचा सर्प खरा असता तर तो कधीं न आवरता " " स्वप्न दिसे परि कोठें, डोळे उघडोनि पाहतां पत्ता." मग अशा परिस्थितींत माणसानें काय करावें? तर कोरेकल म्हणतात कीं, त्यानें विषयवासना सोडून द्यावी. आयुष्याचा क्षणभर सुद्धां भरंवसा नाहीं. ( क्षण न भरंवसा— पान ६१ भा. २ ) त्यानें गुरुला शरण जावें. कारण—

सद्गुरुवचन मनि रुजतां झटकन्
सुटतिल संसृतिपाशहि सटकन्
ज्ञानपिसारा फुलोनि फटकन्
बावरशिल चिद्गोपी चटकन्

गुरूची ज्यावर कृपा झाली त्याला कोणत्याच गोष्टीचा मोह पडणार नाहीं. ( जीवन्मुक्तानंद लहरी पान १६७ भा. १ ) व मीपणाची भावना त्याच्यामधून निघून जाईल. मनुष्यजन्म जो लाभतो तो पूर्वसंचितामुळेंच कोरेकलांची उत्क्रांतीची कल्पना सुद्धां वैशिष्ट्यपूर्ण आहे. आपल्या ' उत्क्रांति ' या कवितेंत ते म्हणतात कीं, उत्क्रांति हा स्वतसिद्ध असा निसर्ग धर्म आहे. या जन्मीं जे कार्य अपूर्ण राहतें तें दुसऱ्या जन्मांत पूर्ण होतें. उत्क्रांतीनें मानव पूर्ण होतो. व निष्काम कर्मानें पुरुषार्थाचा लाभ होतो. दशावतारांत सुद्धां उत्क्रांतीचें तत्व दिसून येतें मग त्यांचा संदेश मनुष्याला हाच आहे कीं, त्यानें निष्काम रीतीनें कर्म करीत राहावें ते म्हणतात ( होणार तें होऊं दे, पान १२ भा. १ )

— कोरेकल.

" राही पोहत पूर्ण निश्चलमनें द्वंद्वप्रवाहीं मुदें
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होऊं दे "

केरेकलांनीं ईश्वराची निरनिराळ्या शब्दांत स्तुति केली आहे. पण ही सर्व निराकार निर्गुण ईश्वराचीं वर्णनें आहेत. साकार व सगुण रूपाचीं वर्णनें जशीं गाडगीळांनीं किंवा महाजनांनीं केलीं आहेत तशीं कोरेकलानीं केलीं नाहींत. त्यामुळें त्यांच्या वर्णनांत विद्वत्तेचा व गाढ व्यासंगाचा प्रत्यय येत असला तरी चित्तवेधी रमणीयता दिसून येत नाहीं. जवळ जवळ पन्नास कविता ईश्वराच्या स्तुतीवर त्यांनीं खर्ची घातल्या आहेत. तितक्याच कविता मानवाविषयींच्या आपल्या फिलॉसफीवर त्यांनीं लिहिल्या आहेत. त्यांच्या तितक्याच कविता उपदेशपर ( Didatic ) आहेत. ' मनोरमा ' ' वृत्ति ', ' आयुष्य ', ' क्षण न भरंवसा ', ' उलट कामना ', ' कुणी तरी ', ' नम्रता ', ' ध्येय ', ' इत्यादि कविता उपदेशपर म्हणता येतील.

ईश्वरविषयक, मानवविषयक, उपदेशपर कवितांबरोबर कोरेकलांच्या कांहीं कविता गूढ ( Mystic ) या सदराखालीं येतात. ' मुमुक्षु बाळाचा पाळणा ' ' मलाच मी हसलों ' ' षड्पद गायन ' ' चार चांदण्यांच्या रात्रीं ' ' सुपर्णी ' ' कोठील मी कोण मीं ' ' विचारा कुणाला ' इत्यादि कविता या सदराखालीं येतील.

अशा रीतीनें पुस्तकाचा तीन चतुर्थांश भाग आध्यात्मिक व उपदेशपर कवितांत खर्ची पडल्यामुळें कोरेकलांच्या एकंदर काव्यावर रुक्षपणाची छटा आली आहे. तत्वज्ञान हें काव्यविषय होऊं शकतें यांत कांहीं शंका नाहीं. कारण सृष्टींतील मग ती गोचर सृष्टी कां असेना अगोचर मूलभूत तत्वें शोधून काढणें हा तत्वज्ञानाचा मुख्य विषय आहे. काव्याचा मुख्य उद्देश निर्व्याज्य आनंदाची प्राप्ति करून देणें हा आहे. पण या आनंदाच्या

मागें कोणत्याही वर्ण्य वस्तूच्या मर्माचें ज्ञान असतें. हें मर्म जितकें अधिक नि खोल ज्ञात होईल तितका रसिक मनाला आनंद जास्त वाटतो कोणत्याही काव्याच्या मागें जगाकडे पाहाण्याचा विशिष्ट दृष्टिकोन असतो; अथवा असें म्हणाना कीं विशिष्ट कविता विशिष्ट तत्वज्ञानावर उभारलेल्या असतात आणि म्हणूनच कोणत्याहि कवीच्या कवितांचें परिशीलन करतांना अपण त्या कवीचें जीवनविषयक तत्वज्ञान (Philosophy of life) विवेचितों, व त्याची जीवनाकडे पाहाण्याची दृष्टि नि निसर्गाकडे पाहाण्याची दृष्टि काय आहे हें आपण पाहतों. तर तत्वज्ञानांत व काव्यांत विरोध कसा असूं शकेल? तत्वज्ञानाचें काम तत्त्वें शोधून काढणें तर काव्याचें काम त्या तत्वांतून उत्पन्न होणाऱ्या आनंदाचा लाभ शक्य तितक्या मोठ्या प्रमाणावर करून देणें हें आहे. दाजी नागेश आपटे म्हणतात (काव्य चर्चा पान ७९.)

" या प्रमाणें काव्यांत काय अथवा तत्वज्ञानांत काय दोहोंतही मुख्य तीन अवस्था दिसून येतात. वस्तु जात, मग ते स्थूल पदार्थात्मक असो, व स्थूल शद्वात्मक असो हेंच पाहिल्या अवस्थेंत बुद्धीला आनंद देतें. दुसरींत तिच्या आंतील भिन्न भिन्न गूढ विशेषात्मक कल्पनाकडे बुद्धीची धांव असते व अखेर बुद्धि ही त्या कल्पनांत–तत्वात्मक अथवा रसात्मक कल्पनांत—एकतान होते व एक प्रकारच्या लीनस्थितीला पोहोंचतें. अशी दोन्हींचा परंपरा आहे. आनंद हें दोन्हींचें साध्य आहे व बाह्य रूप, तदंतर्गत सूक्ष्म कल्पना व सर्वांतर्यामीं एक तत्व ही तिची सोपानमयी आहे. आणि म्हणूनच उत्तम काव्य हें तत्वज्ञान होतें व उत्तम तत्वज्ञान काव्यात्मक होतें."

कोरेकलांचें काव्य तत्वज्ञानप्रधान आहे असें म्हणणें म्हणजे तें काव्य नाहीं असें म्हणतां येत नाहीं. पण आक्षेप असेल तर तो हाच आहे कीं,

त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि उदासपूर्ण आहे. त्यांचें सारें लक्ष आध्यात्माकडे लागलें आहे. मनुष्यप्राणी विषयांत लोळणारा आहे. जगांतली सर्व सुखें अतीं दुःखकारक आहेत. स्त्री व श्री. या दोन्हीं दुःखकारक आहेत.

'स्त्री, श्री, नारी, लोभें क्षोभें असें' त्यांचे विचार आहेत.

'श्री, नारी, संहारी, सद्बुद्धि संशुद्धी, त्या योगें तो भोगे, आवृत्ती.' असें ते म्हणतात. राष्ट्रपुरुषांचें पाळणें त्यांना सुचत नाहींत तर ते मुमुक्षुचे पाळणें गातात. निसर्गाकडे त्यांची पाहण्याची दृष्टि सुद्धां अशीच उदासपूर्ण आहे. सर्व नाशवंत आहे. शेवटीं सत्य तो परमेश्वरच राहील, जग मिथ्य आहे. जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून वाचणें हें आपलें उद्दिष्ट पाहिजे असें ज्यांचे तत्वज्ञान त्यांच्याकडून सामाजिक नि सृष्टिविषयक घडामोडिच्या चित्रणाची कशी अपेक्षा करावी? निसर्ग त्यांना एकटेपणाचाच व नाशाचा संदेश देतो. 'वासंती' ही कविता फार मधूर व हळवी आहे. कलिकेनें पहिल्या दिवशीं किती आनंदानें कवीशी गोष्टी केल्या.

सांगा आतां हो! कशि दिसत्यें मी आरामी?
माझ्या सौगंधी पवनहि नें उच्चव्योमीं
नक्षत्रें तेथें चमकत रात्रीं जीं होतीं
मत्सौंदर्याच्या मधु संदर्शे होतीं कां तीं?

दुसऱ्या दिवशी कवि गेला तेव्हां ती कळी कोमेजली होती तिनें खोल आवाजांत कवीला सांगितलें.

"झालें मी ऐशी! वदुंतरि कैसे! कां कोणां
विश्वासोनी ज्या वरि बसलें त्यांनीं दैना
माझी ही केली..........

हा माझी आई—इतर अपत्यानंदानें
पाणी ही नाणी लव नयनीं मत्छोकानें
नाहीं कांणी एकहि जगतीं कोणाचाही
जो तो पाहे सौख्यचि अपुलें त्या त्या ठायीं"

त्या नंतर कवि गेला तो तें सुमन मातींत लोळत पडलें होतें.

पण कोरेकरांना निसर्गाकडून मिळणारा संदेश उदासपणाचा असला, तरी त्यांची निरिक्षण शक्ति सूक्ष्म आहे त्यांत शंका नाहीं. त्यांची निसर्ग वर्णनपर काव्ये हीं संख्येनें बरींच आहेत. कल्पना चमत्कृतिजनक आहेत. व मनाला आश्चर्याचे नि आनंदाचे धक्के देतात. 'रंगवल्लिका' मधिल कल्पना किती गोड आहे पहा—

"कुंकुम कारिचें प्रथम सांठलें । नील मिश्र झालें ॥
गुलाबि रंगें गगन रंगलें । गुलाबमय गमलें ॥
हस्तांतिल तीं हळदहि सगळी । कीं निसऱ्या वेळीं ॥
सांडलि तेथूनि इतस्ततः तीं । सगळी रांगोळी ॥
कुणी म्हणो 'हा रविउदयोन्मुख । अरुण राज—आला'
कोणा गमले रंगवल्लिका । काढित महिलाला ॥

प्रिय शोधून आपल्याच भोंवती भ्रांत होऊन सृष्टीकडे पाहून त्यांना नवल वाटतें. ही पृथ्वी सूर्योदयकालीं सुद्धां हंसते आणि सूर्यास्त समयीं मुध्दां तसेंच. सगळें जग वेडानें भरलें आहे. काव्यांत सुद्धां वेड आहे.

पाहोनी नभिं मेघ वृत्त कथणें कीं दूत त्या कल्पणें
रानामाजिं न काय कोण बघणें वृक्षादि आलिंगणें
काया दंडविणें बहूतपरिनें किंवा शबा रक्षणें
दुःखानें विरहीच धारण करी हीं भ्रांतिचीं लक्षणें

असें म्हणून कवीनें मेघदूत, रामायण, कादंबरी इत्यादि वङ्मयकृति

मोठ्या खुबीनें सूचित केल्या आहेत. त्यांच्या कल्पनाही चमत्कृतिपूर्ण असतात —

"नक्षत्रांचा केर नभीचा झेलुनिया ही उषा,
उजळवि बघ या दाहि दिशा.

नक्षत्रांना केर कल्पिनें ही कल्पना अभिनव आहे यांत शंका नाहीं. 'उषा निशा' या कवितेंत सुद्धां हिच कल्पना घेतली आहे.

नाजुक निशि, कण्याद्ध उषा तिज हटवितसे मागें
तिचीं भूषणें कितीक तुटलीं हिरे सर्व गळले
हुडकावे तरी रत्नदीपही विझलेले दिसले
निज माळेंतिल मोती म्हणुनी दीनमुखें मागें
एकहि वच ऐके नच, ढकलित परि– मागें मागें

कोरेकलांच्या निसर्गपर कविता खरोखर आनंददायक आहेत. पण अशा कविताच मुळी थोड्या आहेत आणि ज्या कांहीं उत्तम कविता आहेत, त्या बहुतेक पहिल्या भागांतच आहेत. कारण दुसऱ्या भागांत वृत्तें साधण्याकरितां त्यांनी कवितांचा नि काव्यकल्पनांचा विचका केला आहे.

दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत कवितासंग्रहाचा उद्देश कथितांना कोरेकल म्हणतात.

'काव्यकुसुमकलिका द्वितीय उद्भव या ग्रंथाची रचना, संपूर्ण उपलब्ध वृत्तांतून (मराठी) कविता लिहिण्याचा उद्देश मुळाशीं धरून केली आहे.

म्हणजे वृत्तें कितीं आहेत व कशीं लिहिलीं जाऊं शकतात हें दाखविण्याकरितां कोरेकलांनीं हें पुस्तक लिहिलें आहे. पुस्तक हा शब्द मुद्दाम वापरला आहे. कारण कोरेकलांचा हा कवितासंग्रह रसिकांच्या मेजावर

दिसण्याचा संभव कमीच. त्याउलट व काव्यशास्त्राच्या अभ्यासकाला या पुस्तकाचें महत्व माधवराव पटवर्धनांच्या 'छंदोरचना' या पुस्तकाइतकेंच वाटेल यांत शंका नाहीं. माधवरावांनीं छंदोरचनेचीं तत्वें विवेचिलीं आहेत तर कोरेकलांनीं वाचकांना त्यांचें प्रात्याक्षिक दाखविलें आहे. वृत्तावरील त्यांच्या या गाढ व्यासंगाबद्दल नि प्रभुत्वाबद्दल ते खरोखरीच वृत्तसम्राट या पदवीस पात्र आहेत. त्यांचा मराठी वृत्तविषयींचा नि परकीय नि भेंडगुजरी शद्बांच्या पासून आलिप्त राहण्यांत त्यांनीं व्यक्त केलेला अभिमान खरोखरीच अभिमानास्पद आहे. पण वृत्ताच्या अभ्यासांत त्यांच्या कविता निर्जीव बाहुल्या बनल्या आहेत. कविता कशी कां असेना ती अमक्या अमक्या वृत्तांत बसली म्हणजे झालें. वृत्ताचें समर्थन करतांना निर्यमक व मुक्तछंद कविवर हल्ला करतांना ते म्हणतात

'निसर्ग सुंदर स्त्री अलंकारानें वाईट दिसते असें ज्यांना म्हणावयाचें आहे त्यांनाच वृत्ताच्या योगानें प्रतिभा जखडली जाते असें म्हणणें शोभेल.'

कबूल आहे. पण कोरेकल, वृत्ताच्या अट्टाहासानें प्रतिभेचा लोप होऊन आपली कविता निर्जीव बनली आहे, त्याची काय वाट? व यामुळें आपल्या कविता या ओढून ताणून आणलेल्या चंद्रबळासारख्या वाटतात. वस्त्रें सुंदर खरीं पण ज्यांना त्यांनीं आच्छादिलें आहे त्या बाहुल्या कचकड्यांच्या आहेत, सजीव व सुंदर रमणी नाहींत हें आपल्याला माहीत नसेल असें नाहीं. यामुळें पानामागून पानें उलटलीं तरी कल्पनांचा अभाव नि प्रसादाची आवश्यकता पदोपदीं जाणवते. आपल्या स्वतःच्या 'कवींची बैठक' या कवितेंत वृत्तांच्या पाठीमागे लागलेल्या कवीचें चित्र रेखाटलें आहे. तो कवि दर आठ दिवसाला निरनिराळ्या वृत्तांमधून कविता करीत असे व एक वर्तुळ संपताच पुन्हां वृत्तांचें व्रत धरीत असें. त्या मुळें आठवड्याला त्यांचीं वृत्तें निरनिराळीं असत. तें चित्र कोरेकलांच्या शद्बांत पहा.

" वृत्ताचें व्रत आठ आठ दिवशीं एकेक जो आचरी
एक्या आठवड्यांत जेवि हरिणी, दूजांत पृथ्वी धरी
केव्हां चामर, मालती, ललित, वा मंदार माला कदा
हंसी, तोटक, भद्रिका शिखरिणी मता उमा कामदा ॥ "

आतानें पत्र लिहून त्यांचे स्वतःचें वृत्त विचारिलें तर या कवीनें उत्तर दिलें.

" आतें एक असेंच लिहुनि याच्याकडे धाडिलें
कांहो वृत्त अलीकडे न अपुलें कांहीच आम्हा कळे
चिंता लागलि फार ऐकुनि आम्हा रोगें तुम्ही पीडित
त्याचें उत्तर हा लगेच कळवी 'शार्दूलविक्रीडित' ॥ "

या कवीचा अहेर कोरेकलांना देण्याचा टीकाकाराला मोह होता. निरानिराळ्या वृत्तांतून कविता करून कोरेकलांनीं आपल्या दृढ व्यासंगाचा परिश्रम दिला आहे, परंतु काव्यांना याचा परिणाम जाणवला आहे. त्यांत कोरेकलांनी आणखी एक मजा केली आहे. वृत्ताचें जें नांव तेंच नांव कवितेला द्यावयाचें व त्या विषयावर कविता करावयाची उदाहरणार्थ, स्त्री, मृगी, सती, पंक्ति, वसुमति, विद्युल्लेखा, शशिवदना, सोमराजी, मदलेखा, मधुमति, गजगति, वितान, चारुहासिनी, भुजंग संगता, हलमुखी, मनोरमा, मधुर-सारिणी, अपरांतिका, उपेंद्रवज्रा, ललित, शालिनी इत्यादि जेथें वृत्तनामाच्या अर्थानुरोधानें कवितेचे विषय घेतां आले नाहींत, तेथें श्लोकांत मुद्रालंकार साधण्याचा प्रयत्न त्यांनीं केला आहे पण याचा कवितांवर काय परिणाम झाला आहे हें पहा. 'हलमुखी' हें वृत्ताचें नांव, कवितेचा विषय सुद्धां हलमुखी हा आहे. कुणाला वाटेल कवीनें या विषयाचा किति सुंदर उपन्यास केला आहे नाहीं ! कवीनें कल्पना हीच मांडिली आहे

कीं सद्गुणी मनुष्य एखाद्या हलमुखीबरोबरसुद्धां आनंदानें संसार करूं शकतो. असेल कदाचित, पण स्तुति सद्गुणी मनुष्याची होती, तर कवितेला हलमुखी हें नांव देण्यात काय औचित्य होतें. तीच स्थिति ' विद्युल्लेखा ' या कवितेची. वृत्तही तेंच पण विजेबद्दल कांहीं काव्यमय कल्पना कवीनें प्रगट केल्या नाहींत. त्यानें असें प्रतिपादिलें आहे कीं लक्ष्मी ही विजेसारखी चंचल आहे. पण मग कवितेचें नांव लक्ष्मी न देतां विद्युल्लेखा दिल्यानें वाचणाऱ्यांची दिशाभूल होते. ' शार्दूल ललित ' ही कविता पहा, वृत्त व विषय एकच; कवितेचा भावार्थ असा कीं कवि एकदां बागेंत फिरण्यास गेला. मधेंच त्याला कोणी तरी हटकलें म्हणून तो धांवत घरीं आला. तो बोलवा झाली कीं, पिंजऱ्यांतून सिंह व वाघ सुटले आहेत. त्यांत कवीचें उपरणें फाटून अर्धे राहिलें होतें. हें पाहून कवीला वाटलें कीं, उपरणें फाडणारा व धरणारा वाघच असेल म्हणून कविमुखाची बोबडी वळली

"किंवा तो असल्यास जाहालि पहा गात्रेंहि गलित, याऱ्या या म्हणण्याबरोनि गमते शार्दूल ललित" संध्याकाळीं कविला कळलें कीं, वाघसिंहाला पुन्हां पकडून कोंडून ठेविलें, तो संध्याकाळीं पाहाण्यास बागेंत गेला. तों काय दिसलें,

" कांटेरी झुडुपास तें उपरणें होतें अडकलें
केलें कांहीं जरी न वर्ष भर तें हांसें अवरलें "

आम्हालाही हंसें आवरेना, पण तें कवीचें उपरणें फाटलें म्हणून नव्हें तर शार्दूल ललिताचा असा विचका झालेला पाहून. अशा कविता एक कीं दोन, किती तरी सांगतां येतील. त्यामुळें कोरेकलांच्या कविता म्हणजे सर्कशींतले खेळ वाटतात. त्यांच्या कौशल्याचें कौतुक वाटतें पण त्यानें आनंद वाटत नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं मात्र कल्पना बऱ्या साधल्या आहेत. शालिनी, मनोरमा, शशिकला इत्यादि वृत्तावरून लिहिलेल्या

— कोरेकल.

कविता बहारीच्या साधल्या आहेत. उदाहरणार्थ :—

अनुभव अजुनिहि पटवित शशिकला
जन सुखद धृति कुठूनि शशि शिकला
भर भर भरकति तरि खुलत कळीं

वगैरे कविता रसग्रहणाकरितां, समग्रच वाचल्या पाहिजेत. 'मेघ विस्फूर्जिता' या कवितेतील कल्पना विलासरम्य आहे. मेघगर्जना ऐकून जेव्हां जेव्हां मोर नाचतो त्यावेळीं,

शिरीं त्याची चूडा हलत असतां लाजवी नर्तकीतें
त्याच्या केकाही बिसरविति कीं हावभावादि गीतें
गमे नृत्यालापें मन नच रमे, मेनकाद्याप्सरांचें
बघोनी कौशल्य स्थिति म्हणूनि कीं तो सहस्राक्ष नाचे
असे स्वर्गालाही अवनत करी मेघ दासानुलासी
बघे तो भृत्याला सुरनगरिचा कोण होईल अर्थी'

कोरेकलांनीं खरोखर आपल्या कवितांची निवड कसोशीनें करून त्याचा वेगळा संग्रह प्रसिद्ध करावा अशी आमची त्यांना आग्रहाची विनंति आहे. निर्जीव कवितांबरोबर अर्थगौरवानें पूर्ण व प्रसादपूर्ण असलेल्या कविता मिसळण्यांत आल्यामुळें या कवीवर खरोखरीच अन्याय घडला आहे, व हा कवी रुक्ष आहे अशी कल्पना रूढ झाली आहे. पण एकंदरींत असें म्हणतां येईल कीं कोरेकलांच्या उत्तम कवितांमधून सुद्धां जिव्हाळ्यापेक्षां अर्थगौरवाकडे, प्रसादापेक्षां पद लालित्याकडे, हृदयास आनंद देणाऱ्या भावनांपेक्षा बुद्धीस आनंद देणाऱ्या कल्पनाकडे वृत्ति दिसून येते. त्यांच्या कवितेंत भावना विलासापेक्षा कल्पनाविलास दिसून येतो. हृदयापेक्षां बुद्धिकडे त्यांनीं अधिक लक्ष दिलें आहे. कोरेकलांच्या काव्य दोषासंबंधी चर्चा करितांना श्री. चाफेकर म्हणतात.

मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

"कविवर्य कोरेकल यांच्या कवितेचें स्वरूप ठोकळमानानें म्हणावयाचें झाल्यास पद्यरचनेच्या व विचारप्राधान्याच्या बाबतींत जुन्या धर्तीचें आहे. म्हणजे आतांच दर्शविल्याप्रमाणें बरेंचसें काव्यविषय अध्यात्मपर, चिंतनात्मक लोकव्यवहारप्रदर्शक व नीतिप्रतिपादक असून पद्य रचनाही बऱ्याच अंशीं वृत्तनिबद्ध आहे.......काव्याचा आटोपशीरपणा आणि काव्यांतील मर्मग्राही कल्पना थोडक्यांत व उत्कट रीतीनें संकलित करून व्यक्त करण्याची हातोटी या दोन गुणांचा अभावहि बऱ्याचशा कवितांत जाणवल्यावांचून राहात नाहीं; त्यामुळें कित्येक कवितांचा मूलभूत विषय काव्योत्कट असूनहि केवळ रचनेच्या प्रमाणातिरिक्त प्रदीर्घतेनें त्यास शिथिलता व क्षीणता येऊन, रसिक वाचकांचा फार हिरमोड होतो."

याशिवाय कोरेकलांच्या इतर कांहीं दोषांची चर्चा वर आलीच आहे. त्यांची दृष्टि पारलौकिक गोष्टीकडे लागलेली आहे. ईश्वराच्या स्वरूपाचें चिंतन करण्यांत ते गुंग आहेत जग हें नाशवंत आहे, मनुष्य हा विषयकर्दमीं लोळत पडलेला आहे, स्त्री व श्री या त्याचा नाश करितात. त्यापासून मिळणारी सुखें हीं शाश्वत नव्हेत. खरें सुख तें कीं जें शाश्वत आहे व हें ईशभक्तीशिवाय मिळत नाहीं. यांत गुरुची कृपा आवश्यक आहे. गुरुची कृपा ज्यांच्यावर झाली तो सर्व मोहापासून मुक्त होतो. निसर्गांतलीं दृश्यें रम्य खरीं पण तीं नाशवंत आहेत. संकटांत कोणी कुणाचा सोबती नाहीं. शृंगारिक कविता त्यांनीं लिहिल्याच नाहींत. या अध्यात्मप्रिय कवीच्याकडून शृंगारिक कविता लिहिल्या गेल्या असत्या तरच आश्चर्य. नाहीं म्हणायला त्यांची 'प्रेमाचे बोल' ही कविता वाचून भावबंधन नाटकांतल्या लतिकेच्या "या पिकलेल्या पानांत बराच हिरवटपणा दिसतो बरें कां" या उद्‌गारांची आठवण झाल्याशिवाय राहायची


नाहीं. या अभावाबद्दल प्रकाशक श्री. दीक्षित म्हणतात "विशेषतः शृंगारात्मक काव्य लिहिणाऱ्यांना या कवीनें जो इशारा दिला आहे तो मननीय असून उद्बोधक वाटतो.

"शृंगाराचें कवन रचण्या आज नाहींच काल। तीं तेव्हांची सवय कविनों! काय सोडूनि घाल॥ पाहा आतां पडलि आपुली मायभू संकटांत। त्यागोनिया विदुषि मृदुता तीस देतात हात॥"

पण शृंगारिक कविता त्याज्य ठरविणाऱ्या कवीनें देश प्रीतीनें भरलेलीं कवनें तरी कोठे रचलीं आहेत. एक दोन कविता केल्यानें त्यांच्या कवितांबद्दलच्या आपल्या विवेचनाला बाध येत नाहीं. एका कोकिलेच्या कूजनानें वसंत ऋतूचें आगमन होत नाहींना? असो.

आजकालच्या वाङ्मयांत कोरेकलांचे काय स्थान आहे व आजकालच्या पिढीला त्यांचा काय संदेश आहे? त्यांच्या काव्यशास्त्रावरील प्रभुत्वाबद्दल, त्यांच्या दीर्घ व्यासंगाबद्दल त्यांच्या अध्यात्मपर व विरागी प्रवृत्तीबद्दल मराठवाड्याला कुतूहल व अभिमान वाटेल. छंदोरचनेंतील कौशल्यांत या सव्यसाचीचे हात धरील असा उभ्या महाराष्ट्रांत आज कोण आहे? नियमक व मुक्त छंदाच्या काळांत त्यांच्यासारख्या शास्त्र्याची आज आवश्यकता आहे. पण त्यांच्याविषयीं आदर असून सुद्धां त्यांचा संदेश आजच्या पिढीला समजेनासा झाला आहे, हे नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. भोंवतांली आग पेटली असतां गूढ अध्यात्माचा व ईश प्रीतीचा संदेश आजच्या जगाला पटणें शक्य नाहीं. He is Still listened to with reverence but his words are no longer understood or appreciated असें उद्गार एका प्रसिद्ध पुढाऱ्यानें दुसऱ्या एका वयोवृद्ध पंडित पुढाऱ्याबद्दल काढले आहेत. तें कोरलेकलांना बरावर लागूं पडतील. मराठवाड्यांतील अधुनिक

काव्यवाङ्मयाचें ते गुरु आहेत. वैदर्भीरीतीचा कट्टा पुरस्कर्ता, गाढ वेदांती व तत्वज्ञ, काव्यशास्त्राचा शास्ता व वृत्तसम्राट म्हणून भावी काल त्यांची आठवण आदरानें करील यांत शंका नाहीं. कविसम्राट, नव्हे वृत्त-सम्राट, वाङ्मयप्रांतांतील या पायिकाचा मुजरा आपण स्वीकाराल ना?



२

# दत्तकिंकरांची कविता—

जन्म ४ आक्टोबर १८८६.

नांदेडचे श्रीयुत दत्तात्रय अनंत सराफ कंधारकर यांनीं दत्तकिंकर या टोपण नांवाखालीं आपला कवितासंग्रह प्रसिद्ध करून आज सात वर्षे झालीं. गेल्या पांच पंचवीस वर्षांत त्यांनीं धार्मिक, अध्यात्मिक विषयावर बरींच पुस्तकें लिहिलीं आहेत. 'श्री. पूर्णानंद स्वामीचें चरित्र' 'श्री. शारदा स्तोत्र' 'श्री. तुकाराम महाराज चरित्र' 'धूम्रपान निषेध पद्यावली,' 'मुंबईची मौज,' 'श्री. गोदाष्टक,' 'श्री. सद्गुरु भजनामृत,' इत्यादि स्वतंत्र पुस्तकें त्यांनी लिहिलेलीं प्रसिद्ध आहेत. पुस्तकांच्या विषयावरूनच दत्तकिंकरांचा कल कोणीकडे झुकतो हें दिसून येतें. प्रस्तुत कविता संग्रहांत एकंदरीत सेचाळीस कविता छापलेल्या आहेत. गोभक्ति, धूम्रपान निषेध चहापान निषेध या विषयावरील कवितांनीं त्यांच्या पुस्तकांचा

जवळ जवळ तीन चतुर्थांश भाग व्यापला आहे, त्यांना गोपालनाची जितकी तळमळ लागलेली आहे त्यापेक्षांही जास्त तळमळ चहा पिणाऱ्यांचा व सिग्रेट ओढणाऱ्यांचा निषेध करण्याची लागलेली आहे. या तीन विषयांशिवाय त्यांचे इतर कवितांतील विषय खालीलप्रमाणें आहेत. ईशस्तवन, श्री. सद्‌गुरु प्रार्थना, काव्य देवतेस, अभयदान, मंगल स्वप्न, वेडें जग, भाग्यशाली कोण, अंगाईगीत, फोल तुझा अभिमान, जगद्‌वलोकन, श्रीशिव प्रशस्ति, देवी अहिल्या, मार्ग प्रतिक्षा, लोक वेडे कीं मी वेडा, भगिनी स्मरण, माझें सामर्थ्य, मोठा कोण, खंदा धर्मवीर, आर्यगृहिणी भिकारीण, बळी तो कान पिळी, मना! नको तो अभिमान, यत्न महति, व्यर्थ तो, पुष्पा, श्रेष्ठत्वाचा मार्ग. या कवितांतून गोभक्ति, चहा निषेध व बळी निषेध हे विषय आढळून येत नाहींत. आपल्याला जें कांहीं काव्य पहायचें आहे तें फक्त याच कवितांमधून शोधावें लागेल. कारण चहा गीतांतून किंवा धूम्रपान निषेधांतुन फक्त प्रचारांचाच धूर निघत असल्या- मुळें त्यांत काव्यगुणाचा जवळ जवळ अभावच आहे. दत्तार्किंकरांची भूमिका उपदेशकाची व प्रचारकाची आहे. कविता कराव्या म्हणून ते करीत नाहींत तर त्यांच्या कवितांतून कांहीं तरी तत्त्व निघावें अशी त्यांची इच्छा असते. त्यांच्या बहुतेक कविता उपदेशपर आहेत. "व्यर्थ तो" या कवितेंतून त्यांनीं मानवाचें ध्येय व जीवन कसें असावें हें प्रतिपादिलें आहे. नर देहीं जन्म घेऊन ज्याला ब्रम्हाचा लाभ होत नाहीं, जो ईश्वराचें स्मरण करीत नाहीं, जो अज्ञानपंकांत रुतलेला आहे, संपत्ति असून धर्माकरितां जो खर्च करीत नाहीं, जो विषयमदांत रंगून गेला आहे, जो कधीं संताबरोबर नम्र होत नाहीं त्याचा जन्म व्यर्थ आहे. 'श्रेष्ठत्वाचा मार्ग' या कवितेंत दत्तकिंकर म्हणतात 'पर कामिनीस पाहून ज्याच्या

मनाला पाप शिवत नाहीं व कोणी सती एकांतीं सांपडली तरी जो भाळत नाहीं, जो कधीं सत्य सोडीत नाहीं जो जनहिताकरितां आपलें आयुष्य खर्चीं घालतो तोच श्रेष्ठत्व पावतो. अशा प्रकारचा उपदेश या पुस्तकांत जागजागीं विखुरला आहे. 'खंदा धर्मवीर' या कवितेंत त्यांनी धर्मवीराची व्याख्या केली आहे. ज्याचें लक्ष्य सदा स्वधर्मावर असतें, धर्मत्याग करा म्हणून शत्रूनीं छळ केला तरी जो धर्म सोडीत नाहीं, निरनिराळीं आमिषें दृष्टिसमोर आलीं तरी जो धर्मत्याग करीत नाहीं तोच खंदा धर्मवीर होय असें दत्तकिंकर म्हणतात. पण हा धर्म कोणता, या धर्माचें रूप काय, याची व्याख्या ते करीत नाहींत. त्यांची धर्माची व्याख्या काय आहे कळत नाहीं. पण धर्माचें स्वरूप पालटत असतें. समाजाचें धारण करण्यास सर्वांत उत्तम साधन म्हणजेच धर्म होय व समाजाच्या गरजा व उद्देश बदलत जातात त्या प्रमाणेंच धर्माचें स्वरूप बदलत जातें यांत शंका नाहीं. पण एकंदर कवितांवरून पाहतां दत्तकिंकरांच्या धर्माचें स्वरूप dynamic वाटत नाहीं. त्यांची एकंदर मतें जुनींच आहेत. त्यांची दृष्टि सनातनी आहे. त्यांत त्यांनीं आपल्याकडे उपदेशकाची भूमिका घेतली आहे. भलत्याच ठिकाणीं उपदेशपर प्रवचनें झोडायची त्यांना संवय लागलेली दिसते. 'फोल तुझा अभिमान' या कवितेंत, कवि प्रियेला आपल्या रूपाचा अभिमान धरूं नको म्हणून सांगतो, तिच्या तोंडावर सुंदरांतल्या सुंदर अशा ललनांचीं वर्णनें सांगून शेवटीं कवी म्हणतो

> तुला वाटते मजहुनि सुंदर कोणिच नाहीं जाण
> परि ललने! गे! सत्य सांगतो "फोल तुझा अभिमान"

प्रियेच्या तोंडावर तिची अशी संभावना करणाऱ्या प्रियकराला कोणता 'प्रसाद' प्रियेकडून मिळेल हें वाचकांनींच कल्पावें. चहा व सिग्रेट-

बद्दलहि दत्तकिंकरांनीं उपदेशाचा अतिरेक केला आहे. चहाचा प्रसार अलीकडे बराच झाला आहे. तसेंच सिग्रेटचें सेवनही बरेंच दिसून येतें. फार काय जगांत जितक्या तंबाकूची निपज होते त्याच्या एक चतुर्थांश हिंदुस्थानांत होते. पण म्हणून सिग्रेटभक्तांचा इतका तिटकारा करण्या-सारखें काय आहे. पण 'अशांची संगति नको' यांत ते म्हणतात

गांजा भांग नि मद्य, मांसहि विडी, सिग्रेट जे सेविती
देवा देई न दत्तकिंकर वदे त्यांची मला संगति

तसेंच ते म्हणतात —

बुद्धि भ्रष्ट, शरीरिं कुष्ट करूनी, जी ओष्ठ काळे करी
भासे मिष्टचि, वीर्य नष्ट करि पै, हो पुष्ट कोणी जरी
होती कष्ट न गोष्ट इष्ट म्हणुनि जी शिष्ट ना सेविती
सांगे स्पष्टचि दत्तकिंकर विडी ही दुष्ट आहे अति

'शुक रंभा संवाद' या शिर्षकावरून कुणाला वाटेल कीं, पुराण-कालीन व्यक्तींच्या प्रणय साधनाची कथा आहे म्हणून, पण नाहीं. दत्त-किंकर या कवितेच्या भूमिकेबद्दल म्हणतात.

"निर्व्यसनी शुकदेवास, आपल्या ताब्यांत ओढण्याचा, व्यसनी बन-विण्याचा विडी रंभा पुष्कळ प्रयत्न करिते, पण निश्चयी शुकदेव तिच्या आत्मप्रशंसात्मक मोहक भापणाला न भुलतां गाईचें दूधच तुझ्यापेक्षां श्रेष्ठ आहे असें तिला सांगतो. आणि शेवटीं त्याचा निर्व्यसनी राहण्याचा बळकट निश्चय पाहून विडी रंभा तेथून पळून जाते. असें कथानक यांत गोविलें आहे." ही भूमिका पाहून वाचक आइस्क्रीम झाल्याशिवाय राहत नाहीं. काव्याचा विषय काव्यपूर्ण हवा आणि त्या विषयाचें वर्णन काव्य-पूर्ण हवें. त्या उलट विडीचा व निर्व्यसनी माणसाचा संवाद शुकरंभेच्या रूपानें दाखविला आहे त्यानें रसभंग होतो व उपदेशाचा मनावर कांहींच

परिणाम होत नाहीं. याच धर्तीच्या दोन तीन कविता आहेत. ज्यांना विनोदबुद्धि आहे व ज्यांनीं बरेच दिवस गंभीरपणांत घालविले आहेत त्यांनीं आपली करमणूक करून घ्यावयाची असल्यास या कविता अवश्य वाचाव्या. ' प्रणयभंग ' या कवितेंत ' सद्गृहस्थाच्या सांगण्यावरून विडीसुंदरीचा त्याग केलेल्या पतीस विडी सुंदरीची : प्रार्थना वर्णिली आहे. ' निरोप ' या कवितेंत ' विडीसुंदरीचें दुर्वर्तन पाहून तिचा पति तिला शेवटचा निरोप देतो ' हें दाखविलें आहे. तसेंच धेनु रक्षणाच्या बद्दल दत्तकिंकरांनीं आग्रह धरला आहे. गोवध बंद व्हावा याबद्दलची त्यांची तळमळ कुणालाही समजते व पटते. ते म्हणतात.

' हिंदु धार्मिया पूज्य देवता ' धेनु ' खरोखर आहे '
' दत्तकिंकरा ' असें मान्य, ज्या नसे, हिंदु तो नोहे

श्री. सावरकरांचें अलीकडील लिखाण दत्तकिंकर पाहतील तर त्यांना कळेल कीं गाईला पूज्य न मानतां फक्त उपयुक्त म्हणून समजणारा एक वर्ग हिंदुसमाजांत आहे. पण या प्रश्नाला दत्तकिंकरांनीं कसें हाताळलें आहे पहा. ' श्री. शंकरास धोक्याची सूचना ' या कवितेंत ते म्हणतात कीं हे शंकरा तूं नंदीला जवळ बाळगलेंस पण जननीला ( गाईला ) बाळगलें नाहींस हें तुला योग्य दिसतें काय? पुत्र सुखानें राहावा आणि माता दुःखांत असावी हा न्याय योग्य नाहीं.

व आज आईवर हल्ला होतो पण पुढें ;

' होईल हल्ला नंदीवरती धेनुपुत्र देखुनी
टपति हे दुष्ट मांस–भक्षणीं,
दत्तकिंकरें, काव्य शृंखला ओढुनि ही सूचना
दिली करि मान्य भाललोचना '

अशा प्रचारकी भाटाच्या कवितांनीं दत्तकिंकरांचें पुस्तक व्यापिलें

आहे. दत्तकिंकरांची तळमळ विवाद्य नाहीं पण काव्यविषयांची काव्यपूर्ण निवड व काव्यपद्धतीनें वर्णन करण्यांत ते चुकले आहेत खास. मेळ्यांतील पदांना ज्या अर्थानें कविता म्हणतात त्याच अर्थानें त्यांच्या कवितांना कविता म्हणता येतील. एकंदर कवितांतून त्यांच्या तीन चारच कविता गंभीरपणें वाचतां येतील, या कविता मात्र चांगल्या आहेत. 'देवी अहल्या' 'काव्य देवतेस' महाजन प्रशस्ति, भगिनी–स्मरण या कविता सात्विक नि आनंदायक आहेत. 'भगिनी स्मरण' ही कविता बहिणीच्या मृत्यू-नंतर कवीनें लिहिली आहे त्यांत कवीनें आपलें दुःख जिव्हाळ्यानें ओतलें आहे. तें हृदयस्पर्शी आहे.

संत्तेची ती गेली कोणा भगिनि गणूं कैसी ?
निज धन जावुनि लयास, यावी करीं भीक जैसी

अशा ओळी कवितेंत ठिकठिकाणीं आहेत. 'महाजन प्रशस्ति' या कवितेंत कवीच्या सात्विकतेचा प्रकर्ष झाला आहे. नांदेडचे प्रसिद्ध कवि देवीदास लक्ष्मण महाजन व दत्तकिंकर यांचे संबंध अतिशय निकटचे आहेत व त्यांची मैत्री गेल्या पांच पंचवीस वर्षांपासून अखंड चालत आली आहे. दोघेहि धार्मिक वृत्तीचे, सत्वशील व साध्या राहणीचे भोक्ते. महाज-नांच्या या गुणांवर कवि लुब्ध झाला आहे. दत्तकिंकराबरोबर नांदेडच्या इतर कवींना महाजनांच्याकडून किती स्फूर्ति मिळाली आहे हें मराठवा-ड्याच्या बाहेरच्या वाचकांना कळायचें नाहीं. महाजनांचें व्यक्तित्व अष्टपैलू हिऱ्याप्रमाणें आहे. त्याचें तेज बाहेर पडून तें त्याच हिऱ्याला पुन्हां तेजस्वी करतें. महाजनांच्या शिष्य कवींना जितकी स्फूर्ति मिळाली आहे तितकीच कीर्ति शिष्यांच्या प्रसिद्धीमुळें महाजनांना मिळाली आहे.

दत्तकिंकरांच्या महाजनांवरील ओळी म्हणजे मित्रप्रेमाचा उत्कृष्ट नमूना होय

— दत्तकिंकर

वाणी गोड सदाहि नम्रवचनें लोकांत जो वागतो
ज्याची बुद्धि विशाल, धीट समर्थी, लोकाग्रणी शोभतो,
काव्याचा जणुं मूर्तिमंत पुतळा आला असे भूवरीं
ईशें सद्‌गुण ज्या दिला, तरी कुणा येईल त्याची सरी

तसेंच, —

वक्तृत्वीं कुशल स्वयें प्रकटवी आख्यान रत्नावली
काव्यें रम्य रचूनि तन्मति तशी रामायणीं गुंगली

हे महाजनाविषयींचे दत्तकिंकरांचे उद्‌गार त्यांच्या नितांत प्रेमाचे, हृदयापासून निघालेले बोल आहेत यांत शंका नाहीं. 'देवी अहिल्या' 'महाजन प्रशस्ति,' व 'भगिनी स्मरण' या कवितांच्या मुळें एकंदर कवितासंग्रहाला सात्त्विकतेचें गोड वेष्टण प्राप्त झालें आहे यांत शंका नाहीं. या तीनच कवितांमुळें दत्तकिंकराविषयीं बनलेलें कठोर मत सहानुभूतीच्या जळांत विरघळून जातें.

दत्तकिंकरांच्या एकंदर कविता प्रचारकी थाटाच्या आहेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांची काव्याविषयींचीं मतें त्यांनीं स्वतः प्रस्तावनेंत विशद केलीं आहेत. ते म्हणतात.

'जनतेस सन्मार्गाकडे वळविण्यास आणि गरिबांच्या झोंपडींपासून तों थेट राजाच्या राजमहालापर्यंत प्रवेश करतां येण्याचें सुलभ साधन म्हणजे 'वाङ्मय सेवाच' होय ..........कोणतीहि कविता किंवा लेख इत्यादि वाङ्मय निर्माण करावयाचें तर त्यापासून वाचकांस कांहीं तरी तत्वज्ञान मिळून त्यांचे कल्याण झालें तरच त्याचें सार्थक होय, असें मला वाटतें. या ध्येयास अनुसरूनच मी आपल्या कविता लिहीत असून त्या- पैकींच कांहीं कवितांचा संग्रह वाचकांपुढें ठेविला जात आहे...........

माझ्या सांगण्याचा इत्यर्थ इतकाच कीं कोणत्याहि वाङ्मय सेवकानें—लेखक व कवीनें–राष्ट्राला पोषक व हितकारक असेंच एखादें ध्येय डोळयासमोर ठेवून तत्प्रीत्यर्थ आपलें वाङ्मय निर्माण करावें. '

या उताऱ्यावरून दत्तकिंकरांचें मत काय आहे हें कळतें. कवितेंतून कांहीं तत्वज्ञान निघालें तरच उत्तम. कांहीं तरी ध्येय असलें पाहिजे असें ते म्हणतात. कलेकरितां कला या तत्वाचे ते भोक्ते नाहींत. आतां त्यांच्या कवितांतून काव्यास आवश्यक असलेले गुण आहेत कीं नाहींत हा प्रश्न वेगळा. त्यांच्या कवितांचे विषय गद्यारूपानें मांडले तर दत्तकिंकरांचा उद्देश खालील प्रकारचा आहे हें दिसेल.

बिडी, सिग्रेट व चहा यांचें सेवन अति घातक आहे; सबब या वस्तूंचा त्याग करावा. जीं माणसें या वस्तूंचे सेवन करितात त्यांची संगति मला कधींच नको. हिंदुस्थानांत गोहत्येचें प्रमाण अतिशय वाढलें आहे. शंकरा, तू नंदीला घेऊन खुशाल बसला आहेस. पण या नंदीची आई जी गाय तिची दुर्दशा तुला दिसत नाहीं काय? उद्यां लोक तुझ्या नंदीचा, -धेनु पुत्राचा वध करण्यास उद्युक्त होतील. म्हणून वेळींच सावध हो. तुला सावध करण्याकरितां मी काव्यरूपी शृंखला ( अलार्म चेन ) ओढीत आहे बघ. या जगांत बळी तो कान पिळी हा न्याय चालला आहे. पण पतिव्रता साध्वी आपलें सत्व टिकवितात व अशा साध्वीच कामीं येतात. अहिल्याबाई होळकर वगैरे साध्वींनीं आपल्या आर्यधर्माचें नांव श्रेष्ठ केलें आहे. शिवाजी वगैरे खंदे धर्मवीर गोपालनाकरितां व रक्षणाकरितां लढले. खरा धर्मवीर पाश्चात्य शिक्षण घेऊन आला तरी आपला धर्म सोडित नाहीं. जो गोमातेस पूज्य समजत नाहीं तो हिंदुच नाहीं. जो ईशभक्तींत जन्म घालवीत नाहीं तो व्यर्थ होय. हें जग वेडाच्या मागें लागलें आहे. कुणाला कशाचें वेड आहे कुणाला कशाचें; वगैरे वगैरे.

— दत्तार्किकर

झाले, दत्तार्किकरांना जें कांहीं म्हणावयाचें आहे तें सर्व आलें. हें त्यांनीं कवितेच्या रूपांत मांडलें आहे. त्यांच्या काव्यांत तळमळ आहे पण प्रसाद नाहीं. आग्रह आहे पण आवेश नाहीं, साधेपणा आहे पण रसाळपणा नाहीं, सात्विकपणा आहे पण लालित्य नाहीं. सारांश त्यांची कवितासुंदरी,

"बांधा, नाजुक, ठेंगणी, तरुणशी सच्छील जी देखणी" (पान १९)

अशी असली तरी ती लहान सहान गोष्टींत फार आग्रही आहे. रसिकांतील चहा सिग्रेटच्या व्यसनाकडे पाहून ती आपलें नाजूक नाक मुरडते व त्यांना या व्यसनापासून परावृत्त करणें हेंच आपलें ध्येय आहे असें तिला वाटतें. यापलीकडचे आजकालचें जग तिला दिसत नाही. ती साधी भोळी आहे. संतांच्या चमत्कारावर तिचा विश्वास आहे. रसिक यजमानाचें मन खेचण्याची कला तिला अवगत नाहीं. तिच्या बाह्य रूपानें मुग्ध होऊन येणाऱ्यावर ती वेळीं अवेळीं उपदेशाचा मारा करिते त्यामुळें गार झालेला रसिक तिचा सात्विकपणा कबूल करूनही तिला म्हणतो,

तुला वाटते मजहुनि सुंदर कोणिच नाहीं जाण
परि ललने! गे! सत्य सांगतो "फोल तुझा अभिमान"

दत्तार्किकरांच्या कवितांत मनाठकरांची उत्कटता, महाजनांची प्रसन्नता, गाडगीळांचा हळवेपणा नांदापूरकरांचा अंतर्मुखीपणा, कोरकलांचा गाढ व्यासंग, कांतांचें ओज, कृष्णकुमारांचा आवेश, पार्थिवांचा निर्धार पोहनेरकरांचें कुतूहल व पद्माकरांचा रंगेलपणा यांचा अभाव असला तरी सात्विकपणा हा त्यांच्या कवितेचा आत्मा व आग्रह हा भाव आहे. हें गुलबाशीचें फूल रसिकांत कुतूहल निर्माण करतें पण त्याला जवळ ओढीत नाहीं.

दत्तार्किकरांच्या ध्येयाचा विकास होवो व त्यांच्या कविता आहेत त्यापेक्षांही आकर्षक होवोत हीच इच्छा आहे.

# ३

## पद्माकरांची कविता.

### जन्म २३ एप्रील १८९५

औरंगाबादचे श्री. दत्तोपंत पद्माकर यांचा 'प्रफुल्ल पद्माकर' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्याला आज दहाच्या वर वर्षे होत आलीं व या दशकांत गाडगिळांचें 'माझीं फुलें' महाजनांचें 'महाजनांची कविता' बिदरकरांचें 'प्रेमांजली' कांतादि कवींचें 'पहांटतारा' व 'फटत्कार' नांदापुरकरांचें 'वाग्विलास' कोरेकलांचें 'काव्यकुसुमकालिका' मनाठकरांचें 'जानकी काव्य' इत्यादि कवितासंग्रह आपल्या प्रांतांत प्रसिद्ध झाले आहेत. पण या संग्रहांना जी प्रसिद्धि मिळाली तिचा अल्पसासुद्धां वांटा 'प्रफुल्ल पद्माकर' ला मिळाला नाहीं हें आमच्या मराठवाड्याचें दुर्दैव म्हटलें पाहिजे, कारण गेल्या शतकांतील जितकीं प्रकाशनें लोकांसमोर आलीं आहेत त्यांत तारतम्याच्या दृष्टीनें 'प्रफुल्ल पद्माकर' चाच पहिला

नंबर लागतो हें निर्विवाद होय. आणि दत्तापंतांच्या आयुष्यक्रमाकडे नि उत्कट जीवनाकडे लक्ष्य दिलें तर या कवितासंग्रहाचें वैशिष्ट्य विशेषच नजरेंत भरतें.

'प्रफुल्ल पद्माकरांत' एकंदरींत एकावन कविता आहेत. त्यांत पंधरा-च्या वर कविता ईशस्तुतिपर नि भक्तिपर आहेत. आठदहा कविता निसर्गपर व सृष्टिनिरीक्षणपर आहेत. चार कविता कविसंकेतात्मक आहेत. पांच-सात कविता सामाजिक आहेत नि बाकीच्या विविध विषयांवर आहेत. संग्रह उघडल्याबरोबर ईशस्तुतिपर कविता अगोदर नजरेस पडतात. या दहाबारा कवितांमधून वर्णनें ठरीव ठशांची व ईशस्तुतिपर अशीं आहेत. या कवितांना उद्देशून न. चिं. केळकर म्हणतात —

"पहिल्या बऱ्याच कवितांच्या विषयांची निवड मात्र चांगली वाटली नाहीं." तसें म्हटलें तर कवीच्या निवडीवरूनसुद्धां त्याच्या वृत्तीबद्दल वाचकांना कल्पना येते. पद्माकरांची वृत्ति बव्हंशानें धार्मिक नि भक्तिमार्गी असली पाहिजे, असें या वरील कविता वाचून वाटूं लागतें. पद्माकर हे उत्तमपैकीं कीर्तनकार आहेत आणि त्यांच्या कीर्तनव्यवसायांतूनच त्यांच्या कवितेचा जन्म झाला आहे. आपल्या 'आत्मनिवेदनां'त ते म्हणतात —

'प्रस्तुत कवीस त्यानें अंगीकारिलेल्या कीर्तनव्यवसायास उपयोगी असें जुन्यानव्या सत्कवींचें पद्यवाङ्मय वाचतांनाच काव्यस्फूर्ति झाली असून ती त्याच्या गायनकलेच्या द्वारें व्यक्त झाली आहे.'

कीर्तनव्यवसायावरून त्यांना कविता लिहिण्याची स्फूर्ति झाली व त्याला गायनाची जोड मिळाली. पहिल्या दहाबारा कवितांमधून संतवाङ्मयाचा परिणाम बराच झालेला दिसून येतो.

— पद्माकर

'कृपाकर,' 'कृपानिधी' विबुध सर्वदा वानिती
असें असुनि शोषला तव निधी कसा संप्रती
ध्रूवा अढळ अर्पिलें पद तयास मी योग्य ना
परी अचल ठाव दे स्वपदपंकजीं गुंजना.

असें ते परमेश्वराला आळवितात.

याच देहिं घडणें जरि मोक्ष
आठवा हृदयिं तो कमलाक्ष

'संतभाग्य' या कवितेंत.

संतांची महती वदूं किति जया ते देवही सेविती
ब्रह्माविष्णु तसे महेश अवघे ध्यानीं तयां लागती

'चंचला मति' या कवितेंत, मति हरिचरणीं स्थिर होत नाहीं. याबद्दल त्यांना खेद वाटतो. व ते म्हणतात.

आतां अशी ही किती धांव घेई
कुण्या दुःखगर्तेंत नेई जना ?

नुसत्या संतवाङ्मयाच्या परिणामानें पद्माकरांनीं कवनें रचिलीं असतीं तर-प्रसाद व लालित्य हे गुण त्यांत-या काव्यांत असूनसुद्धां पद्माकरांची गणना जुन्या वळणाच्या नि पसंती घाटाच्या कवींत झाली असती; पण मराठवाड्याच्या भाग्यानें पद्माकरांवर महाराष्ट्रांत वाहणाऱ्या नवविचारांचे इष्ट संस्कार घडून आले. किशोरावस्थेंत व तरुण वयांत त्यांना नाट्यकलेचा नाद लागला व नाट्यदेवीची सेवा करतांना त्यांना महाराष्ट्रांत हिंडावें लागलें. गोड गळा व सौंदर्यदृष्टि या देणग्या त्यांना उपजतच मिळाल्यामुळें नाट्यव्यवसायांत त्यांचा रसिक व नवविचार प्रवर्तक अशा व्यक्तींशीं संबंध आला व यामुळें ते सर्वस्वी संत-कवींच्या आहारीं गेले नाहींत. आधुनिक

## — पद्माकर

मराठवाड्यांतील वाङ्मयसेवकांपैकीं पद्माकर व महाजन हे दोन समकालीन कवि असे आहेत कीं, कीर्तन–व्यवसायांतून व कीर्तनवाङ्मय–परिशीलनांतून आधुनिक धर्तीची कविता करण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली व आमचे हे दोन आदरणीय कवि उत्तमपैकीं कीर्तनकार पण आहेत. नवीन विचारांकडे त्यांना खेचण्यास प्रवृत्त होणारे संस्कार कसे कारण झाले हा प्रश्न खरोखरीच विचारणीय आहे. पण पद्माकरांच्या बाबतींत तरी त्यांच्या संचाराचा व रसिकांच्या गांठी–भेठी नि ओळखींचा परिणाम इतरत्र असला पाहिजे. आधुनिक कवितेच्या बाबतींत ते आपल्याला केशवसुताचे शिष्य म्हणवितात. ' केशवसुता ' स या कवितेंत ते म्हणतात.

" ध्वनि त्याचे उठती हो स्फूर्ती मनिं कवना ये भरती
आठवितो म्हणुनी मत्कवनीं नव गुण शिरिं वंदूनी
देई कविराया! तव शिष्या प्रतिभा कवनें गाया
निर्मिन विश्व नवें जसें हवें सौख्यद मातें बरवें!

तसेंच इतर कवितांमधूनहि ठिकठिकाणीं त्यांची केशवसुताबद्दलची भक्ति प्रगट झाली आहे.

काव्यप्रवाह बघुनी नवजीवनाचा
वर्णूनि केशवसुता कथतेच वाचा!

असें ते म्हणतात. ' काव्य–चर्चे 'तील आपल्या लेखांत त्यांनीं केशवसुतांचा उल्लेख " आपल्या काव्यास स्वतंत्र वळण लावून काव्याच्या नवयुगांत आपला स्वतंत्र नवीन संप्रदाय रूढ करणारे, " अशा शब्दांत केला आहे. पण त्यांच्या सृष्टि नि निसर्गपर कवितांवर व सामाजिक कवितांवर केशवसुतांचा परिणाम म्हणण्यापेक्षां केशवसुतांबरोबर ज्या परंपरेला महाराष्ट्रांत सुरुवात झाली त्या परंपरेचा नि ती परंपरा चालविणारे कवि यांचा परिणाम झाला; असें म्हणणें ज्यास्त सयुक्तिक होईल.

पद्माकरांच्या सर्वांत उत्तम कविता म्हटल्या म्हणजे निसर्गवर्णनपर केलेल्या होत. लालित्य व प्रसाद हे जे दोन गुण त्यांच्या कवितांतून आढ-ळून येतात अशी ग्वाही केळकरांनीं दिली त्या गुणांचा प्रकर्ष, 'सृष्टिसुंद-रीस,' 'निसर्गाची असहकारिता,' 'वसंतस्वागत,' 'मेघ,' 'मेघाची अकृतज्ञता' वगैरे कवितांमधून दिसून येतो. या कवितांनीं पद्माकरांना आमच्या आधुनिक कवींतील पहिल्या रांगेत नेऊन बसविलें आहे. त्यांच्या भक्तिपर कविता ठरीव ठशाच्या वाटतात, पण निसर्गवर्णनपर कवितांतून पद्माकरांची मौलिकता उत्तम रीतीनें प्रगटली आहे. 'सृष्टिसुंदरीस' या कवितेंतील त्यांच्या उपमा किती बहारीच्या आल्या आहेत, तें पहा.

जलौघ नच परि दिसे पदर जरि
लहरि झळकती विविधशा परी
हरितांबरिं कीं सृष्टिसुंदरी
नटली यापरि सुंदर दारा!

तसेंच —

निर्झर तटिंच्या पुष्पलतांनीं
आलंकृत जणुं झाली धरणी
त्याली कृष्णफुलें ती कानीं
डुलती कीं लागतांच वारा

किंवा —

मधुकर उडतां कर्णफुलावरि
सुखवाया तिज मधुर रव करी
गानें मोहुनि त्यांच्या मुखिं भरि
त्यांतिल मकरंदाची धारा

पद्माकरांच्या कवितेंत सृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण आहे त्यांच्या कवितां-तून बुद्धीच्या विलासापेक्षां भावनाविलास उत्कटतेनें आढळतो. त्यांच्या

— पद्माकर

कविता म्हणजे बुद्धीच्या कसरती नाहींत तर रसिक हृदयावर तात्काळ उमटलेले, निसर्गाचे संस्कार आहेत. ‘ वसंतस्वागत ’ ही कविता निरीक्षणावरच आधारली आहे. ‘ सखे, पुस्तकांत वसंताची वर्णिलेली चिन्हें आतां दिसताहेत म्हणून वसंत आला आहे असें वाटतें ’ म्हणणाऱ्या शकुंतलासखी प्रियंवदेसारखी त्यांची वृत्ति नाहीं. वसंताच्या स्वागतार्थ वनदेवी नटली आहे. खग—गण म्हणजे तिच्या पायांतील पैजणें आहेत, कधीं हरित तर कधीं पीत तर कधीं रजत कृष्ण अशीं तीं घडीघडी वस्त्रें बदलीत आहे. तसेंच —

कंचुकि नगयुग विलसत
वृक्षवेलि जणुं गुंफित
स्वकरें वरि दावि हस्त
कुशलता प्रिया स्वतां

वनदेवीनें नवकुसुमभाराचें लेणें अंगावर चढविलें आहे. ही अभिनव कल्पना पहा.

निर्झर झुळझुळ वाहति
कीं माथा केश रुळति
पवनें त्या मिळत गति
मानिति नच वारितां

अरुणोदय नाहीं तर सतीनें भाळीं भरलेलें मळवट आहे. अशा वेळेला वसंत तेथें अवतरून वनदेवीसह क्रीडा करूं लागला आणि मग —

स्थिरचर प्रेमें नटलें
वसंतसमयीं दिसलें
धन्य धन्य तें झालें
सुख निरुपम लाभतां

सरसपणा व सुगमता हा पद्माकरांचा सर्वांत मोठा गुण म्हणतां येईल. त्यांच्या कविता दुर्बोध कुठेंच नाहींत, व प्रत्येक कवितेंतून रसिकता व कुतूहल ओसंडून वाहत आहे. त्यांचें हृदय इतकें भावनाक्षम आहे, कीं निसर्गातील दृश्यें एखाद्या कॅमेऱ्याप्रमाणें त्यांच्या हृदयावर उमटत जातात, व प्रसादगुणामुळें कवितारूपानें बाहेर पडतात. या कलाभिज्ञाची सौंदर्यदृष्टि इतकी मर्मग्राही आहे कीं, वर्ण्य वस्तूंतील रस अचूकपणें रसिकासमोर ठेवणें पद्माकरांना जड जात नाहीं. तसेंच उपमा अलंकारादिकांत त्यांची प्रतिभा उत्तम प्रकारें दिसून येते. 'मेघ' या कवितेंतील कल्पनाविलास पहा.

विशाल उदरीं सांठविलें.
काय तरि इतुकें न कळे
आवरुनी अवयव सगळे
वाटे उदरीं सांठविलें
कासवाकृति, जणूं गमे तीं, कीं स्वैरगती
स्वर्गंगेमाजी विहरे
फसवित घन हा नभीं फिरे !

'मेघाची अकृतज्ञता' ही कविताहि अभिनव आहे. मेघांना ज्या सूर्याच्या उष्णतेमुळें जीवन मिळालें त्यालाच त्यांनीं व्यापून टाकिलें. ही त्यांची अकृतज्ञता होय; अशी कल्पना केली आहे व शेवटीं कवि विचारतो.

मेघ बनले यत्करप्रतापानें
तेच झाले कीं प्रबल जलमदानें
दिव्यकांती बघवे न मुळिं रवीची
रीत मेघांची नच कृतज्ञतेची !

'निसर्गाची असहकारिता' ही कवितासुद्धां विषयाच्या निवडीमुळें

नवीन व चमत्कृतिपूर्ण वाटते. सगळ्या निसर्गानें असहकारिता स्वीकारली अशी कल्पना कवीनें केली आहे व त्याच्या परिणामाचें बहारीदार वर्णन केलें आहे. गेल्या दहापांच वर्षांत पांचपन्नास कवींच्या कविता माझ्या पाहण्यांतून गेल्या आहेत. पण त्यांपैकीं कोणाहि कवीचें अनुकरण किंवा कल्पना-चौर्य पद्माकरांत आढळून येत नाहीं. त्यांच्या निसर्गवर्णनपर कविता सर्वस्वी त्यांच्या व मौलिक आहेत. 'प्रफुल्ल पद्माकरा'चें वैशिष्ट्य सर्वस्वी त्यांतील या कवितांमध्येंच आहे.

सामाजिक कविता पद्माकरांनीं लिहिल्या आहेत, पण त्यांत ओज किंवा आवेश दिसत नाहीं. सामाजिक खळबळीचे संस्कार पुसटपणेंच त्यांच्या मनावर झालेले दिसतात. समाजांतलि विषमता त्यांना आवडत नाहीं. निसर्गांतलि समतेची व मानवी विषमतेची ते तुलना करतात नि म्हणतात -

न माना नीच कुणाला
नच गणा श्रेष्ठ अपणाला
श्रेष्ठता नसे वर्णाला
परी तत्कृतिला । पाहिजे स्वतांसम सकलां

संसारांतील विषमता या कवितेंत त्यांनीं नय व अनय या मार्गांनीं जाणाऱ्यांची तुलना केली असून ते विचारतात.

असें विबुध वर्णिती, परि तया कसें ना दिसे
जगीं अनय वर्तनीं जन किती सुखानें वसे?

अन्यायानें वागणारेच सुखी दिसतात हे पाहून त्यांना विषाद वाटतो पण ही विषमता दूर करण्याकरितां काय करावें हें ते सांगत नाहींत. व त्यांनीं हा प्रश्न जुन्या पद्धतीनें सोडविला आहे.

तदा सकल आयका प्रभुचिया रवा, देउनि
सदा श्रवण, ना तरी कुणि न तारि त्यावांचुनी

म्हणजे परमेश्वरावर अढळ श्रद्धा ठेवणें हाच मार्ग त्यांना सुचतो. ज्या केशवसुताचें शिष्यत्व पद्माकरांनीं पत्करलें आहे त्या केशवसुतांनीं सामाजिक विषमता दूर करण्याकरितां हा मार्ग कधींच सुचविला नव्हता. त्यांनीं तर बंडखोरी प्रतिपादिली होती. व हाच मार्ग आपल्या मराठवाड्यांत कवि कांत यांनीं सुचविला आहे. कांत म्हणतात:

विझतात दीप विझतील सूर्य
माझ्या नेत्रीं तेज प्रज्वलितां
वाळतात ओढे वाळतील सिंधू
रुधिरीं तुफान माझ्या नवें
नसे सत्ता, नाहीं स्वतंत्र्य कशाचें
पुरे मनीं नाचे बंडखोरी

पण पद्माकरांना हा मार्ग अगदींच माहीत नाहीं. ते समाजसुधारक नाहींत. बंडखोरांचा आवेश व भजनप्रियता त्यांच्यांत नाहीं. ते फक्त सौंदर्यदृष्टीचे, रसिक व भावनोत्कट असे निरीक्षक आहेत. त्यांची निसर्गाचीं काव्यें आल्हाकारक व कानाला आनंद देणारीं आहेत, पण समाजसुधारणेचीं काव्यें त्यांच्याकडून अपेक्षिणें हें वेडेपणाचें होईल. आणि म्हणून ज्या कांहीं सामाजिक पण आवेशपूर्ण कविता त्यांना साधल्या नाहींत तरी घरगुती वातावरणाचें त्यांचें चित्रण फारच सरस वठलें आहे. ' तें प्रेम कोणीकडे ' या मातेच्या प्रेमावर लिहिलेली कविता मराठी वाङ्मयांत बरेंच वरचें स्थान पटकावील यांत शंका नाहीं.

ऐकोनी छकुला तदा हुडकुनी आणोनि दे खेळणीं
बाजा चेंडु तसा नवा खुळखुळा हातीं तया देउनी
बोले " वाजवि नाद मंजुळ तुझ्या हस्तें मुखें ऐकवी
झाले आतुर गावयास कवनीं सत्काव्यकर्ते कवी

— पद्माकर

तसेंच 'शिशुहास्यां' तील कल्पनी मनाला गुदगुल्या करिते. आई-बापांच्या फोटोकडे पाहून मूल हसूं लागलें तव्हां आईला कोडें पडलें. मुलानें ( संकेतानें ) विचारलें, 'ताताला बघून तूं कां हंसलीस तें सांग' त्यावर आई म्हणते —

जसें तव मुख चुंबुनि मातें
हृदयीं प्रेमा येई भरतें
तसें घालुनि कर कंठातें —
विळखा देतां–जाणिलें तिकडच्या चित्ता
तरि मी वदलें सोडा मजला
अधरीं काय सांठले बोला
नाहीं आयकिलें वचनाला
दूर कीं सरतां– अधर गती ना ये वदतां

यांतील नर्म श्रृंगारानें मन प्रसन्न होतें. पण श्रृंगाराकडे कवीचा विशेष ओढा दिसत नाहीं. सुंदर वस्तूंकडे त्यांचें लक्ष्य सहज वळतें पण सौंदर्याचा जो सर्वोत्कृष्ट नमुना, सुंदर स्त्री, तिकडे पद्माकरांनीं फटकूनहि पाहिलें नाहीं. 'कवीस' या कवितेंत ते विचारतात —

युवयुवतींच्या प्रेमाचीं
सुंदर गाणीं गायाचीं
साधि असे कां कविराया !
मुळीं न दवडी ती वाया

पण पद्माकरानीं युवयुवतींच्या गाण्यांच्या हद्दीपर्यंत स्वतः कविता केली नाहीं तरी इतर उपदेश त्यांनीं स्वतःच पाळाला नाहीं.

ते म्हणतात —

गुंजारव तो भ्रमरांचा
वर्णुनि शिणवुं नको वाचा
गुंगु नको त्या नादानें
जागृत करि जग तव गानें

तसेंच — आकाशींच्या चंद्राला
गाउनि मिळतें काय तुला ?
दूरदृष्टि तुज जरा म्हणूं
स्थिति येथिल नच कळत अणूं

पण या बाबतींत पहिला गुन्हा श्री. पद्माकरांनींच केला आहे. कारण त्यांच्या निसर्गवर्णनपर कविताच त्यांचें वैशिष्ट्य आहे. देशजागृतिपर कविता त्यांनीं लिहिल्या नाहींत व लिहिल्या तरी त्या साधल्या नाहींत. त्यांचें तें क्षेत्रच नव्हें. या रसिक कवीनें वसंताचें स्वागत करावें, निसर्गाच्या असहकारितेवर अश्रू ढाळावे, मेघाकडे पाहून त्याच्या स्वच्छंदीपणाचें कौतुक करावें, कधीं त्याच्या अकृतज्ञतेबद्दल विषाद मानावा, सृष्टिसुंदरीच्या कर्णफुलाबरोबर पुष्पलताबरोबर स्वतः डोलावें, कधीं तिच्या बुट्टेदार शालूकडे पाहून धन्य मानून घ्यावें, कधीं तिच्या फडफडणाऱ्या पदराबरोबर, जलौघाबरोबर मनहि वाऱ्यावर सोडावें पद्माकरांनीं हें जग हृदयांत सांठवावें पण केशवसुताचा चेलेपणा सांगून जगावर कोरडे ओढण्याची हिंमत धरूं नये. त्या प्रांतांत चौफेर घोडे दवडविण्यास मराठवाड्यांत इतर वाङ्मयवीर आहेत.

पद्माकरांचें काव्य वाचून त्यांची तुलना दत्तकवीबरोबर करण्याचा मोह होतो. पण "दत्तकवीचीं निसर्गवर्णनपर गीतें अतिशयोक्तिपूर्ण व वस्तुस्थितीस सोडून आहेत. त्यांच्या 'कोकिल कूजित' व

'प्रभात' या कवितांतून भिन्नभिन्न काळीं गोचर होणाऱ्या देखाव्याचा मेकर म्हणजे सृष्टिचा विपर्यासच केलेला आहे:" असे उद्गार श्री. मा. श्यं. पटवर्धन यांनीं काढलेले आहेत. पण दत्तांचें वैशिष्ट्य त्यांच्या शिशुगीतांत आहे. या दृष्टीनें पद्माकर हे निसर्गवर्णनांत बालकवींच्या जवळ येतात. निसर्गाची सूक्ष्म वर्णनें दोघांचीहि सारखींच आहेत, दोघांनाहि तत्त्वज्ञानाचें सारखेंच वावडें आहे, दोघांचीहि प्रतिभा हळुवार व मृदु आहे. ती संग्राहक आहे. संश्लेषणात्मक (Synthetic) नाहीं. दोघांनीहि अलंकाराच्या बेडींत स्वतःला जखडून घेतलें नाहीं. पण बालकवींत व पद्माकरांत एक मोठा फरक आहे. बालकवींची एकच राणी आहे, आणि ती म्हणजे निसर्गदेवी. पण पद्माकर ईशप्रेम व निसर्गप्रेम या दोन्हींच्या कोंडींत सांपडले आहेत. नाहींतर सुमनाची स्तुती करतांकरतांच ते ईशपदीं जाऊनच धन्य झालें असे उद्गार त्यांनीं काढले नसते. पण त्यांचें खरें प्रेम निसर्गावरच आहे. पारिजातकाचें झाड सत्यभामेच्या मंदिरीं लाविलें तरी फुलें रुक्मिणीच्या प्रासादांत पडतात.

पदलालित्य तर पद्माकरांनीं चांगलेंच अभ्यासिलें आहे :—

अभिनव कलिकांच्या घालुनी कंठ माला
करिति अलि सुवेषें नृत्य–गुंजारवाला
विहरति वनिं पक्षी मोहिती सन्मतीला
लवहि रुचि नयाची येइ कीं ती दृश्याला

किंवा — याच रुचिर नयनकर मौन खुलत डुलत कांता

किंवा — तव अधर–बिंब तें कपोल जसीं सुमनें
फिरफिरुनी मांग सुकविल उष्ण पवनें

बरें, हें लालित्य दुर्गम शब्दांवर किंवा अर्थांवर अवलंबून आहे काय!

नाहीं. पद्माकरांच्या कविता सहजसुंदर आहेत. त्यांना अलंकारादिकांचा नखरा खपत नाहीं.

पद्माकरांची कवितासुंदरी ही साधी व सहजसुंदर आहे. तिला नटवे-पणा आवडत नाहीं. सुंदर पण कृत्रिम वस्त्राभरणाचें तिला वावडें आहे. तिला महाजन–कन्यकेसारखा अलंकाराचा सोस नाहीं. तिला जलौघाशीं खळणें आवडतें, डोक्यांत सोन्याचें फूल न घलातां साधीं फुलें खोंवाविशीं तिला वाटतात. वसंतागमनानें तिच्या हृदयांत हर्षाच्या लहरी नाचूं लाग-तात. निसर्गात तिला सगळीकडे सौंदर्य दिसतें. कोठें अकृतज्ञता किंवा विषमता दिसली तर तिला वाईट वाटतें, पण क्षणभरच. ती देवदर्शनास जाते व भक्तिभावानें देवापुढें डोकें नम्र करते पण तेवढ्यापुरतेंच ! तिला अजून शृंगार शिवला नाहीं, पण ती वृत्तीनें रंगेल, रसिक व मोकळी आहे. दुःखें किंवा संकटें तिला फार वेळ त्रासवूं शकत नाहींत. ती फार लवकर आनंदी बनते. ती अजून बाला आहे. उत्तान तारुण्यांत तिनें अजून प्रवेश केला नाहीं. महाजनांची कविता ही अलंकारप्रिय अशी खानदानीं-तली प्रौढ तरुणी आहे. नांदापुरकरांची कविता ही नदीतीरावर झोंपडी बांधून राहणारी अंतर्मुखी तापसी आहे. गाडगीळांची कविता ही हळुवार मनाची व एकलकोंड्या स्वभावाची तरुणी आहे. कांतांची कविता लोकांचे डोळे दिपविणारी सौदामिनी आहे. पण पद्माकरांची कवितावाला, ही खेळ-कर, रसिक, रंगेल व नितांत सुंदर अशी किशोरी आहे. अजून तारुण्यांत तिनें पदार्पण केलें नाहीं.

पद्माकरांच्या काव्याचें मराठवाड्यांतील वाङ्मयांत काय स्थान आहे ! त्यांची कविता ठरीव छापाची नाहीं. कुंथून निघालेलें असें कुंथनकाव्यहि त्यांचें नाहीं. ते अंतर्मुखी नाहींत. किंवा पंडित नाहींत, किंवा जगाच्या

दुःखानें कोमेजून जाणारे नाजूक तरुण नाहींत. किंवा रूढीविरुद्ध बंडखोरी करणारे बेछूट भाईहि नाहींत. तर कलाभिज्ञ, रसिक व रंगेल असे ते कवि आहेत. तत्वशोधन त्यांच्या पलीकडे आहे. पण पाहिलेलीं दृश्यें हळुवारपणें सांठवून रसिकांकडे अलगत पोहोंचविणारे ते संग्राहक आहेत. त्यांच्या कवितेवर सुप्रभातींचा तजेला व टवटवीतपणा आहे. कांतांच्या कविता मस्त मदनमस्ताची आठवण करून देतात, गाडगीळांच्या कविता पारिजातकाची आठवण मनीं आणतात. मनाठकरांच्या काव्याकडे पाहून संध्याकाळीं एकीकडे फुलणाऱ्या उदास अशा पिवळ्या गुलाबाची आठवण होते. महाजनांच्या कविता नटव्या अशा लाल गुलाबाची स्मृति जागृत करतात, पण पद्माकरांच्या कविता वाचल्या कीं बालार्कानें दीप्त अशा तळ्यांत नाचणाऱ्या नि बागडणाऱ्या, पण अजून पुरेतपणीं न उमललेल्या अशा कमळाची आठवण होते. म्हणून कवि ' कांत ' नें म्हटलें आहे.

" सहस्रदळ कमलें न विकसली अजून ' पद्माकरांत ' ग । कंपित सस्मित कळ्या डोलती गंधवाह कंपनांत ग ।।" मराठवाड्याचें अभिमानस्थान असलेल्या या रसिक कवीस माझें अभिवादन असो.



# ४

## महाजनांची कविता.

जन्म १६ - ६ - १८९६

' महाजनांची कविता ' हें पुस्तक प्रसिद्ध होऊन आज जवळ जवळ सात वर्षें होतात. त्यानंतर मराठवाड्यांत बरेच कवितासंग्रह प्रसिद्ध झाले पण महाजनांच्या कवितेंत जें वैशिष्ट्य आहे तें दुसऱ्या कवितांमधून दिसून येत नाहीं.

या पुस्तकांमधून महाजनांच्या एकंदरीन अठ्ठावन कविता छापल्या आहेत. मागें त्यांच्याशीं बोलत असतांना त्यांच्या कडून कळलें कीं, त्यांनीं जवळ जवळ पांच हजार कविता लिहून काढल्या आहेत पण त्यापैकीं फक्त अठ्ठावनच कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

श्री. महाजन हे कवीच नाहींत तर चांगल्यापैकीं कीर्तनकार आहेत. नामदेवाचें काव्यमय चरित्र, सीताहरण, दत्तजन्म, मातृ दास्य विमोचन,

श्री पुंडलिक, महासाध्वी गांधारी, महात्मा भरत हीं त्यांचीं आख्यानें प्रसिद्ध आहेत. महाजनांचीं कीर्तनें ऐकण्याचा ज्यांना योग लाभला आहे त्यांना त्यांच्या वाणीचा, उपमा अलंकारादिकांतली चमत्कृति व आख्यानांतली अवीट गोडी किती आहे याचा अंदाज येईल.

हीच गोष्ट त्यांच्या कवितांची आहे. महाजनांची वृत्ति ही मूलतः धार्मिक आहे त्यांनीं इतर विषयांवर कविता लिहिल्या नाहींत असें नाहीं. कविता देवी, सृष्टि काव्य, वर्षर्तूंतील उषःकाल, भांडवलशाही, गगनास, उषा रवि विवाह, सिंहगड वगैरे विषय त्यांनीं कवितेकरितां घेतले आहेत. पण एकंदरींत पाहतां त्यांच्या कवितांमधून त्यांची धार्मिक वृत्तीच जास्त दिसून येते. त्यांची भूमिका उपासकाची दिसून येते, उपदेशकाची किंवा तत्वज्ञाची नाहीं. व त्यामुळें त्यांच्या कविता या उपासना उपासक व उपास्य या तीन गोष्टींनीं भरलेल्या आहेत. शारदा वंदन, कविता देवी, शांकरी वंदन, जयति शांकरी, अंत बघसि कां, लपंडाव, खरा साक्षी, सौंदर्योपासना, अभंगोपासना. करुणा इत्यादि कविता भक्तिपर आहेत. वृत्तें जुनीं, विषय जुने, हाताळण्याची वृत्ति जुनी, दृष्टि भक्तिपर यामुळें हा कवि नवीन व जुन्याच्या संधिकालांत उभा आहे, तरी त्याची ओढ जुन्याकडेच जास्त दिसते. शरीर आधुनिक युगांतलें असलें तरी हृदय जुन्या संतकवींपाशीं आहे असें वाटतें व त्यांच्या भक्तिपर कविता वाचीत असतां आपण मध्ययुगीन कवी, वामन पंडित, दासोपंत, उत्तम श्लोक वगैरेच्या कविता तर वाचीत नाहींना असा क्षणोक्षणीं भास होतो. संतकालीन वाङ्मयाचा विशेष हा कीं, त्यांतील तत्वज्ञान अद्वैताचें व त्याचा पाया भक्तीवर उभारला आहे. ही भक्ति बहुतेक ठिकाणीं सगुणाकार परमेश्वराची आहे पण क्वचित् ठिकाणी निर्गुण रूप परमात्म्याची सुद्धां आढळते. भक्तीमध्यें सुद्धां द्वैत भाव ठेवणारे तुकारामासारखे वैष्णव कमीच. एकंदरीनें अद्वैतवादी जास्त.

या संत वाङमयामध्यें वेदांत, भक्तिपर आराधना, व सगुण रूप परमेश्वराच्या लिलांचें वर्णन हें भूरित्वेंकरून आढळून येतें. समाजास हलवून सोडणारे विषय, व्यक्तींचीं किंवा समाजाचीं सुखदु:खें, ऐतिहासिक प्रसंग किंवा डोळ्यासमोर घडत असलेला इतिहास, केवळ वर्णन म्हणून निसर्गाचीं वर्णनें, व निसर्ग निरीक्षणांतून प्राप्त होणारा आनंद व त्याचें विवेचन हीं संतवाङमयांतून विशेष आढळत नाहींत आणि या गोष्टी अर्वाचीन वाङमयांतून प्रकर्षानें दिसून येतात. अर्वाचीन व प्राचीन वाङमय अभ्यासिणाऱ्याला हा भेद चटकन् दिसून येतो. महाजनांच्या कवितांतून अर्वाचीन व प्राचीनाचा जरी संगम दिसून येतो तरी ज्याप्रमाणें गंगायमुनेच्या संगमांत शुभ्र गंगेपेक्षां काळ्या जान्हवीचेंच अस्तित्व जास्त भासतें त्याप्रमाणें प्राचीन वाङमयाचें व प्राचीन कवि कल्पनांचें अस्तित्व जास्त भासमान होतें. प्राचीन प्रासादाच्या झरोक्यांतून आधुनिक धांवत्या जगाकडे पाहाणारे ते कवी आहेत. नवीन विचार, नवीन कल्पना, नवीन खळबळी या त्यांना क्षणभर गुंगवितात. पण क्षणभरच.

या मन:प्रवृत्तीमुळें महाजनांची कविता परीक्षिणें म्हणजे मनोरंजकच नव्हे तर उद्बोधक ही आहे. आपल्या ' जयति शंकरि ' या कवितेंत त्यांनीं सर्व शक्तिदायिनी अंबेची स्तुति केली आहे, व शेवटीं म्हणतात.

तुझी विमल मूर्ति ही हृदयिं राहुंदे राहुंदे
समस्त युवतीमध्यें तुजसि पाहुंदे पाहुंदे
तुझ्या भजनिं कष्ट हे तनुसि साहुंदे साहुंदे

कधीं ते म्हणतात. —

सतर्षी सुम, तारकाऽक्षता वाहुनि घेउनि
शशी नीरांजन ओवाळिन तव मूर्ति सुविमला

कधीं आपल्याला तिचें बालक समजून विचारतात—

> धरूं भरंवसा कसा? आईशी धरूं भरंवसा कसा?
> हांक मारुनी दीर्घ रवानें पडे कोरडा घसा

कधीं अंबिकेला विनवितात—

> कां असा खेळसी लपंडाव हा सांग
> मग फिटेल कैसा मम जीवाचा पांग?

महाजनांची भूमिका तळमळणाऱ्या भक्ताची आहे व ही भक्ति सगुणरूप जगन्मातेविषयीं आहे. निराकार स्वरूपाचीं वर्णनें जीं रेलचेलीनें कोरेकलांच्या काव्यांत आढळतात तीं महाजनांत दिसून येत नाहींत. फक्त 'खरा साक्षी' या कवितेंत "तें तूं ब्रम्ह असुनि काय वरिसी अज्ञान हें निश्चिती" असें मानवाला सांगतात. त्यांचें वेदांतविषयक तत्वज्ञान अद्वैताचें आहे. भूमिका उपासकाची आहे. उपदेशकाची नाहीं व उपासनेचें अधिष्ठान भक्तीवर आहे. उपास्य दैवत जगद्धात्री अंबा आहे. गोचर वर्णनें त्यांना ज्यास्त आवडतात. त्या उलट श्री. कोरेकल यांचीं वर्णनें निराकार परमेश्वराचींच आहे.

प्रस्तावनेंत श्री. कृष्णाकुमार गोळेगांवकर लिहितात —

> " स्त्री मुखाकडे जी दृष्टि एकदां वळली
> ती पुन्हांहि वळली म्हणजे पुरती चळली

अशी त्यांची ठाम समजूत असल्यामुळें त्या विषयाची त्यांची एखादीहि कविता नसावी यांत आश्चर्य नाहीं" शृंगाररसात्मक अशी कविता महाजनांच्या पुस्तकांत आढळत नाहींच पण स्त्री वर्णनपर किंवा कोणत्याहि विषयाला स्त्री कल्पून त्या विषयाचें वर्णन कवीनें अनेकदां केलें आहे. अनेक सुंदर वस्तुपैकीं स्त्री ही एक आहे आणि तरुण स्त्रीविलास हा केव्हांही मनाला आनंद देणारा आहे. परंतु विलास सोडून स्त्रीच्या कन्या, माता

इत्यादि अनेक भूमिका आहेत तिकडे कवीनें आपलें लक्ष्य वेधिलें आहे आणि अलंकाराची आवड असल्यामुळें 'जयति शांकरी' या कवितेंत कवीनें शांकरीच्या वर्णनांत बहार उडविली आहे व वत्सलरसाची सीमा नि भक्तिरसाचा परिपोष करीत असूनही रसराजाला कवि पारखा नाहीं, मनांत आणील तर श्रृंगारपूर्ण कविता करणें कवीला कठीण नाहीं असें वाटावयाला लाविलें आहे. शांकरीच्या वर्णनपर खालील ओळी पाहा:—

नख न तें शशिची जणु कोर ती
रत जिथें मदनासह ती रती
हिमगिरीवर जेविं जलौघ तो
पदिं तसा तव अंचळ लोळतो
धवलता विधुची जणु अंबरीं
भरुनिया विलसे तव अंबरीं

किंवा, ह्या ओळी पहा —

हृदयसिंधु उचंबळुनी निका
उसळली जणुं मौक्तिक–मालिका
विकसिताब्ज तशी नयनाकृति
भृकुटि भव्य धनूपरि वक्र ती

इतकी सुंदर रचना करणारा कवि स्त्री सौंदर्याचें वर्णन करूं शकणार नाहीं हें शक्यच नाहीं. पण शृंगाराकडे महाजनांची प्रवृत्तीच नाहीं आणि शृंगार वर्णावयाचा तरी तो अगदीं भीत भीत व सोवळेपणानें वर्णितात. प्रेमाचा उद्भव होणें यांत अनैसर्गिक काय आहे किंवा प्रिय सखी किंवा सखा मनोहर वाटणें यांत तरी काय वाईट आहे. पण त्यांचें वर्णन करतांना महाजनांची लेखणी पहा कशी लाजते.

हळूंच निरखी निशा उपवरा शशी एकला
विमूढ मनिं जाहली बघुनि निर्मला तत्कला
स्वजीवित गमे तिला सुखद त्यासवें कंठिता
तदीय चिरसंगमीं म्हणुनि होय उत्कंठिता

झालें याच्या पुढें महाजन जायचें नाहींत. स्त्रीविषयींची महाजनांची कल्पना उच्च नि सात्विक आहे. त्यांना स्त्री ही मातृरूपानें आदरणीय वाटते, शृंगाराची सखी म्हणून नाहीं. विधवेचीं दुःखें पाहून त्यांना कळवळा येतो. स्त्रीजातीवर झालेला अन्याय पाहून संताप येतो व ते म्हणतात.

पळविती, स्त्रिया मळविती
आजही छळा ना मिती
दुर्दशा चालली किती गडे ग

मातृहृदय या कवितेच्या पूर्वार्धात नी उत्तरार्धात बालहत्येच्या सामाजिक प्रभावर त्यांनीं जे कळवळ्याचे उद्‌गार काढले आहेत, ते हृदयाला चटका लावितात त्या प्रस्तावनेत ते विचारतात.

' वाचकहो ' ज्या भारतवर्षात एक काळ असा होता कीं गंगेनें आपला पुत्र टाकून दिला असतां मानवी हृदयानें जीवदान देऊन त्या अनाथ अर्भकाचें संरक्षण केलें; त्याच भारतवर्षात मानवी संततीला मानवी हृदयाकडून गंगेत नरडीला नख देऊन पाण्यांत लोटून देण्याचा प्रसंग यावा ही शोचनीय स्थिति नाहीं असें अजूनिही तुम्हाला वाटतें कां? पण तसें तुम्हीं आतां वाटूं देऊं नका. स्त्रीजातीचा प्रश्न आज ना उद्यां तुम्ही सोडवालच; नव्हे जितक्या लवकर सोडवाल तितका लवकर तुमचा अभ्युदय होईल.

स्त्रीच्या उद्धाराविषयींची ही तळमळ व ' मातृहृदयां ' त व्यक्त झालेला मनस्ताप हीं महाजनांच्या कवितेला फारच उच्च दर्जावर नेऊन

पोहोंचवितात. स्त्रीजातीच्या या गंभीर प्रश्नांत शृंगाराची कल्पना मृत होते व महाजनांची तळमळ ही वाचकांनाही विचार करण्यास भाग पडते. थंडींत काकडणाऱ्या मुलाला पाहून आईनें प्राणाची पर्वा न करितां स्वतःचें वस्त्र फेडून मुलाला त्यांत गुंडाळिलें अन् मग त्या हिममय रात्रीनंतर

झाली प्रभात, नभ निर्मल पूर्ण झालें
पांथस्थ ते सहज त्या स्थलिं सर्व आले
प्रेतासमीप बघतांच तदीय पुत्र
पाही सुहास्य वदनें उघडून नेत्र

पण हेंच मातृहृदय समाजाच्या कृत्रिम बंधनानें किती निष्ठुर बनतें व चोरटेपणानें जन्मलेल्या बालकाच्या कंठाला नख लावण्यास कसें तयार होतें याचें चित्र महाजनानीं मातृहृदयाच्या उतरार्धात उत्कृष्टपणें दाखविलें आहे.

तदा विधवेनें हळुंच नदींकांठा
नेत्र झांकुनि नख दिलें बालकंठीं
" तुझ्या प्रश्नाचें तूर्त हेंच आहे
अशुभ उत्तर हतभागि मुला ! पाहे "

या नंतर हें दृश्य पाहून जिज्ञासूनें बालहत्या प्रतिबंध करण्याचा निश्चय केला. मग कवि विचारतो.

आस्तिकांनों ! जा पंढरीस आतां
पहा प्रत्यंतर राउळास जातां
बालहत्या-प्रतिबंध व्हावयाला
मीहि बघतो करि कोण साह्य त्याला !

सृष्टि वर्णनपर कविता बऱ्याच आहेत पण निसर्ग वर्णनांत महाजनांची

दृष्टि इतर कविपासून वेगळी आहे. निसर्गाची नुसतीं वर्णनें करून ते थांबत नाहींत तर ते त्यांतून तत्त्व काढण्याचा प्रयत्न करितात. त्यांचा ' उषा रवि विवाह ' वाचून वाटेल कीं, त्यांनीं बालकवींच्या ' फुलराणी रविकर ' विवाहाचा जिव्हाळा ओतला असेल म्हणून पण तशांतला कांहींच भाग नाहीं. विवाह घाईघाईनें आटोपून त्यांनीं उषारवींना प्रवासास धाडलें ते स्त्रीपुरुषांचे निरीक्षण करीत परत आले नि त्यांनीं भारताला संदेश सांगितला कीं,

पश्चिमेच्या मार्गेच पूर्वदेश
त्यांत भारति चैतन्य नसे लेश
आर्य त्यांतुनि चैतन्यहीन होती
विप्र त्यांतुनिया स्वस्थ झोंप घेती

उषा–रवि–विवाहांतून त्यांना हा संदेश मिळतो तर तेजोभंग या कवितेंत निशा–शशी–विवाह लावून पुढें शशीनें व्यभिचार केला व त्या दुःखानें अरुण वन्हीमधें ती सती गेली असें दाखविलें आहे व त्यांतून असा निष्कर्ष काढला आहे कीं,

निस्तेज चंद्र बनला रविच्या प्रभावीं
आला तयास कळुनी निज नाश भावी
त्याचें तयास कळलें व्यभिचार-कर्म
तेजोहर प्रथित हा म्हणुनी अधर्म

महाजनांच्या सृष्टिवर्णनपर काव्यांत सृष्टिवर्णन हा गौण भाग आहे. त्यांतून तात्पर्य काढणें किंवा तत्वसोधन कारणें हें प्रधान कार्य आहे. त्यामुळें मर्यादित वाचकवर्गच त्यांच्या अशा कवितांशीं समरस होऊं शकतो. त्यांच्या ' चेंडुफळी ' या कवितेंतून सुद्धां हीच गोष्ट दृष्टीस पडते. निवळ वर्णनाकरितां वर्णन करून त्यांतून आनंद प्राप्त करून घेणें हा महाजनांचा उद्देश

नाहीं. निसर्गानें त्यांना वेड लागत नाहीं. आनंदानें ते बेभान होत नाहींत तर निसर्गातून आपल्या मनाला पटेल तो अर्थ ते घेतात. यामुळें तात्पर्या-च्या शालूला निसर्गाची किनार आपली बरी दिसावी म्हणून लाविली आहे असें वाटतें. व काम काढून घ्यायला कुणाचा उपयोग करून घ्यावा तसा त्यांनीं तत्वशोधनांत निसर्गाचा उपयोग करून घेतला आहे.

भारतीयांची सध्यांची स्थिति पाहून व पूर्वकालीन वैभवाची स्मृति मनांत येऊन महाजन कष्टी होतात. सिंहगडास ते गेले त्यावेळीं पाऊस पडून त्यांचा हिरमोड झाला. वृष्टींत मेघाचा त्यांना हा प्रश्न ऐकूं येतो.

> " नरसिंहाच्या प्रतापचेंही दर्शन घ्यायातें
> पाप्याच्या पितरास पात्रता मांग कशी येते ? "

" भारत-भूमाय, " " ऐसें जिणें कशाला " " नशीबाचा खेळ " ' आतां कुठें, ' ' विटंबना ' ' केवढें आश्चर्य हें ' इत्यादि कवितांमधून आपण काय होतों आणि आतां काय झालों या विषयींची तळमळ सारखी दिसून येते. पण महाजनांनीं या संकटांतून मार्ग कसा काढावा हें सांगि-तलें नाहीं. राष्ट्राची अधोगति, स्त्रियांवरचीं संकटें, अनौरस मुलांचे क्षणभं-गुर जीवित हें त्यांना दिसतें पण यांतून मार्ग काय हें ते सांगत नाहींत. सद्यःस्थितींत पालट व्हावा याविषयीं त्यांना तळमळ लागली आहे पण तो कसा होऊं शकेल हें ते सांगत नाहींत. ते संदेश देणारे प्रेषित नाहींत पण स्वतः दुःख भोगणारें व तळमळ करणारे आहेत. ते सहानुभाव आहेत. सहमवेदना त्यांच्यांत भरपूर आहे पण ते मार्गदर्शक नाहींत. वासराचीं दुःखें गाईला समजतात, तिला अंतरीं तळमळ लागली आहे पण पाडसाचें दुःख दूर करण्याकरितां काय करावें हें न कळल्यामुळें ती जशी केविलवाणें पाहात इवरते तसें महाजनांचें आहे.

महाजनांच्या सीताराम कृष्णादिकांच्याबद्दल कविता फार बहारीच्या उतरल्या आहेत. 'श्री कृष्णसंशोधन' 'संतांचा निरोप' 'मानसविहार' इत्यादि कविता त्यांच्या भक्तिप्रधान स्वभावाची साक्ष देतात. मानस विहाराविषयीं श्री. चंद्रशेखर म्हणतात.

'मूळांतील तुलसीदासांच्या दोह्यांतील सहज रम्यता प्रतीत करून कविवर्यांनीं आपलें रचनाकौशल्य व्यक्त केलें आहे' महाजनांची वाणी ओघवती आहे. कोणतेंही वृत्त ते लीलेनें हाताळूं शकतात आणि ही कला दीर्घव्यासंगाशिवाय साध्य होणें अशक्य. त्यांच्या काव्यांतून भक्ति व तळमळ हीं जशी दिसून येतात तसाच त्यांचा कल्पना–विलास पण प्रतीत होतो. 'सृष्टि काव्य' या कवितेंत ते परमेश्वराला म्हणतात.

'ऐसें अनाद्यत जें काव्य तें त्वां महाकाल–वृत्तामध्यें गोंविलें

तसेंच — त्वां योजिलें 'कल्प' 'विश्रांति' ध्याया
तसें 'पाद' त्याच्यांत 'मन्वंतरें'
दीक्षा 'यतीची' दिली 'मृत्यु' लागीं;
तसें 'अह्न' हीं ऱ्हस्व दीर्घाक्षरें

केवढी विशाल कल्पना ही! परमेश्वर कवि, व सृष्टिला काव्य कल्पून त्याचा विकास केला आहे. व शेवटीं तोच कवि काव्यरूपें नटतो असें दाखविलें आहे. तसेंच 'कविता देवी' या कवितेंत त्यांनीं तिला कवि–हृदयाच्या क्षीराब्धींतून निघालेली इंदिरा, रसिक हलाहलधराला वरण्यास विचार शैलोदरांतून जन्मलेली उमा, कवि-चंद्राची ज्योत्स्ना रसिक चंद्रशेखरीं वर्षणारी गंगा, कविच्या नंदनवनिंची कल्पतरूची लता, निर्विकार ब्रह्माची माया इत्यादि कल्पनांनीं कवितादेवीला आळवली आहे. हा कल्पनाविलास रसिकांना मुग्ध करून सोडतो. कल्पनेचें विशालत्व, अर्थाचें गांभीर्य, त्यांतील

रस व शब्दांचें सौष्ठव यांनीं नटलेलें महाजनांचें काव्य म्हणजे चमचमीत मेजवानीच आहे.

महाजनांची कविता ध्वन्यात्मक आहे. ध्वनिकाव्याची चर्चा लेले शास्त्र्यांनीं काव्यचर्चेत सुबोधपणें केली आहे. कोणत्याहि कवितेंतून ध्वनि जो निघतो तो देश, काल, श्रोता, वक्ता व विषय यांच्या संगमानें होतो. 'शब्दाप्रमाणें अर्थालाही व्यंजकता असते' एकच वाक्याचा अर्थ निरनिराळ्या लोकांना निरनिराळ्याप्रमाणें भासतो. ध्वनिकाव्याविषयीं चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे पण महाजनांची कविता बव्हंशी ध्वन्यात्मक आहे यांत संशय नाहीं. बहुतेक कवितांत त्यांनीं शब्द व अर्थ असे योजिले आहेत कीं वाचकाला कवीच्या मनाप्रमाणें ध्वनि मिळावा व तो ही बारकाईनें पाहिल्यावर. नाहीं तर वरवर अर्थ वेगळाच. त्यांच्या बहुतेक कविता अशा प्रकारच्या आहेत. 'पोपटाची परवशता' ही कविता उदाहरणादाखल दाखवितां येईल. आतांपर्यंत आपण काव्याच्या अंतरंगानें विवेचन केलें. आतां बाह्यांगाचें विवेचन राहिलें. अलंकाराला काव्याचा आत्मा मानीपर्यंत कांहीं लोकांची मजल गेली आहे. महाजनांच्या कवितेंत अलंकाराचा उपयोग इतक्या रेलचेलीनीं झाला आहे कीं कधीं मूळ कल्पनाच लुप्त होण्याची भीति वाटते. यमक, कल्पना, चमत्कृति, अर्थ चमत्कृति इत्यादि गोष्टींचा त्यांनीं पुरेपुर उपयोग करून घेतला आहे. या झगझगाटानें साधा वाचक गांगरून जातो व त्याला बऱ्याचशा कविता दुर्बोध वाटतात. उदाहरणार्थ 'कोपाग्नि ज्वाला' ही कविता घ्या. सीता ही कोपयुक्त होऊन यज्ञ वेदींतील पवित्र अग्नि ज्वालेसारखी दिसते ही कल्पना केली आहे. आणि मग त्यांत उपमादिकांची खैरात केली आहे.

उभारिला कर रागें, फुगली नासिकाहि फार
उत्तुंग स्तन युगुल; तयाचीं शृंगें हीं चार

कर्ण, नेत्र, मुख, नासापुट या ज्या ज्या द्वारांनीं
क्रोधाग्नीची ज्वाला भडके श्वासोच्छ्वासांनीं
युगुल तयांचें षट्क्, मुखासह गणना ती सात
रक्त वर्ण त्या क्रोधाग्नीचे सोष्ण हेच हात

आतां वाचकांनींच संतिच्या कोपाची कल्पना करण्याचा प्रयत्न करावा शद्व दुर्बोध, कल्पना जड, उपमा तर अजूनही गांगरून सोडणाऱ्या, मग साधा वाचक दारावर ठेठावूनच परत फिरण्यास तयार झाला तर त्याचा काय दोष! फणसाचा खडबडीतपणा फोडून आंत हात घालण्याची हिंमत व चिकाटी ठेवणाऱ्यालाच आंतील मधुर गर सांपडेल एरव्ही नाहीं.

अविरोधता न त्यांची वाटे मग किन्निमित्त मानावी
किंवा— एकांत एक असुनी होतो स्वर्निरय पंथींचा वाजी
किंवा— ती उक्त कल्पनांतें करणारांना करील हतबुद्ध
किंवा— पूर्वींहि पाहतां ज्या पडल्या गांठी अहंममत्वाच्या
निश्चित त्याहि अभावीं दुर्लभशा याच दुर्लभत्वाच्या

अशा दुर्बोध शद्वांचा व कल्पनांच्या गड चढतांना अगोदरच धांपा टाकण्याची वेळ येते. हें उदाहरण पहा —

परि मत्कृति जलकणिका युष्मत्काव्योदधींतली खचित

अशा किती तरी ओळी वाचून प्रखर ऊन पडून डोळे मिटावे तसें वाचकांचे होतें. कल्पने मधें चमत्कृती, हें तर महाजनांचें वैशिष्ट्य आहे.

'मेघास' व 'गगनास या कवितांत कल्पनेचा चमत्कार मनास मोहून टाकितो.

विलसे स्वर्गंगा ती शिरीं
भालीं चंद्रकोर साजिरी

व्योमांबर ते पाठीवरी
चिन्हें सारीं तारांचीं

किंवा—

सुवर्ण मृग जो नक्षत्रांत
गुंतुनि तच्छर—संधानांत
तुझाहि झाला दिसतो घात
शून्य प्रांत हृदयाचा

हें रामाचें मेघाशीं दाखविलेलें साम्य किती मजेदार आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं कल्पना मनाला पटत नाहीं.

नभिं सुरम्य शशी बहु माजतो

चंद्र आकाशांत माजतो म्हणजे काय कांहीं कळत नाहीं. तसेंच—

उगवत्या सवित्यांतिल रक्तिमा
लघु दिसे तुलिता तव कुंकुमा

म्हणजे तुझ्या कुंकवापुढें उगवत्या सूर्यामधील रक्तिमा लहान दिसते. कल्पना मनाला पटत नाहीं. पण असे प्रसंग थोडे. प्रत्येक वेळेला उपमा उत्प्रेक्षा घातल्याशिवाय महाजनांना चैन पडत नाहीं. या गर्दीतून वाट काढतां काढतां जंगलांतून वाट काढीत थकून शेवटीं मधेंच निजलेल्या प्रवाशाची आठवण होते.

महाजनांनीं भाषांतरें चटकदार केलीं आहेत व मुळचें मनोहरत्व भाषांतरांत उत्तरविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

आपल्या प्रस्तावनेंत कवींनीं आपली काव्यकन्यका:—

बाला किंवा प्रौढा मी न सांगू शके
स्वयेंचि रसिकें जाणावें तें

असें म्हटलें आहे. पण मुलीचें वय लहानच वाटण्यांत कवीचें आपल्या

— महाजन

कन्यकेवरील अंध प्रेमच कारण दिसतें. नाहीं तर ही कविता–कामिनी लहान तर काय, किशोरावस्थेतून निघून कधींच प्रौढा वा सदरेंत आली आहे. श्रीयुत महाजनाची काव्यसुंदरी ही पंचविशीच्या पुढची खानदानी-च्या घराण्यांतली लावण्यसुंदरी आहे. तिच्या पाठीवर वेणीचा शेपटा नाहीं कीं सैल अंबाडा नाहीं. तिची वेणी जुन्या चक्री पद्धतीची आहे. शरीर सौष्ठव, रमणीय, सुंदर, व शांत चेहऱ्याची ती मानिनी आहे. तिचें अंग नखशिखांत दागिन्यांनें मढविलें आहे. आणि हे दागिने सर्व सोन्या मोत्यांचे आहेत. डोक्याला सोन्याच्या कळ्या आहेत. गुलाब किंवा मोगरा या फुलां-ना त्यांत स्थान नाहीं. भांग मधोमध काढला आहे, नाकांत भरदार नथ आहे. चमकी नाहीं. अंगांत पोलकें नाहीं. तंग अशी हिरवी चोळी आहे. चेहऱ्यावरचा भाव शांत व प्रसन्न आहे. संध्याकाळच्या प्रशांतसमयीं देवीपूजेकरितां हातांत साहित्यपात्र घेऊन दर्शनास जाणारी ती गृहलक्ष्मी आहे. ती वृत्तीनें धार्मिक आहे, पण बायाबापड्यांचीं दुःखें पाहून तिच्या डोळ्याला चटकन् पाणी येतें. पण त्यांना कसा धीर द्यावा हें तिला समजत नाहीं. तिचें विनोद बुद्धीशीं जवळ जवळ वावडेंच आहे. पण ती बुद्धिमती आहे. कल्पक आहे, बौद्धिक कोट्या करण्यांत तिचा हातखंडा आहे पण तिच्यांत एक दोष आहे. या गृहलक्ष्मीला दागिन्यांची भारीच हौस आहे, पित्यानें हिचें दान केलें तें अलंकृत केलें. पण हे अलंकार तिला फार आव-डतात. रस्त्यांतून चालताना या गजगामिनीला आपल्या नूपुराचा झणत्कार व कंकणाचा रुणत्कार फार आवडतो. तिचा हात कधीं गळ्यांतील मोहन-माळेकडे तर कधीं डोक्यावरील कळ्याकडे सारखा जातो व आपण दागि-न्यांत कसें दिसतो हें पाहण्याकरितां ती रसिकाकडे नेहमीं पाहात असते. या एका दोषाविना या प्रसन्नमुखींत कांहीं दोष नाहीं. पण महाजन! या

मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

कामिनी विलासांत पुष्कळदा दागिन्यांची अडगळ भासते हें आपल्या कानांत अजून कोणीं कुजबुजलें नाहीं काय? असो.

उत्कृष्ट कीर्तकार, प्रेमळ गृहस्थ, विनोदी व सहानुभूतिपूर्ण मित्र, व नामांकित कवि या नात्यानीं समकालीन वाङमयावर महाजनांनीं चांगलाच परिणाम घडवून आणला आहे. नांदेडचे नाद मधुर व अलंकार प्रिय व सामाजिक सुधारणेकरितां तळमळणाऱ्या कांत, कृष्णाकुमार, पार्थिव, यादव-सुत, इत्यादि कवींच्या सांप्रदायास महाजनच जनक आहेत. आज जरी रसिकांना महाजनांची योग्यता पटली नाहीं तरी भावी काळ महाजनांना मराठवाडीचे पहिले आधुनिक कवि म्हणून निरसंशय लेखील. गोदातटाकींच्या व वामन पंडिताच्या नगरांत राहणाऱ्या या कवीला माझा प्रणाम असो.

५

# गाडगीळांची कविता.

जन्म ६-१२-१८९८

श्री. गाडगीळ यांचा जन्म इ. स. १८९८ च्या सुमारास झाला. त्यांचा कवितासंग्रह इ. स. १९२८ मध्यें म्हणजे त्यांच्या वयाच्या तिसाव्या वर्षी प्रसिद्ध झाला. 'माझीं फुलें' या कवितासंग्रहांतील पाहिली कविता १९२० मध्यें म्हणजे कवीच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी लिहिली आहे. व शेवटची कविता १९२७ त लिहिली आहे. म्हणजे कवीच्या बाविसाव्या वर्षापासून एकोणतीसाव्या वर्षापर्यंतच्या म्हणजे सात वर्षांतील कालाच्या कविता यांत समाविष्ट झाल्या आहेत. या कविता भावगीतें या सदराखालीं पडतात. खुद्द गाडगीळ आपल्या 'माझीं फुलें गुच्छ दुसरा' या संग्रहाच्या प्रस्तावनेंत म्हणतात,

'पहिल्या गुच्छांतील....कविता भावगीत ( Subjective Poetry ) या सदरांत पडणाऱ्या आहेत. भावगीत या प्रकारात कवि आपल्या स्वतः-च्या भावनांची अगर विचारांची शब्दचित्रें रंगवीत असतो आणि ती एक प्रकारें आत्मचरित्रपर असतात.'

यावरून गाडगीळांचीं ' माझीं फुलें ' हीं आत्मचरित्रपर अशी भावगीतें आहेत हें दिसून येईल व त्याच्या आयुष्यांतील सात वर्षांच्या या काळांत त्यांच्या मनावर जे संस्कार उमटले व ज्या ज्या वस्तूंविषयीं त्यांना तीव्रतेनें वाटलें त्या भावना व ते विचार त्यांनीं कवितांमधून चित्रित केले आहेत.

या काव्य-संग्रहांत एकंदरींत एक्कावन कविता समाविष्ट झाल्या आहे-त. या कवितांचे एकंदरींत चार भाग पडूं शकतात.

( १ ) भक्तिपर, ( २ ) प्रेमपर, ( ३ ) आत्मचिंतनपर व ( ४ ) सामाजिक नि तत्सम विषयावर. आत्मचिंतनपर नि भक्तिपर विषयावरील कविता जास्त प्रमाणांत आहेत. कर्मफल, प्रभुपदीं, संन्यास व मोक्ष, निराशेंतील आशा, आमची इच्छा, जीवाची तडफड, एका उन्मनस्काचे उद्गार हरिस्तवनाष्टक, नाम महिमा, सुविचार, उन्मनस्कालाच, भवार्णव इत्यादि कविता भक्तिपर नि आत्मचिंतनपर आहेत. यावरून कवीच्या मनांत या काळांत कांहीं तरी खळबळ उडाली होती व त्याला आयुष्य एक प्रकारें नीरस वाटत होतें. पण मधून त्याला ईशभक्तीच्या कल्पनेमुळें शांतीचा लाभ झाला असें दिसून येतें.

अनंत अपराध मी करितसें, क्षमा तूं करीं
कृपाकर विभो! असे बहुत हिंपुटी अंतरीं
अरे बघतरी कसे छळिति हे मला षड्रिपु
किती दुखविती सदा मम अमोलशी ही वपु

असें कवीनें अवघ्या तेविसाव्या वर्षीं देवाला विनविलें. हें अकालीं वैराग्य अंगीं बाणण्यास कवीच्या मनावरील धार्मिक संस्कार व सदा आत्मनिरीक्षण करण्याचा स्वभाव हीं कारणें असतील असें वाटतें. भावगीतांमधून निराशा ही पदोपदीं दिसून येते. या ओळी पहा.

ते मनिंचे मांडे वसले! मानसींच मेली आशा
संकल्प जळाले सारे ते बेत पावले नाशा

या वृत्तीबरोबर कवीच्या मनांतली तळमळ खालील ओळींत उत्कटतेनें प्रगटली आहे.

देहांतूनि उलावयास बघते चिच्छक्ति माझ्यांतली
जेवीं पोपट पंजरीं तरफडे मुक्ती मिळाया भली!

कवीला एका दृष्टीनें ही निराशवृत्ति आवडते असें दिसतें, कारण निवृत्ति भावाला निराशा ही पोषक असते.

वैराग्याचें खत घालोनी मानसभूमीवरती
निवृत्तीचें बीज पेरिलें सुंदर अंकुर फुटती.

या सात वर्षांच्या काळांत आपल्या मानसिक खळबळींविषयीं, आपल्या प्रस्तावनेंत श्री. गाडगीळ म्हणतात.

‘ सोळा ते चोवीस वर्षेंपर्यंत मी गंभीर व अंतर्मुख असा राहिलों व मनाची विमनस्कता पुष्कळ अनुभविली. यास अनेक कारणें झालीं त्यांतील मुख्य म्हणजे शारीरिक अस्वास्थ्य, लौकिक अपयशाच्या वाऊमुळें वाटणारें मानसिक अस्वास्थ; असा नैराश्याचा दुहेरी कांच मला सोळा ते चोवीस वर्षेंपर्यंत अनुभवावा लागला. तोडगा म्हणून या काळांत मी दासबोध, गीतारहस्य व तुकारामाचा गाथा हे ग्रंथराज स्वयंप्रेरणेनें व मन लावून अभ्यासिले आणि पुष्कळ मानसिक शांति मिळविली.......दुःखोपभोगा-

मुळें अकालीं शहाणपण येतें हें खरेंच आहे. जगाकडे डोळस दृष्टीनें पाह- ण्याची संवय याच उत्क्रांतीच्या काळांत जडली. अंतर्मुख दृष्टी याच काळांत झाली........ एकलकोंडा, विचारी व वैराग्यशील स्वभाव माझा या काळांत बनला. मनामध्यें वैराग्य वारंवार खेळूं लागलें. मी दुर्मुखलेला झालों, व बोलणें एकदम कमी झालें. स्वभाव अत्यंत मानी व महत्वा- कांक्षी असल्यामुळें या साऱ्या लौकिक अपयशाला पायाखालीं तुडवून, कांहीं तरी अलौलिक करावें असें मनास वारंवार वाटूं लागलें. त्यांतून जगा- कडून होत असलेल्या अवहेलनेचे आघात हळुवार झालेल्या मनास मुळींच सहन होईनात. '

यापेक्षां उत्तम परीक्षण दुसरा कोण करूं शकेल. कवीनें आपल्या स्वभावाची चिकित्सा फार सरळपणें केली आहे. जगाचे आघात सोसून कवि म्हणतो.

> व्याजाच्या जगतांत दंगुनि मला लाभेल कोठें सुख
> तुम्ही कां मग दावितां मजासि हो! खोटें जगाचें सुख

तसेंच ' निराश झालेल्या नूतन कवीस ' ते उपदेश करतात—

> कां धरिसी तूं चाड जगाची हिशेब राखी सदैवतें
> देणें घेणें केवळ जाणें, दुसरें कांहीं न त्या दिसतें.

म्हणून— सृष्टीपासुनि दूर अती हे, न दिसे लीला तिची तया
> सृष्टी मध्यें विलीन हो तूं, कशास बाधे मग माया

गाडगीळ स्वतः मधून मधून आवेशानें म्हणतात कीं आपल्याला जगाची पर्वा नाहीं

> लोकांच्या म्हणण्यास मान जगतीं द्यावा कशाला बरें
> हो ती कीर्ति दिगंतिं, या मुळिं न हो 'कृष्णास' पर्वा नुरे

— गाडगीळ

पण प्रस्तावनेंतील त्यांच्या उद्गारावरून अवहेलनेनें त्यांना मानसिक दुःख किती होत असे याची कल्पना येईल. या मानसिक नैराश्यांतून त्यांचें मन निवृत्तीकडे ओढ घेऊं लागलें. जगांत जीं सुखदुःखें दिसतात तीं लोकांच्या कर्मांचीं फळें होत.

एक बुद्धिमान् मूढही दुजा
एक उंचही एक तो खुजा
कां असें जगीं सांपडे खरें?
पूर्वजन्मिचें कर्म हें खरें!

या करितां सत्कृतीमध्यें गुंगून राहणें हाच मार्ग आहे. गगनांत तशीं स्थित्यंतरें होतात पण गगन कसें शांत असतें तर मग मनुष्यानें सुद्धां

ये प्राक्तनें तुज जधीं कुदशा जगांत
तूं सोस ती धृति बहू धरूनी मनांत

या दुःखांतून मुक्त होण्यास त्यांना एकच मार्ग दिसतो आणि तो म्हणजे ईश्वराचा धांवा, हरिस्तवाष्टक, हळहळणाऱ्या दुःखितास इत्यादि कवितांमधून त्यांनीं दाखविलेली व व्यक्त केलेली तळमळ कोणत्याही संतकविपेक्षां कमी नाहीं.

संसारीं मज कोणतीहि नुरली आशा जगन्नायका
आतां ती तव आस एकचि मशीं भक्ताचिया रक्षका
तूं येशील म्हणोन जीव मम हा आशेवरी टांगला
कव्हांचा परि तूं सखा, अजुनि हो नाहींसरे पातला

हे उद्गार अंतःकरण पिळवटून निघाल्यामुळें मनाला चटका लावितात. पण वयाच्या बावीस तेवीसाव्या वर्षीं इतकें निराश होण्यास खऱ्या संकटापेक्षां कवीचें हळवें मनच कारण झालें आहे. या बाबतींत गाडगीळांची

तुलना फुलारी यांच्याशीं करण्याचा मोह होतो. अवघ्या विसाव्या वर्षी फुलारीनें केलेली कविता पहा.

सुखाची ग मेर संध्या प्रमोदाचें सुकें फुल
आयुष्याचा गोड काल हारवला
काळ्या निळ्या ढगावरी, फुलें सांडलीं जाइचीं
माळ तुला आंसवांची वाहिलीग

गाडगीळांच्या भ्रांत मनाला दोन विसाव्याचीं स्थानें सांपडलेलीं दिसतात. एक ईश्वरभक्ति, व दुसरी गृहासक्ति. ईश्वराला त्यांतल्या त्यांत सगुणरूप परमेश्वराला त्यांनीं परोपरीनें आळविलें आहे.

'नितांत रुचिरा कृती तव सुकोमला पाहुनी
मदीय मन माधवा, अमित जाय तें मोहुनी
सुरम्य अति शोभतो मुकुट गोजिऱ्या मस्तकीं
सुनील कचभार तो विखुरला तयांतून कीं'

अशा ओळी कानालाच नव्हे तर मनाला पण आनंद देतात. पण ईश्वरासक्ती बरोबर गाडगीळांना मातृपितृ, दुहि ।, पत्नी इत्यादिकांच्या संगतींत शांतीचा लाभ झाला. यावर त्यांनीं चित्रिलेलीं कवनें त्यांना रसाळ अशा घरगुती कवींच्या पंक्तींत नेऊन बसवितात.

मायेचे मधु बोल जननिचे कैसा भुलूं मी शके
ताता आठवतां मुळीं मम मनीं धीरत्व ना तें टिकें
प्रेमाची पुतळी, सुहास्य वदना माझी सुशीला प्रिया
येता मानसमंदिरीं सकल हा मद्‌भाव जातो लया

त्यांच्या चंद्रकांता या कवितेंत खालील ओळी देशपांड्यांच्या 'कोणता मानूं चंद्रमा' या सुप्रसिद्ध कवितेची आठवण मनांत आणतात.

—गाडगीळ

नेत्रकटाक्षां फेंकोनी, कोण हांसते तेथोनी?
शीतल किरणें हास्याचीं, कोण उधळितें तीं साची
मनिंच्या चिंता ढवळ्याशा होउनि जाती त्या कैशा
धवल वस्त्र ल्याली रमणी, सांग कुणाची ही राणी
मोद पसरला चोंहिकडे कुणामुळें तो सांग गडे.

'प्रियेस' या कवितेंत

कंटकमय संसार पथीं तूं माझी प्रियकरिणी
तव सहवासीं काव्यलता गे फुलते मधु सुमनीं
उणा होतसे दुःख भार गे तुझिया सहवासीं
सौख्यं दुणावे; धैर्य येतसे भवनद तरण्यासी.

आपल्या कन्येचें वर्णन सुद्धां कवीनें जिव्हाळ्यानें केलें आहे.

आहे कंटकपूर्ण जीवित जरी, आहे गुणी बाळही
कांहीं काळ गमे मशीं खचितही स्वर्लोकशी ही मही

आपल्या निकट आप्ताविषयीं कवीनें ज्या विमल ओळी लिहिल्या आहेत त्यांवरून स्वकीयांच्या प्रेमाचें स्थान कविमनांत किती अढळ आहे याची कल्पना येते. श्री. गाडगीळांची गणना घरगुती भावना चितारणारे कवी म्हणूनच भावी काल करील असें वाटतें. गाडगीळांचें प्रिय मंडळ मोठें नाहीं. त्यांची प्रीति सर्व विश्व व्यापीत नाहीं. ती मर्यादित कक्षेंतच वावरते, पण त्या कक्षेंत ती आपल्या विमल उत्कटतेनें रसिकांचें मन मोहून टाकते. त्यांच्या मानससागराची खळबळ जिव्हाळ्याच्या आप्त प्रेमामुळें शांत झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. मोठमोठ्या सामाजिक व देशी प्रश्नांना ते हात घालीत नाहींत. तो त्यांचा विषय नव्हे. पण आपल्या मर्यादित जगांत त्यांना वाटणाऱ्या उत्कट नि सात्विक प्रेमाचें जें चित्रण त्यांनीं आपल्या शुद्ध विमल काव्यांत केलें आहे त्याची गोडी कांहीं और आहे.

त्यांच्या भावनांचें वर्णन Strong but Subdued उत्कट पण निमंत्रित अशा शब्दांत करतां येईल. जगाच्या आघातांनीं विद्ध झालेल्या या कवीला शेवटीं गृहप्रेमानें समाधान लाभलें व त्याला मही स्वर्लोकशी वाटूं लागली, ही समाधानाची भावना या भावगीतांतून प्रगटली आहे, हीं भावगीतें हेंच या काव्यसंग्रहाचें वैशिष्ट्य होय.

हळुवार मनाच्या या कवीला जगांत एकाएकी, संकुचित, किंवा विफल जीवन व्यतीत करण्याबरोबर सहानुभूति वाटते व तो सहानुभूतीचा सुस्कारा सोडतो. ' आहे सर्व खरें परंतु ' या कवितेंत,

> कां उद्विग्न बरें ललाम ललना रात्रंदिनीं ही असे
> हा, हा! कुंकुमहीन दीन सितता तीच्या ललाटीं वसे

असें ते कळवळून उद्गार काढतात. सह्यागिरींतून बाहेर पडणाऱ्या एकाकी निर्झरिणीनें त्यांचें चित्त व्यग्र केलें आहे. व सागराला भेटण्यास उत्कंठित झालेली निर्झरिणी निर्झराची सोबत झिडकारते व शेवटीं मधेंच वाळूंत लुप्त होते, असें दाखवून त्यांनीं आयुष्यांत सहचराची आवश्यकता प्रतिपादिली आहे. संकुचित लाजाळूनें त्यांचें मन मोहून टाकिलें आहे. ते लाजाळूस म्हणतात.

> तुझ्या अंगां थोडा जरिहि घडला स्पर्श परका,
> क्षणार्धीं तूं घेशी शरमुनि वहू गोड मुरका
> कला संकोचाची तव उचलली गे युवतिनीं
> वसे त्यांच्या अंगीं अमित रमणीयत्व म्हणुनी

गाडगीळांच्या सगळ्या कवितांत मला ' लाजाळूस ' ही कविता अतिशय आवडली. त्यांची ही कविता, दत्तांच्या ' बाई लतिके ' फुलारीच्या ' बाई कलिके ' व कांत यांच्या त्याच नांवाच्या कविते बरोबर मराठी वाङमयांत फार वरच्या दर्जाची समजली जाईल यांत शंका नाहीं. या

एका कवितेनें गाडगीळांच्या हळुवार मनाचा कोमलपणा प्रकर्षानें प्रकट झाला आहे. त्यांची सर्वात गोड कविता कोणची असें विचारलें तर मी निस्संकोचपणें ' लाजाळूस ' या कवितेकडे बोट दाखवीन.

मराठवाड्याच्या आधुनिक वाङ्मयांत गाडगीळांचें स्थान कोणतें आहे? महाजन, यादवसुत, कांत, कृष्णाकुमार, पार्थिव, इत्यादि नांदेडच्या कवि सांप्रदायापैकीं ते नाहींत हे खास. महाजनांच्या कविता भक्तीपर आहेत पण सामाजिक दु:खांविषयींची महाजनांची तळमळ गाडगीळांत नाहीं. कांतांचा दाहकपणा गाडगीळांत नाहीं. परिस्थितींत ते स्वत:च दग्ध झाले आहेत. नांदापुरकरांच्या अंतर्मुखी वृत्तीबरोबर त्यांची तुलना करतां येण्यासारखी आहे पण घरगुती भावनांची छटा नांदापुरकरांत नाहीं. गाडगीळांचा पंथ वेगळा आहे. ते स्वभावानें जसे एकांतप्रिय नि एकलकोंडे आहेत तसेच कवींमध्यें सुद्धा ते अगदीं एकीकडे पडतात. त्यांचें जग म्हणजे त्यांचें मन, मनोव्यापार व स्नेह्यांचें मर्यादित वर्तुळ इतकेंच होय. आत्मनिरीक्षण, आत्मचिंतन, एक प्रकारचा उदासपणा व ईश्वर भक्ति हीं त्यांचीं वैशिष्ट्यें होत. हीं वैशिष्ट्यें त्यांना जुन्या कवींच्या पंक्तींत बसवितात तर त्यांचीं प्रेमपर काव्यें त्यांना आधुनिकांत घालतात. त्यांच्या भावगीतांनीं मन गोड सात्विक पण उदास आनंदानें भरून आल्याशिवाय राहत नाहीं. मराठवाड्याच्या उफळत्या आकांक्षांचीं गीतें गाणारे ते नव्हेत तर स्वत:शींच गुंग होणारे ते भावकवी आहेत.

गाडगीळांचें पदलालित्य मोहक आहे, शब्दचित्रें डोळ्यांसमोर उभे करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. रमणीवर्णनाच्या या ओळी पाहा.

> मोत्यांचे सर कीं जणूं विलसती ती शुभ्र दंतावली
> चिंचोळी हनु कोंवळी तिजवरी ती गोजरीशी खळी

रामा सद्‌गुणशालिनी अमित ती नेत्रांस आल्हादिनी
आहे ती मधुभाषिणी, गजगती तीची मनोहारिणी

किंवा

रंग केतकी देहीं विलसे, लुसलुसतें यौवन, बघोनी मन जाई मोहुन
भुज गोंडस ते पल्लव गमती; अंगुलिकांच्या वरी
शोभती नखपुष्पें सुंदरी

शब्द साधे, रचना सुंदर व अर्थ तर विचारावयासच नको. लालित्यांत गाडगीळ कांतच्या बरोबर येतील. कांहीं कांहीं ठिकाणीं कल्पना विचित्र आढळतात. उदाहरणार्थ.

'ते भले भले वायूचे गड सारे वितळुन गेले'

वायूचे गड कसे वितळतात हें गाडगीळांनींच सांगावें. वायू वितळलेला कोणींच पाहिला नाहीं. तसेंच दुर्बोध शब्दाचें उदाहरण पहा-

मदहृदयस्थित भावसिंधुवरि उसळाया लहरी
त्वद्‌रुचिराननं पूर्णचंद्र तो उगवूं देच तरी

पण असे प्रसंग फारच थोडे. गाडगीळांच्या कविता महाजनांच्या मानानें किती सुटसुटीत वाटतात आणि कोरेकलांच्या मानानें तर विचारणेंच नको. कवितांची निवड त्यांनीं कसोशीनें केली नाहीं. त्यांची व्यायामावरील कविता वाचून पिनल कोडाला कवितारूपांत

आ बताव् तुझे अय् मर्दे शरीफ
तीनसो तेंथीस हैं जरंव् खफीफ

गाणाऱ्या उर्दू कवीची आठवण झाली.

एकंदरींत गाडगीळांची कविता सात्विक, ऋजु, विमल नि विदग्ध आहे. कविमनाची खळबळ, निराशा, शांति वगैरे गोष्टी या भावगीता-

— गाडगीळ

तून उत्तम रीतीनें व्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या इतर विषयांवरील कवितांत ओज दिसत नाहीं. पण गाडगीळ हे मूलतः भावकवि आहेत. सामाजिक कविता आवेशपूर्ण पाहिजे म्हणून या हलुवार नि एकांतप्रिय कवीकडून अपेक्षिणें वेडेपणाचें होईल. पण आपल्या कक्षेत त्यांच्या कविता कुणालाच हार जाणार नाहींत. साहित्योपवनांत महाजनांचें काव्य म्हणजे आपल्याच रूपावर लुब्ध होऊन मुरडणारा लाल गुलाब होय. मनाठकरांचें जानकी काव्य उदास पिवळ्या गुलाबाची आठवण करून देतें. कांतचें काव्य म्हणजे मदन मस्तच, जोरानें हुंगणाऱ्यास घोळाणा फुटल्याशिवाय राहायवाचा नाहीं. पण गाडगीळांच्या कविता म्हणजे नाजुक नाजुक, लाल लाल देंठाची कोमल व सुगंधयुक्त अशीं पारिजातकाचीं फुलेंच होत. रसिका, त्यांना हलुवारपणें हाताळ बरें कां, नाहींतर ती कोमेजून जातील.



मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

' स्वायतत्ता प्राप्त व्हाया स्वदेशा असे यत्न ज्याचा सदा सर्वदा ।
पायीं पडो शृंखला फांस लागो गळ्यातें तरी जो न भीतो कदा ॥
कारागृहांतून येतां सुटोनी मला टाक मार्गांवरी नेऊनी
त्याच्या पदींच्या रजस्पर्शनानें मला प्राप्त होईल मुक्ती क्षणीं ॥

देशाविषयीं व देशास स्वातंत्र्य प्राप्त व्हावें या विषयीं कवीला सारखी तळमळ लागली आहे. पूर्वीच्या वैभवाबरोबर तुलना करतां अलीकडील अवनति पाहून कवीला विषण्णता वाटतें व तो म्हणतो,

" जाहला परकी पदाहत देश भारतवर्ष हा
पूज्य पूर्वज धीरता गंभीरता आतां कुठें
सर्व नाशाची प्रतिक्षा पाहुनी हतबुद्धसे
शक्ति पौरुष युद्धकौशल मानधन कीर्ती कुठें "

घरभेदी, राष्ट्रद्रोही घातक्यांचे वर्णन दीक्षितानीं ' मला काय त्याचें ' या कवितेंत केलें आहे. यांत उपरोध पूर्णपणें भरलेला आहे. आपली स्वतः-ची चैन चालली म्हणजे झालें मग देशाचें वा देशबांधवांचें कांहींहि होवो त्याची आपल्याला पर्वा नाहीं असें म्हणणारे फितूरी पिलाळ आपल्याकडे कांहीं थोड थोडके नाहींत.

' मिळे दीड हाजार माझा पगार
जयाच्या कृपेनें तयांनाच ' चोर '
म्हणाया तुम्हां काय वाटे न लाज
बघूं द्या कसें प्राप्त होतें स्वराज्य '

असें म्हणणारे लोक जेव्हां देशभक्तांना राजद्रोही म्हणतात तेव्हां कवि खिन्नपणें म्हणतो ' अहो, जो देशकार्यीं झटतो, देशबांधवांचें दुःख लयाला जाऊन सर्वजण सुखी व्हावे व देश उन्नत व्हावा याबद्दल झटणाऱ्यांना

राजद्रोही म्हणण्यास लोकांनीं धजावें यापरतें आश्चर्य कोणतें! ( केवढें आश्चर्य हें पान ३८ ) पण हें दीर्घकालीन पारतंत्र्य नष्ट होण्याचीं सुचिन्हें कवीस दिसूं लागलीं आहेत ( सुचिन्हें पान ४२ ) व 'परतंत्रता या' कवितेंत कवीची तळमळ कशी उत्कटतेनें दिसून येते पाहा.

'प्रिय हिंदभू पदिं शृंखला, पडला गळा गळफांस हा'
जहरी सुरी शिरली उरीं, विष थोर हें हृदयीं पहा ॥

पण उत्साहानें व धैर्यानें कवि म्हणतो —

प्रिय हिंदभूसुत केसरी रदनावली नखहीन ते ।
बघूनी तया डिवचूं नको सटवे अगे परतंत्रते ॥
नरसिंह जागृत जाहले नव चेतना स्फुरली मनीं ।
सविता दिसे अरुणाचलीं विलया निशातम जाउनी ॥

'सुचिन्हें' या कवितेंत सुद्धां कवीनें हीच आशा व्यक्त केली आहे व अलीकडील स्वातंत्र्य–संग्रामाचा डोळयासमोर घडत असलेला इतिहास पाहून कवीला हर्षाच्या नि आनंदाच्या उर्मि येतात व तो म्हणतो

'वाखाणण्या योग्य कामें स्त्रियांनीं, मुलांनीं करोनी जना दाविलीं ।
दास्यत्व पंकांत स्वाधीन पद्में अहाहा! अहाहा! दिसूं लागलीं ॥
स्वातंत्र्य–सूर्योदयाचीं सुचिन्हें दिसूं लागलीं हर्ष होतो मना
जाई लया ध्वांत अज्ञानरूपी करी पूर्ण माझी मनोकामना' ॥

सामाजिक विषयांत सुद्धां दांभिकतेचा तिरस्कार कवीनें जागजागीं व्यक्त केला आहे, व यांत उपरोधास्त्राचा सढळ हातानें उपयोग केला आहे. अस्पृष्टांच्या मूलभूत मानवी हक्काकडे तिरस्कारानें बघणाऱ्यांच्या विषयीं कवीचा तिटकारा व विरोध कसा व्यक्त झाला आहे पहा. 'मज्जाव कुणाला' या कवितेंत कवि अस्पृष्टास म्हणतो, बाबारे मज्जाव तुलाच आहे बरें,

टाहो फोडुं नको, उगा रडुं नको, तूं माय शोधूं नको,
घेऊं नांव नको, तिला शिवुं नको, घालूं मिठी तूं नको,
माते दुग्ध नको? असें पुसुं नको, तूं तोंड दावूं नको,
आम्हां कष्ट नको तुला शिण नको जा जा तिला तूं नको,

पण दुसऱ्याला मज्जाव नाहीं, फक्त तुलाच मज्जाव आहे, हें तूं ध्यानांत असूंदे. दीक्षितांचा उपरोध मनावर परिणाम केल्याशिवाय राहात नाहीं. सामाजिक व राजकीय अन्यायाची दीक्षितांना भयंकर चीड आहे व हे अन्याय दूर झाले तरच आपल्या राष्ट्रांस उन्नतीची आशा आहे, असें ते वारंवार बजावतात. पण हे अन्याय दूर व्हावे कसे, याला दीक्षितांच्या मतें एकच उपाय आहे आणि तो उपाय म्हणजे क्रांति. दीक्षित क्रांतिवादी आहेत. उत्क्रांतिवाद्यांचा सभ्यपणा त्यांना सहन होत नाहीं आणि म्हणून त्यांनीं ठिकठिकाणीं क्रांतीची स्तुति केली आहे व क्रांतीची देवता जी रणचंडिका तिला त्यांनीं वेळोवेळीं स्वागितलें आहे. क्रांतीचीं लक्षणें काय आहेत हें दाखवितांना ते म्हणतात.

क्रांति जनतारिणी दुष्ट-निर्दाळिणी
पारतंत्र्या तुझी वीरही नंदिनी
दास्य-बंधा क्षणीं तोडिते येउनी
वीरवर मोहिनी धैर्यधर स्वामिनी
वारुणी ही जणूं सेविता ती कुणी
चरचरा चिरिति रिपु खड्ग करिं घेउनी

व सामाजिक अन्यायाचें स्फूर्तिस्थान जी दुष्ट रूढि तिचा तर क्रांति पुढें टिकाव लागत नाहीं.

धर्म कर्माहुनी रूढि बलशालिनी
जाइ गृह सोडुनी क्रांति बघतां क्षणीं

— दीक्षित

कर्मठांचें उरीं शल्य ही भामिनी
ने वलें ओढुनी धुंद मंदाकिनी

क्रांतीच्या या पूजकानें समाज व देशसेवकांना क्रांतीचाच मार्ग अवलंबिण्याचा मंत्र दिला आहे. ' उद्बोधन ' या अनुवादित कवितेंत पण कवि हाच संदेश देतो.

क्रांति चंडिका विकट रूप धरि
नाचे थयथय असिधारेवरि
भैरव गान नादनभकंपित
जल स्थल सकल दिगंश ॥
उठ उठ तंद्रिल कलहंस ॥

दीक्षितांच्या निसर्गपर कवितांतून सुद्धां त्यांच्या मनांतील मुख्य भाव जे अन्यायाची चीड व विषमतेचा तिटकारा ते दिसून येतात. त्यामुळें ते कलेकरितां कला या तत्वाचे भोक्ते आहेत असें वाटत नाहीं. ' पावस प्रतिक्षा ' या कवितेची कल्पना सुद्धां दीक्षितांच्या मूलतत्वांशीं कशी जुळते तें पहा, " दिनराज जो सूर्य मदांध झाला हें पाहून त्याचे किरण सेवक हे स्वैर वर्तन करूं लागले. या नोकरशाहीनें जगांत धुमकूळ उडविला व अन्यायानें प्रजेस गांजण्यास सुरवात केली हा त्रास असह्य होऊन प्रजा दीन होऊन गेली. एवढा मोठा सिंधू नद तो सुद्धां तापानें तप्त होऊन गेला व झुरूं लागला. नाले, ओढे सरिता यांना सूर्यसेवक किरणांनीं पूर्णपणें लुटून आपलीं घरें भरलीं. अशा रीतीनें सर्व जगाला त्यांनीं त्राहि भगवान् करून सोडलें. पण हा अन्याय किती दिवस चालूं शकेल? वर्षाकालाला सुरवात झाली तेव्हां आपल्या पापकृत्याची जाणीव झालेला सूर्य ढगाआड जाऊन लपला. कवि विचारतो.

मत्त घनांनी सत्तेनें तूं प्रजा गांजिली जेव्हां
विचार कोठें गेला होता न्यायान्यायीं तेव्हां
अन्यायानें हरण करोनी जलधन सारें नेलें
कृष्णमेघ तें तेंच घनांना पाप पुढें तव आलें

दीक्षितांचें लक्ष्य निसर्गवर्णनाकडे दिसत नाहीं. त्यांच्या कवितेचा स्थायी भाव स्वातंत्र्य-प्रीति व अन्यायाची चीड हा आहे. त्यापुढें त्यांचीं इतर कवनें फिक्कीं पडतात. निसर्गाचा उपयोग त्यांनीं आपल्या मनासारखाच करून घेतला आहे. ग्रीष्माच्या सूर्याकडे पाहून त्यांना मदांध राजाची आठवण होते व त्याचे स्वैराचारी किरण पाहून नंग्या नोकरशाहीचें चित्र त्यांना दिसतें. वर्षाकालीन मेघाआड दडलेल्या सूर्याला ते मुळींच दया दाखवीत नाहींत. आपल्या चढत्या काळांत प्रजेचें जलधन लुटून नेण्यांत आलें, तेंच पाप आतां सूर्याच्या आड आलें आहे असें ते सुचवितात यावरून निसर्गाचा उपयोग दीक्षितांनीं फक्त आपल्या तत्त्व-प्रतिपादनाकडे केला आहे. त्यांच्या प्रणयपर कविता सुद्धां फिक्कट आहेत. प्रणय व शृंगारपर कवितांकडे दीक्षितांचें जवळ जवळ लक्ष्य नाहींच म्हटलें तरी चालेल. तिळगूळ घ्या अन् गोड बोला म्हणून सखीनें म्हटल्याबरोबर,

'भाषणीं मधु चाखिला तिज आननास्थित चाखुनी
मग, गोडगोडच बोलतो बोले पती कां नाकळे'

दीक्षितांस संसारसुखाचा लाभ झाला आहे असें दिसत नाहीं. गाडगीळांसारखीं घरगुती जीवनाचीं रमणीय चित्रें त्यांच्या कवितांतून दिसून येत नाहींतच पण कटु वाक्येंच त्यांच्या तोंडून निघतात. 'गारोड्यास' या कवितेंत ते म्हणतात.

तव नागिणी मणिधारिणी, मम भामिनी मजि धारिणी
विषधारिणी, भयदायिनी, तव काननीं, मम काननीं

मम मोहिनी गतिवामधें तव नागिणी सम पाहू

हीच कल्पना खालील ओळींत पहा

ग्रह नऊ तेही झाले प्रतिकूल

ऐक्य घरांतील जातां क्षणीं

दहाचा पोशिंदा फिरें दारोदारीं

दश पापाहारीं पडलेला

गार्हस्थ्य जीवनांत कटु अनुभव आल्याशिवाय असे उद्गार निघणें शक्य नाहीं. त्यांच्या ईशभक्तिपर कवितांचें मूळ यांतच सांपडेल असें वाटतें, कारण कोरकलासारखी दीक्षितांची प्रकृति मूलतःच अध्यात्मिक नाहीं, किंवा गाडगीळासारखा त्यांचा स्वभाव हळवाहि नाहीं. ते दुर्दम्य आशावादी आहेत व क्रांतिवादीही आहेत. अशा कवीनें मोठ्या कटु अनुभवामुळें वैतागूनच–

प्रथम गांठिलें काम शत्रुनें। गरल त्या सुधा मानिलें मनें

सुपथ मी जरी चूकलों हरी । कर धरून तो दाव सत्वरीं

हे उद्गार काढले असले पाहिजेत. दीक्षितांच्या ईश्वरविषयक कविता हृद्य आहेत. ' अर्चनसंमोह ' या कवितेंतील कल्पना उत्तम आहेत. जो प्रभु मांगल्यमय आहे त्याला गंधाक्षता व स्नान कशास हवें ' ज्याच्या उदरांत विश्व सांठलेलें आहे त्यास वस्त्र काय द्यायचें, ज्याचा आकार ठाऊक नाहीं त्याच्या गळ्यांत यज्ञोपवीत कसें घालावें, जो स्वयंप्रकाशी आहे त्याला दीप काय दाखवायाचा, जो निर्लेप व निर्विकारी आहे तो पुष्पें व फळें कशाला घेईल ? दीक्षितांच्या ईश्वरविषयक कवितांवरून त्यांचें मन अजून संशयाच्या आंदोल्यावरच झोके घेत आहे असें वाटतें. ' श्री. हंसराज मजला मम मार्ग दावी ' या कवितेंत त्यांनीं केलेले प्रश्न प्रत्येक त्रस्त मनुष्य

आपल्याशीं करीत असला पाहिजे. मी कोण, कशा कारणें माझा जन्म झाला आहे, त्यानें मला जगांत कशास धाडलें आहे, माया म्हणजे काय, मन कशास म्हणतात, पापपुण्याची ही काय भानगड आहे, मृत्यु म्हणजे काय, आत्मा म्हणजे काय, तो सृष्टा कुठें वसतो, या सर्व प्रश्नांनीं कवि भंडावून जाऊन शेवटीं त्याला कांहीं सुचत नाहीं. तो त्रासून देवाल विचारतो देवा तुला सगळीकडे धुंडाळिलें पण तुझा शोध लागला नाहीं, गुरु करा म्हणतात पण खऱ्या गुरूचा शोध कसा लागावा.

‘ तयांतुन खरा असे गुरु असें कसें जाणणें !
वकील वद पाहिजे जरि विभो ! तुला भेटणें ? ’

आध्यात्मिक विषयांत दीक्षित हे जसे संशयात्मक आहेत तसेंच जगांतील विषमतेचें कारण काय हें त्यांना कळत नाहीं. श्री. गाडगीळांच्या दृष्टीनें विषमता म्हणजे पूर्व संचिताचें फळ आहे, पण दीक्षित म्हणतात (वैचित्र्य पान १८)

“ योगायोगें भिन्नावस्था प्राप्त होतसे सर्वांस
परमेशाविण कारण याचें कळे न कोणा जीवास ”

मराठवाड्याच्या काव्यवाङ्मयांत श्री. दीक्षितांची जागा फार उच्च राहील. प्रादेशिक उल्लेख त्यांच्या कवितांतून फक्त एका ठिकाणीं आला आहे. ‘ मराठवाडा ’ या कवितेंत त्यांनीं मराठवाड्याची स्तुति केली आहे.

अघहरिणी ही सीना, पूर्णा, गोदावरी, महान,
प्राणाहिता अन् प्रवरा गाती प्रेमें सद्यश गान

व विचारतात— तो हा मराठवाडा जाण
मानघना ! तुज कसा साहवे पदोपदीं अवमान ?

कशास मेल्यापरी जिणें हें, करी आत्मबलिदान
माझा मराठवाडा जाण
" भार शिरावरि दूर किती तरि ध्येय निवासस्थान "
कां करिशी श्रम वाट चालिचे ठावें जों न ठिकाण
माझा मराठवाडा जाण

दीक्षितांचें मराठवाड्याला हेंच सांगणें आहे कीं, अगोदर ध्येयाची निश्चिति झाली पाहिजे व मग मराठवाड्यानें त्या ध्येयपूर्तीकरितां आत्मबलिदानास तयार झालें पाहिजे. इतका स्पष्ट संदेश मराठवाड्यांतल्या कोणत्याहि कवीनें दिला नाहीं. यांतच दीक्षितांच्या काव्याचें वैशिष्ट्य आहे.

दीक्षितांची भाषा खडबडीत व ओबड धोबड आहे. पुष्कळ वेळां त्यांना कविता करतांना कष्ट पडत असावेत कीं काय अशी शंका येते. संस्कृत शब्दांची रेलचेल त्यांनीं आपल्या कवितांतून उडवून दिली आहे. त्यामुळें सहज मधुर असे मराठी शब्द त्यांना सुचले नसावेत अथवा सुचले असले तरी ते वापरण्यांत त्यांनीं आळस केला असावा असें वाटतें. त्या मानानें त्यांचें ज्ञातिबंधु जळगांवचे दु. आ. तिवारी यांचीं ' मराठ्यांचीं संग्रामगीतें ' भाषेच्या दृष्टीनें जास्त नैसर्गिक वाटतात. कांहीं कांहीं ठिकाणीं लांब लांब समास उपयोगिले गेले आहेत ' चित्सुधा मधुपणा लोपुन, पाप पंकिल कीट ' असे शब्द सढळ हातानें वापरण्यांत आले आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं शब्दप्रयोग चुकीचे घातले आहेत. कवीनें आड रानांतील फूल तोडलें तेव्हां तें त्यांस हंसून बोललें. असा शब्द प्रयोग आहे पण.

प्रभु कोपला तुज लाभलों

म्हणणारें फूल हंसून बोललें हा शब्द प्रयोग जरा चमत्कारिक वाटतो. ' दे माय धरणी ठाय ' या कवितेंत ( पान ५८ ) जगन्मातेस बालकाचा सांभाळ करण्याची विनंति केली आहे पण शेवटचे कडवें.

मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

कानोसा मीं यदा घेतला, मला वाटलें जिवलग आला
दार मोकळें केलें त्याला, पण हें काय पणती ती विझोनी जाय
देईग माय बालिकेस धरणी ठाय

एकाच कवितेत मातृस्वरूप म्हणून कल्पिलेल्या परमेश्वरास जिवलग सखा कल्पणें हें चमत्कारिक वाटतें. श्री. दीक्षितांना मंदारमाला, आर्या, पंचचामर इत्यादि ऐसपैस वृत्तें सोयीचीं म्हणून आवडतात असें दिसतें. लहान वृत्तें लिहिण्यांत त्यांना संस्कृत शब्दांचा वाजवीपेक्षां जास्त आसरा घ्यावा लागतो अशी शंका आल्यावांचून राहत नाहीं. दीक्षितांच्या मराठीनें कुठें हिंदी वेष धारण केला आहे. पण अशा पोशाखांत तिनें लक्ष्य वेधून घेतलें तरी मनाला मोह पडत नाहीं. दीक्षितांच्या कवितांतून भाषेचें सौंदर्य किंवा लालित्य यांची अपेक्षा करतां येत नाहीं. पण विचारांचा जोम, उत्कट व आवेशपूर्ण कल्पना, हृदयाची तळमळ व क्रांतीची त्यांनीं केलेली तरफदारी याला भाषेचा खडबडीतपणा शोभून दिसतो.

श्री. दीक्षितांचें मराठवाड्यांतील वाङ्मयांत काय स्थान आहे? मराठवाड्याचे ते पहिले राष्ट्रीय कवि आहेत. कांत व कृष्णाकुमारांच्या सामाजिक बंडखोरीच्या कल्पनेला त्यांनीं मूर्त नि व्यवस्थित स्वरूप दिलें आहे. भोंवतालच्या जगांत घडणाऱ्या घडामोडींचे परिणाम त्यांच्या मनावर इतरांपेक्षां जास्त झाले आहेत. त्यांना सामाजिक नि इतर अन्यायाची चीड आहे व तो अन्याय दूर करण्याकरितां त्यांनीं क्रांतीचा मार्ग पुरस्कारिला आहे. प्रणयाकडे किंवा निसर्गाकडे लक्ष्य देण्यास त्यांना अवकाश नाहीं. त्याचा उपयोग केला तरी त्यांनीं आपल्या तत्त्वप्रतिपादनाकडे केला आहे. फुलांकडून कोरेकलांना नाशवंत जगाचा संदेश मिळतो, तर दीक्षितांना फुलांचें इति कर्तव्य राष्ट्रभक्ताच्या पदकमलानें पुनीत झालेल्या धुळींत लोळण्यांतच

— दीक्षित

आहे असें वाटतें. मराठवाड्याच्या वाङ्मयांत दीक्षितांना जें स्थान प्राप्त झालें आहे तें त्यांच्या तळमळीमुळें, उत्कटतेमुळें प्राप्त झालें आहे, इतकेंच नव्हे तर त्यांचा संदेश जो त्यांनीं दिला आहे त्यामुळें प्राप्त झालें आहे. ध्येयाची निश्चिति व त्याकरितां आत्मबलिदानाची आवश्यकता हा त्यांचा संदेश आहे. पदलालित्यांत दीक्षितांच्या कविता इतर कवींच्या बरोबर येत नाहींत पण ओज नि आवेश, उत्कटता व तळमळ आणि भविष्यकालाच्या स्वरूपाचें निश्चित आकलन यामुळें दीक्षितांच्या कविता एकमेवाद्वितीयच झाल्या आहेत. मराठवाड्याच्या काव्यवाङ्मयांतील नव्या दमाच्या या नव्या शिपायाचें स्वागत असो.



# ७

## नांदापुरकरांची कविता.

जन्म १४ - ९ - १९०१

कळमनुरीहून परभणीस जाण्याच्या उद्देशानें नांदापूर स्टेशनकडे चाललों होतों. गाडीचे बैल खुलखुळ करीत कयाधू नदीच्या पात्रांत शिरले. पाणी फक्त कमरेपर्यंत होतें. समोरच्या महारानीं शीळ घातली व बैल पाणी पिऊं लागले. मी गाडींत बसून टाइम्सचा अंक वाचीत होतों. इतक्यांत एक वृद्ध आणि एक तरुण असे गाडीच्या जवळ आले. त्या तरुणाच्या चेहऱ्यावर साधेपणा, कांहींशी विरक्तावस्था व विद्येचा विनय हीं एकवटलेलीं दिसलीं. पाहतांच वाटलें कीं, हा कोणीतरी अगदी साधा व रसिक तरुण आहे. मी हंसतहंसत नमस्कार केला; तोंच कोणीसे म्हणालें ' हेच ते कवि नांदापुरकर '

आणि नांदापुरकरांच्या काव्यांत सर्वांत जास्त साधेपणा व सरळपणा ओतप्रोत भरलेला दिसतो. कवि माधवानुजाच्या कवितेविषयीं माडखोल-कारांनीं उद्गार काढले आहेत. कीं, 'शुचिता व साधेपणा हे माधवानु-जांच्या काव्याचे प्रमुख गुण या छोट्या कवितेंत प्रतिबिंबित झाले आहेत इतकेंच नव्हे तर त्यांच्या काव्यांत जी अव्याज उदासीनतेची गोडी भरून राहिली आहे तिचीही छटा या कवितेंत आढळते" हेच उद्गार बरोबर नांदापूरकरांच्या कवितांना लागू पडतील. नांदापूरकरांचा 'वाग्विलास' प्रसिद्ध होऊन आज उणीं पुरीं दहा वर्षे झालीं. तेव्हांपासून त्यांनीं काव्याचें कांहीं लिखाण केलें आहे कीं नाहीं हे माहीत नाहीं पण त्यांच्या वाग्विला-सानें मात्र त्यांना मराठवाड्याच्या उदयोन्मुख कवीच्या पुढील मालिकेंत नेऊन बसविलें आहे खास.

त्यांच्या या छोट्याश्या पुस्तकांत एकंदरींत सदतिस अडतिस कविता आहे. त्यांत जवळ जवळ वीस कविता निसर्गवर्णनपर आहेत. सात आठ कविता प्रेम वर्णनपर आहेत, तीन कविता ऐतिहासिक. चार पांच कविता ईश्वर भक्तिपर व एक कविता सामाजिक व बाकीच्या इतर विषयांवर आहेत.

त्यांच्या निसर्गवर्णनपर कवितांतून त्यांची प्रतिभा विशेष चमकली आहे. कवितांच्या नांवावरूनच त्यांचा रसिकपणा दिसून येतो ' हीं फुलें मुलें वेलीचीं ' ' निसर्ग संगीत ' ' सृष्टीचे डोहाळे ' ' गुलाब ' ' मूल व फूल ' दिशा दिशांची कळी खुले. ' अमावास्येच्या रात्री ' ' काळोख ' वगैरे कवितांतून त्यांचें असीम निसर्गप्रेम दिसून येतें.

फुलांच्याकडे पाहून तर त्यांना प्रेमाचें भरतें येतें. त्यांना पाहून ते आनंदानें नाचूं लागतात.

आलितती, सवे विहरती, मुदें डोलती,
मुलें स्वर्गींचीं, हीं फुलें मुलें वेलींचीं

असें त्यांना वाटतें. आनंदाच्या भरांत फुलांना ते निरनिराळ्या उपमा देतात. कधीं त्यांना ते 'कृपा देवाची' समजतात तर कधीं त्यांना विखु-रलेले माणि वाटतात, तर त्यांना तीं फुलें केव्हां कामिनींच्या हृदयाची ठेव आहे असें वाटतें. गुलाबांच्या फुलाकडे पाहून त्यांना

गुलाब खालीं वरतिं गडे
गुलाब भरला चोंहिकडे

असें वाटूं लागतें. सर्व चराचरांत, अंतराळांत, हृदयांत, मनांत जिकडे तिकडे गुलाबच त्यांना दिसतात. गुलाब हें रसिकतेचें चिन्ह आहे, गुलाब हें तारुण्याचे लक्षण आहे, गुलाब हें प्रेमाचें प्रतीक आहे, गुलाबा-शिवाय जगांत आनंद नाहीं.

युवतीला कीं ये नवती
रंग उसळला, मोद मिसळला, जगा लाधला
गुलाब खालीं वरतिं गडे
गुलाब भरला चोंहिकडे

असें त्यांना दिसूं लागतें. अरुण येतांच उषेच्या गालीं गुलाबी येते.

युवतीच्या हृदयांत वसे
प्रेम बोलती तशा, पिसे
तेंच कपोलीं पहा ठसा
गुलाब फुलला हंसत कसा

असें जिकडे तिकडे त्यांना गुलाबाचेंच आधिराज्य दिसतें. शिशूंत गुलाब, कविच्या काव्यांत गुलाब, व अंतराळांत ही गुलाबच त्यांना दिसतो.

फुलांच्या खालोखाल नांदापुरकरांना मुलांविषयीं फार प्रेम वाटतें. मुलांना फुलांची व फुलांना मुलांची उपमा ही त्यांची अत्यंत आवडती

— तांदापूरकर

‘ रानीं फूल गृहांत मूल वितरी शोभा जगीं बोलती ’

असेंच त्यांना वाटतें. निसर्गात त्यांना मुलें व फुलें जास्त आवडतात पण निसर्गाच्या इतर मनोवेधक वस्तूंवर त्यांचें प्रेम नाहीं असें नाहीं “ सृष्टीचे डोहाळे ” या रम्य कवितेंत त्यांनीं निसर्गाला नानाप्रकारें आळविलें आहे. त्यांना निसर्गाचें संगीत ऐकूं येतें व त्यांत तें गुंगून जातात.

गुजगुज गोष्टी करित कोकिळा
मैना गानें मोहित सकळा
बुलबुल ताना घे अलबेला
शुकहि डुले गानांत–बुडाला निसर्ग संगीतांत,,

त्यांना वनराणीच्या निर्झर गाण्यांत, गिरींच्या गान समाधींत, तारांच्या दीपरागांत, जलतरंगांत त्यांना जिकडे तिकडे संगीत दिसतें. पण या संगीतांत व निसर्गाच्या चेतनेंत त्यांना एक गोष्ट प्रामुख्यानें आढळते आणि ती म्हणजे प्रेम. प्रेमाच्या मर्यादेनें सर्व निसर्ग बांधला गेला आहे. सर्व चराचरांतून एकच सूर वाहतो आणि तो म्हणजे प्रेमाचा. या प्रेमावर सर्व जग चाललें आहे. जगाला प्रेमाचें बंधन नाहीं तर जगांत राम नाहीं; हें त्यांचें तत्वज्ञान आहे. ‘ प्रेमासाठीं या कवितेंत त्यांनीं आपली फिलॉसफी विशद केली आहे. सूर्य उषेचेपाठीं प्रेमासाठीं फिरतो, प्रेमासाठींच गंगेनें आपलें उच्च कुल सोडून सागराबरोबर पतन पत्करलें, पूर्ण चंद्र पाहातांच सागराला भरतें येतें तें प्रेमामुळेंच, दीपशिखेवर पतंग प्रेमामुळेंच झेंप घेतो कळया भ्रमरासाठींच्या प्रेमामुळेंच उमलतात. हें सर्व सांगून ते म्हणतात.

‘ विश्व वेदिका व्यापुनि उरला प्रेमाचा विस्तार
प्रेमासाठीं विश्व निर्मितो ईशहि वारंवार ’

असें त्यांना प्रेमाचें महत्व वाटतें. प्रेम हें ईश्वरी सूत्र आहे हें त्यांना

वाटतें त्यांचें तत्व आहे. पण यावरून प्रेमी लोक जे अल्प काळ प्रेम करून सोडून देतात याची त्यांना चीड येते.

मधु जरी, नसे अंतरीं, म्हणुनि कां तरी
शोभते जाणें, व्यर्थ हें जगीं या जगणें

असें त्यांना निराश कलिकेबरोबर वाटतें.

' हृदय कपाटीं प्रीत कोंदली दुर्विधिनें परि जाय उडून
ती कुणी आणावी तिथें फिरून '

असे त्यांचे निराशेचे बोल निघतात. कवि नांदापूर हे खरेखुरे निसर्गाचें कवि आहेत. निसर्गाला अधिष्ठान प्रेमाचें आहे व प्रेमाशिवाय जगांत एक पानही हालत नाहीं हें त्यांचें ब्रीद आहे. पण एकदां प्रीत उडाली म्हणजे पुन्हां जुळणें कठीण असें त्यांना वाटतें. ' हरवलेली प्रीत ' यांत ते म्हणतात.

" मधुकर सरसीं पुष्पीं बैसे
मधु सरता तो जाय उडून
तो कुणी आणावा तिथें फिरून "

याप्रमाणें नांदापूरकरांनीं निसर्ग सुंदरीची निरनिराळ्या प्रकारें स्तुति केली आहे पण निसर्गाचें सर्वांत जास्त मनोवेधक असें जें प्रतीक म्हणजे स्त्री तिकडे त्यांनीं फक्त ओझरती दृष्टि टाकिली आहे. याचा अर्थ त्यांना स्त्रीवर्णनें साधत नाहींत असा नाहीं. ' ही कोण ' ' पूर्णा कांठीं ' वगैरे कवितेंत त्यांनीं बहारच केली आहे. नागर रमणीपेक्षां त्यांना ग्रामकन्या जास्त आवडतात असें दिसतें.

पूर्णा कांठीं वसे गोरटी जणूं धाकटी रती दिसे
वर्णूं मी तद्रूप कसें! शेषाची जिथे मती नसे

असें आपल्या पूर्णाकांठच्या सुंदरीचें तें वर्णन करतात. त्यांना

सुंदरीला पाहून प्रभात रमणीच्या, जाई जुईच्या, बकुळीच्या मधुमासाच्या गोड उपमा सुचतात. ओठांना पारिजात फुलांच्या देठाची, दांताला हिरकण्यांची, भाषणाला सारिकेच्या मंजुस्वनाची अशा उपमा त्यांनीं दिल्या आहेत. तसेंच ' ही कोण ' या कवितेंत मुद्धां त्यांनीं उपमा उत्प्रेक्षांची कमाल करून सोडली आहे.

' रंभा आली कुण्या शुकाचा पाहावया अंत,
गोतें खाती गालावरच्या भोवऱ्यांत संत
मदन–दहन–दर्पास हरवु ये रतिच मूर्तिमंत
पद्मवदन पाहोनि वदावे शिवेंहि हा! हंत
कुण्या रानिचा गुलाब पिकला देह धरुनि उठला
चंदन लतिका फिरे तयास्तव परिमळही सुटला '

वगैरे रमणीय उपमा हीं शृंगाररसाचीं शृंगारस्थानेंच होत यांत संशय नाहीं. पण नांदापूरकरांचा शृंगार हा उत्तान नाहीं. त्यांच्या शृंगाराला खानदानीपणाची मर्यादा आहे. मनाला चटका लावून हृदयांत गोड हेलावे उत्पन्न करणारा शृंगार आहे.

उपवन पवनहि शांत वसंतहि बहु आंब्यांची राई
उडून गेला राघू यास्तव झुरते मैनाताई '

असें त्यांना हळुवारपणें सुचवायचें असतें. त्यांचा शृंगार हुरहूर उत्पन्न करतो. तो मादक नाहीं पण मोद देणारा आहे. मदन मस्तांची मस्ती त्याच्यांत नाहीं तर जाईजुईची शुचिता व निर्व्याजता त्यांत सांपडेल

पण काय असेल तें असो नांदापुरकरांच्या कवनांत एक प्रकारची उदासीनता दिसून येते. वर्णन करतांना त्यांना तग धरवत नाहीं. लगेंच त्यांची दृष्टि अंतर्मुखी बनते व फुलांचें मनोहारित्व सांगतांना त्यांना त्यांचे अल्पायुत्व दिसून ते उदास बनतात.

जीवन, असें कां क्षण, जनांकारण
कळविती सुचीं, हीं फुलें मुलें वेलींचीं

असें ते उदासपणें गुणगुणतात. मतपुष्पाला पाहून ते विरह व्याकुल-तेनें म्हणतात.

रजनीस, लागला लळा, तुझा कोमळा
पहा वर मळा, प्रीतिचा पिकला
परिदेह तुझा कां असा अकालीं सुकला

आपल्याच तल्लीनतेंत फिरणारा —

भोंवरा, फिर गरगरा, बोध शिकवाया
जातसे घडीनें घडी आयु हें वाया

हेंच शिकवितो—

डोलला, काय बोलला, एक कानांत
'तव वृत्ति असों दे लीन ईश–गानांत'

हीच शिकवण त्यांना मिळते. यावरून नांदापुरकरांची दृष्टि अंतर्मुखी बनलेली आहे, हें कळून येईल. व भक्तिपर आयुष्याकडे त्यांचा किती ओढा आहे हेंही कळतें. त्यांच्या ईशस्तवनपर कल्पना पाहून हा कवि इतक्या तारुण्यांत पश्चातप्त कां झाला याचें आश्चर्य वाटतें !

सकल पातक भस्म करीतसे
अनुपमेय यश दे मजला तसें
म्हणुनि याचितसें कमलापती
उपरती बरती मज दे रती

असें ते देवाला आळवतात. परमेश्वर-स्तवनाकडे ते चटकन् वळतात. त्यांची वृत्ति वैराग्यशील आहे. त्यांना प्रत्येक गोष्टींत ईश्वरीसूत्र दिसतें

नांदापूरकर

व ईश्वरभक्तीचा धडा मिळतो.

नांदापुरकरांनीं कांहीं ऐतिहासिक कविता केल्या आहेत पण त्यांच्यांत ओज दिसत नाहीं. त्यां वाचून लुटपुटीच्या लढायांची आठवण होते. स्फुरण संचारत नाहीं. त्या रणमैदानावर सावरकर किंवा तिवारी यांनींच वावरावें. या विरागी व निर्व्याज कवीला त्यांत स्थान नाहीं. त्यांनीं सामाजिक अशी एकच कविता लिहिली आहे ती अस्पृश्यावर आहे. पण त्यांतही त्यांचा 'इंटरेस्ट' बौद्धिक वाटतो.

नांदापुरकरांचें भाषा प्रभुत्व असामान्य आहे. मराठवाड्यांत तरी ही गोष्ट आश्चर्यकारक वाटते व कविता करतांना त्यांना कष्ट पडतात असें वाटत नाहीं. त्यांनीं निरनिराळीं वृत्तें अभ्यासिलीं आहेत व ते कोणत्याही वृत्तांत लीलेनें गाऊन कविता करूं शकतात. कांहीं कांहीं ठिकाणीं शब्द क्लिष्ट वापरण्याकडे त्यांची प्रवृत्ति आहे. त्यावरून त्यांच्या कवितेवर कवि मोरोपंतांची बरीच छाया पडली आहे असें वाटतें. त्यांच्या अर्थांत साधेपणा आहे शब्दांत नाहीं कधीं कधीं खालीलसारख्या क्लिष्ट ओळी कानाला त्रास देतात.

भाल्ल् तरक्षु लक्षित पथा पक्षार्थ भक्षार्थना

पण अशा ओळी फार नाहींत. त्यांनीं उपमांची सढळ हातानें खैरात केली आहे. फुलाविषयीं त्यांची उपमा पाहा.

डुलतांत, निजानंदांत, जशीं काव्यांत
मनें रसिकांचीं

किंवा — जणुं कवी, अंकिं वागवी, प्रेम पाजवी
सुपुत्री विधिची

किंवा — सुकविता, रसिकवर नुता, कवीच्या सुता
फुलें सुरमाचीं

अशा काव्यमय उपमा त्यांनीं दिल्या आहेत. बहुतेक उपमा स्वतंत्र किंवा देशी आहेत. परदेशी कल्पना कमी व क्वचित् जसे —

' दीपशिखेवर शलभ झेंप घे, मरोनि अंतीं जाइ

पण अशा परदेशी कल्पना क्वचित् आहेत. त्यांनीं परकी कवींच्या कवितांचीं रूपांतरें केलीं आहेत तीं फार सरस वठलीं आहेत. 'पूर्णाकाठीं' 'प्रिय माझी कळि लाल गुलाबाची' किंवा 'प्रणय पराग' या कवितांवर त्यांनीं देशिकार लेणें चढवून त्यांना आपलेंसें केलें आहे. कधीं कधीं त्यांच्या कल्पना कांहींशा विचित्र वाटतात.

' रडुनी रडुनी गोऱ्या मोऱ्या बघ झाल्या नारी '

रडुन रडुन नारीचे डोळे सुजतात. गोऱ्या मोऱ्या हा शब्दप्रयोग रडण्याच्या पूर्वी वापरतात; नंतर नाहीं. पण असे दोष एकंदरीनें कमीच.

नांदापुरकरांच्या कविता अशा आहेत. त्यांची काव्यसुंदरी ही एक प्रौढ तरुणी आहे. तिच्यांत नाज आहे पण नखरा नाहीं. ती चार लोकांत तोंड उघडतांना लाजते, पण एकांतांत मधुर मधुर भाषण करते. निसर्ग पाहून तिच्या हृदयांत आनंदाचें भरतें येतें पण तें मर्यादेंत असतें, तीला सर्व विश्वाविषयीं प्रेम वाटतें पण तें प्रेम उच्छृंखल नसतें. तिला उत्तान शृंगार चेष्टा आवडत नाहींत पण सूचक शृंगारानें तिला गुदगुल्या होतात. तिला काळोख किंवा अंधार आवडत नाहीं. तिला अमावस्येस सुद्धां चंद्र असावा असें वाटतें. तिला प्रेमाचीं निराशा अनुभवास आली आहे त्यामुळें कांहींसें गांभीर्य तिच्यांत आलें आहे. तिच्या वृत्तीवर कांहींशीं उदासीनता पसरली आहे. व तिची दृष्टि कांहींशीं अंतर्मुख आहे. ती सोसायटींत आपल्या कटाक्षानें हृदयें चुरडून टाकणारी तारका नाहीं तर नदी–किनारीं एकांतांत सृष्टीच्या सहवासांत समरस होऊन गूढ तत्वें शोधणारी

— नांदापूरकर

निर्व्याज मनोहर, सुंदर व मनाला चटका लावणारी तरुण तापसी आहे. तिला पाहून मनांत उत्तानपणा येत नाहीं तर गोड हुरहुरीचे हेलावे उत्पन्न होतात. व तिच्या विषयीं आदर वाटतो. नांदापुरकरांची कविता–कामिनी ही साधी, सुंदर, सरळ, निसर्गप्रिय व खानदानीची आहे. जगाची धब-पड तिला आवडत नाहीं. तिला निसर्गाची संगत प्रिय वाटते, व तेथेंच राहावेसें वाटते.

नांदापुरकरांना कवीचा मोठा अभिमान वाटतो. कवीच्या कर्तव्या-विषयीं ते म्हणतात.

' आम्ही सोडवितों, जगा अडविता जो प्रश्न ' मी कोण ' तो '

मराठवाडीच्या उदयोन्मुख कवींनीं हीच दृष्टि ठेवल्यास कवढे तरी राष्ट्र-कार्य करतां येईल. नांदापुरकरांनीं एका मागून एक सरस काव्यें लिहा-वींत व मराठवाडीच्या नवयुगाचा जरिपटका हातांत धरावा अशी त्यांना आमची आग्रहाची विनंति आहे.

८

# मनाठकरांची कविता.

जन्म १० - २ - १९०२

श्री. मनाठकरांचा आणि माझा परिचय असा प्रत्यक्ष नाहीं. पण त्यांची व माझी गांठ फक्त एकदांच पडली आहे. इ. स. १९३३ चा सप्टेंबर महिना. श्री. बीदरकरांबरोबर मी त्यांच्या घरीं गप्पा मारीत बसलों होतों. तों जवळच्या घरच्या गच्चीवर एक तरुण उदास वृत्तीनें आकाशाकडे पाहात उभा होता. बीदरकरांनीं सांगितलें, " कृष्णाकुमार तेच पहा ' जानकी काव्याचे ' कर्ते मनाठकर, चला तुमची गांठ घालून देतों. "

आम्ही मनाठकरांच्या घरीं गेलों. त्या वेळीं ते एकटेच होते. बीदरकरांच्या आग्रहावरून त्यांनीं आपल्या बऱ्याचशा कविता वाचून दाखविल्या. कांहीं शृंगारपर होत्या. त्या कविता माझ्या आठवणींत आतां राहिल्या

नाहींत. पण मंजुमाधवांची कविता ' शिरि घागर पाझरते मार्ग सख्या! रोखुं नका ' ऐकिली कीं मला हटकून मनाठकरांची आठवण होते.

पण मनाठकरांच्या भेटीचा जो ठसा माझ्या मनावर उमटला आहे तो एकंदरीनें उदासपणाचाच आहे. तरुण वयांत एकाएकी व एकामागून एक बरींच संकटें कोसळावीं व त्याला तोंड देऊन माणसानें ताठ उभे राहिलें तरी आंतून खिळखिळें व्हावें, तसेंच मला मनाठकरांच्या विषयीं वाटतें. अन् त्यामुळेंच त्यांचें ' जानकी काव्य ' वाचून मन विषण्ण होतें. हें काव्य शोकपर्यवसायी खरेंच पण तें लिहिणारा हा स्वतःच फार मोठ्या शोककालांतून गेला असल अशी साक्ष या काव्यांतून पटते व हृदय ओलें झाल्याशिवाय रहात नाहीं.

प्रस्तावनेंत श्री. ना. दा. सावरकरांनीं म्हटल्याप्रमाणें जानकी काव्याचें कथानक अगदीं साधें आहे.

तालंगगांवचा कुळकर्णी नाना म्हणून असतो त्याची मुलगी जानकी. माहेरचें नांव गौरी, हीच या काव्याची नायिका होय. नानाची बायको रमाई ही गौरीला आपल्या मागें सोडून मरण पावते.

उषेसी देउनी जन्म
लया जाते निशा जशी

नानावर पडलेला देवाचा घाला हा असह्य झाला असता पण गौरीच्या वदनांबुजाकडे पाहून त्यांच्या पत्नीच्या वियोग–दुःखाची धार बोथटूं लागली. गौरीच्या बाळलीलांनीं नानांचें मन रमूं लागलें. लोक सुद्धां हळहळ करीत नि म्हणत कीं,

उजेडावांचुनी फूल
मूल आईविना तसें

रमाई आज असती तर किती बरें झालें असतें. अशा रीतीनें नाना आपला काळ कंठीत असतां त्याला एक दिवस कामानिमित्त फिरतीवर जावें लागलें, रस्त्यावर त्याला पावसानें गांठलें. पाऊस थांबतांच तो घरीं परत आला पण दुसऱ्या दिवसांपासूनच त्याच्या अंगांत ताप खेळूं लागला. हें दुखणें त्याचें शेवटचेंच ठरलें. नानानें त्यावेळीं आपला विश्वासू मित्र सांब जोशी यास बोलावूं पाठविलें. सांब, आपली बायको वारल्यापासून विरक्त बनून केदार वनांत राहत असे. तो आल्यानंतर नानानें त्याजपाशीं आपलें हृदय मोकळें केलें. शुश्रुषा योग्य होऊनही नानाचा ताप हटेना तेव्हां त्यानें गौरीला सांबच्या पदरांत घातली व आपण निजधामास गेला.

नानाच्या मृत्यूनंतर सांबाला गांवांत राहवेना. तो गौरीला घेऊन केदार वनांत राहण्यास आला. तेथें माई या नांवाची वृद्ध स्त्री महादेवाची सेवा करीत असे. तिनें गौरीला संभाळावयास घेतलें. गौरी केदारवनांतील वातावरणांत हळूं हळूं आनंदी बनूं लागली. तेथें तिनें एक हरिणी पाळली व तिच्याबरोबर ती आपला वेळ घालवूं लागली. कधीं गौरी गाणें म्हणे आणि त्यावेळीं गायनानें सगळा आश्रम गुंगून जाई. कधीं कधीं ती माईला दळण्यांत साथ करीते त्यावेळीं,

" उभे किरण भानूचे कुडासी गान ऐकण्या " आणि गौरीच्या गाण्यान माईला आनंद होई. पुढें हरिणी एकाएकीं आश्रमामधून नाहीं-शी होते. त्याचें दुःख गौरीस अनिवार होतें पण ती कपिला गाईवर प्रेम करूं लागते. अशा प्रमाणें काळ चालला असतां गौरीनें तारुण्यांत प्रवेश केला

वयाचें दार तेरावें उघडें रम्य गौरीच्या
तारुण्याची कळी रम्य लागलीसे फुलावया
आलिंगी गोड अंगासी, कोंवळया परिपक्वता

रंग चाफेकळी शोभे, शोभली वनदेवता
लाली तेजाळ ओठांची लाजवी पारिजातका
लोचनीं तेज चंद्राचें, रम्याननीं खुले सुधा

माईनें गौरीला गृहिणीचीं कर्तव्यें पण शिकविलीं. पुढें सावानें मावण गांवचा राघव याचा पुत्र केशव हा तरुण होता,

पिवळाई खुले देहीं वाढत्या हर्षवार्धिनी
विनयादि मनोहारी गुण गेले विकासुनी

त्याला गौरी अर्पण केली. गौरीचें सासरचें नांव जानकी ठेवण्यांत आलें. पुढें कांहीं दिवसांनीं जानकीस पुत्र झाला, त्याचें नांव प्रभाकर ठेवण्यांत आलें. त्याला कडेवर घेऊन केशव गच्चीवर फिरत असतां जानकी रडत रडत वर आलेली त्याला दिसली. त्यानें विचारपूस केली तेव्हां जानकीनें गहिंवरून म्हटलें·

नाहीं माहेर, ना कोणी, कांहीं त्याचें न वाटलें
मिळणार कसें फार जरी थोडेंच वाहिलें
अन्याय रचिले कोटी घातले पोटीं नाथजी
इतुकें बोलुनी आला जानकी कंठ दाटुनी

पण केशव, जानकीचें परोपरी सांत्वन करतो व गुरुजनांचीं बोलणीं आपल्या हिताकरितांच असतात, तीं सहन केलीं पाहिजेत, जिवाचा त्रागा करून घेणें चांगलें नाहीं, वगैरे गोष्टी सांगून तिची समजूत घालतो. पुढें तो थोड्याच दिवसांनीं विद्यासंपादनार्थ पुण्यास जातो. तेथें ज्याच्या घरांत तो भाड्यानें राहतो त्या घरमालकाची विधवा मुलगी त्याच्यावर अनुरक्त होते व शेवटीं, —

डंवरले तिचे नेत्र, झांकले वाहू लागले
केशवाच्या मनाचाही लागला झोंक जावया

मन्मथा! काय तूझी ही गड्या! विघन चातुरी!
समाधी शांमवी भंग; पामरांची कथा किती!

अशा रीतीनें झोंक गेलेला केशव गांवास परत येतो. असाच तो एके दिवशीं दुपारीं निजला असतां कोणीं तरी खालील प्रकारें जानकीविषयीं बोललेलें त्यांस ऐकूं आलें.

पराया बोलणें सोपें! विचारी जानकी, मना,
आपुली झोंपडी पेटे, विझवावी बये. अधीं
मिरवीसी कशा तोरा! वरीगे मूठ झांकली!
बाभळी ह्याच गांवींच्या जियें ती बोर वाढली
मुलें होती तुम्हा ताई, कांत राहोनही दुरी!
भागीरथी सदा शुद्ध! आंत सांठे किती तरी.

हे शेजारणीचे शद्ब ऐकतांच केशवाच्या हृदयांत भाला घुसल्यासारखें वाटलें व आपल्या पत्नीबद्दल भलताच संशय घेऊन तो तिला मारण्याकरितां उठला पण विवेक धरून तो विचार त्यानें मनांतून काढून टाकिला. पण मनांत संशय–पिशाचानें ठाणें दिलें तें दिलेंच व केशवजानकीच्या गृहसौख्यांत त्यानें माती कालविली. त्या दांपत्याचें जीवन भकास झालें व जानकी

प्रेमाच्या जीवनें दिव्य वाढली कल्पवल्लरी
सुकता तो झरा दिव्य, सुकाया तीहि लागली

अशा मनोमालिन्याच्या स्थितींतच गांवांत प्लेगचा कहर झाला. केशवाला त्यानें गांठलें. मृत्यू जवळ आला पाहून जानकीला केशवानें जवळ बोलाविलें व तिला परोपरीनें उपदेश केला व तिला विचारलें.

'पडणें नाहि ना कांते, पाऊल वांकडें पुन्हां'

तेव्हां जानकीच्या हृदयांत लख्ख प्रकाश पडला व तिनें कळवळून केशवास म्हटलें,

— मनाठकर

दुर्दैवें माझिया आली शंका घोर अशी तुम्हां
पाउलें हींच साक्षीहो, गंगशी नाथ शुद्ध मी

व तुम्ही जाण्यास निघाल्यावर मला तरी या जगांत राहून काय करावयाचें आहे म्हणून जानकीनें प्रभाकरला—आपल्या मुलाला केशवाजवळ ठेवलें व ती मृत्यूकडे निघून गेली. अन् मग.

मावणी गाढ अंधारीं बुडलेल्या गृहांतुनी
' आई बाबा ' निघे दीन मध्यरात्रीं असा ध्वनी
करुणापूर्ण भेसूर आतांही तोच ऐकुनी
ढाळिती मावणी अश्रू देव सारे नभांतुनी

असें हें काव्याचें कथानक आहे. या काव्यास लिहिलेल्या प्रस्तावनेंत ना. दा. सावरकर म्हणतात. कीं ' या कथेचें नांव ' जानकी काव्य ' हें जरा आंतील कथेच्या मानानें अवजड वाटतें. पण या कथानकांत जानकीची जन्मापासून मरणापर्यंत आलेली कथा वाचून या काव्याची नायिका ही जानकीच आहे हें पटतें व सावरकरांचें विधान मनाला योग्य वाटत नाहीं. या काव्यांत एकंदरींत दहा प्रसंग वर्णिले आहेत. त्यांपैकीं प्रत्येक प्रसंगांत जानकीचा निर्देश आला आहे व कोणत्याही चित्रांत मध्यवर्ति अशीं एखादी आकृति अशी आपलें मन वेधून घेते नि बाकीची पार्श्वभूमि फक्त आपले डोळे त्या चित्रांतील आकृतीवर खिळून राहाण्यास मदत करतात. तद्वतच या काव्यांतील प्रत्येक प्रसंग जानकीकडे आपलें लक्ष वेधून घेण्यास मदत करितो. जानकीचें आईविना पोरकें गेलेलें बाळपण, पुढें बाप मेल्यानंतर सांबकाकाच्या येथें माईच्या संगतींत तिचें कौमार्यांतून यौवनांत पदार्पण, चंद्रिमा मृगीशीं तिच्या बाललीला, पुढें केशवाशीं लग्न झाल्यानंतर त्याच्यावरचें नितांत प्रेम व शेवटचा तिचा अपूर्व त्याग; हीं मनाला

इतकी चटका लावितात कीं जानकीच्या पात्रापुढें सर्व पात्रें फिक्कीं पडतात. नायक किंवा नायिका तीच कीं ज्याला वाचकांची सहानुभूति शेवटपर्यंत मिळते. व जिच्या सुखदुःखाबरोबर वाचकही वाहवत जात असतो. त्या मानानें केशवाचें पाप आपल्या मनांत कांहींच सहानुभूति उत्पन्न करीत नाहीं.

'सुंदरता कशी वानूं गोड पावित्र्य जन्मदा!
जननी भानुची रम्या स्तवावी हो कशी उषा!

असें ज्या जानकीचें कवीनें वर्णन केलें आहे, तिला सोडून केशवाला मालतीशीं अधिक प्रसंग करण्यास कांहींच वाटलें नाहीं. जानकीला विवेक सांगणारा केशव हा स्वतःच विवेकभ्रष्ट झाला व इतकें करून मग्रूरी इतकी कीं अंबिरे सारख्या यःकश्चित स्त्रीचें कुजकें बोलणें ऐकल्यावर जानकीला मारून टाकण्यास म्हणून धांवतो. तरी बरें कीं स्त्रीहत्येनें हात कशाला कलंकित करावें म्हणून गप्प बसतो. जानकीनें विचारलें तर आपल्या संशयाचें निराकरण करून घ्यावें तेंही नाहीं. मनांत अढी ठेवून वागतो व त्याच्यामुळें घरांत भकास औदासिन्य पसरतें. जानकी सुकून जाते, आई वडील मनांतल्या मनांत कष्टी होतात व घर म्हणजे स्मशान बनतें. शेवटीं आजारी पडल्यावर तरी या बाबतींत विचारपूस करतो म्हणावें तर तसेंही नाहीं. जानकीला पुन्हां वांकडें पाऊल पडणार नाहीं ना म्हणून विचारतो व तिनें देवासाक्ष आपली खात्री दिली तरी समाधानाचे शब्द बोलत नाहीं. खरेंच जानकीचें चरित्र मनाठकरांनीं इतकें विमल व मनोहर रेखा टलें आहे कीं त्या चरित्राच्या सुगंधी व झगझगीत प्रकाशासमोर केशवाच्या चरित्राची वाईट तूप घालून पेटविलेल्या व विझत चाललेल्या वातीची घाणच येते. केशवाचें चरित्र असें रेखाटून मनाठकरांनीं काय साधलें? पण पुढील वाक्य आपल्या निवेदनांत लिहून त्यांनीं टीकाकारांना विनाकारण अडचणींत पाडलें आहे. ते म्हणतात.

" या काव्यांत नादलोलुप निराश होतील, यमकप्रिय भग्नाश होतील
हेतु कारणवादी उद्विग्न होतील, गूढ गुंजनवादी विषण्ण होतील! "

पण हेतू शोधूं नका म्हटल्यानें टीकाकार शोधायचे थोडेच राहतील. शाकुंतलांतून काय किंवा शेक्सपीयरच्या नाटकांतून काय परिक्षक नि विमर्षकांनीं तत्त्वज्ञान हें शोधून काढलेंच कीं नाहीं. पण ' जानकी काव्य ' लिहिण्यांत मनाठकरांना कांहीं तत्वज्ञान प्रतिपादन करायचें होतें असें दिसत नाहीं. तसें पाहिलें तर जानकीचें विमल चारित्र्य व केशवाचें विवेक भ्रष्ट व कर्तृत्वशून्य चारित्र्य याचें मीलन म्हणजे व्योमधरेचें मीलन म्हटलें तर मनाठकरांनीं विषाद मानण्याचें कारण नाहीं. ' चार वाजले ' म्हणून कोणी म्हटलें तर कुणाला वाटेल चहाची वेळ झाली. गृहिणीला वाटेल पति हपीसांतून येण्याची वेळ झाली, मुशाफरांना वाटेल मोटर किंवा गाडी येण्याची वेळ झाली, कारकुनांना वाटेल कचेरी सुटण्याची वेळ झाली. वास्तविक ' चार वाजले ' या वाक्याचा अर्थ जो तो आपल्या गरजेप्रमाणें करतो. तसेंच काव्य वाचून त्याचा अर्थ घ्यायचा व त्यांतून हेतु शोधून काढायचा तो वाचकांच्या मनोरचनेवर अवलंबून असतो. त्यांतल्या त्यांत कवीनें अगोदरच एखादा विशिष्ट हेतु जाहीर केला असला तर संशोधनाला जागाच राहत नाहीं. आंबराई, अभागी कमल, सुधारक, गोमांतक काव्य हीं याचीं उत्कृष्ट उदाहरणें होत. पण जानकीकाव्य लिहिण्यांत मनाठकरांनीं टीकाकारांना एका दृष्टीनें मोकळीक दिली आहे. कोणत्याही काव्याचा आनंद लुटण्याकरितां कविमन, काव्य व वाचकाची मनोरचना या तीन्हीचा मेळ बसला पाहिजे. पण कविमनाचा परिचय नसणारे वाचक काव्य वाचून आपापले अर्थ बसवितील यांत काय संशय?

माझ्या मतें जानकी काव्य लिहिण्यांत मनाठकरांचा हेतु फक्त जानकीचें

विमल चरित्र रेखाटण्याचाच असावा. कोमल, अल्लड बाला, भावना सुलभ अशी आश्रमांत खेळणारी किशोरी, पतिप्रेमांत दंग असणारी आर्य स्त्री, व संशयाला बळी पडल्यावरही पतीचे पाय न सोडणारी व पतीच्या मागोमाग मृत्यु हुडकणारी आर्यदेवी असें उदात्त चित्र रेखाटून तिच्याकडे व पर्यायानें स्त्री-जीवनाच्या एक पवित्र दालनाकडे वाचकाचे लक्ष्य वेधण्याचा हेतु मनाठकरांचा आहे हें उघड आहे. या एका आकृतीला दुसरीं सर्व पात्रें फक्त पूरकच शोभतात. जानकीला नजरेआड करणें म्हणजे हॅम्लेटवांचून हॅम्लेट नाटक वाचण्यासारखें आहे. मराठी वाङमयांत दीर्घ काव्यें बरींच लिहिलीं गेलीं आहेत पण त्या काव्यांचा आत्मा कोठें विरोधावर उभारला आहे तर कोठे संघर्षावर, तर कोठे अनुकूल परिस्थितीवर. पण जानकी काव्यात ही गोष्ट नाहीं. योग्य नवरा, प्रेमळ पिता, प्रेमळतर काका व माई याच्या सान्निध्यांत वाढलेली पण नवरा विवेकभ्रष्ट होऊन स्वतःच संशयाच्या गर्तेत पडल्यामुळें झुरून सुकणारी जानकी ही कोणाशीं झगडत नाहीं. कटू शब्द तिच्या तोंडून कधीं बाहेर पडत नाहीं. केव्हांही स्वार्थत्यागाकरिता ती तयार असते व नवरा इतकें टाकून बोलतांना सुद्धां ती त्याला उलट उत्तर देत नाहीं. हें दृश्य किती आल्हाददायक आहे. त्या मानानें केशवाचें पात्र अगदीं क्षुद्र आहे. त्याच्याबद्दल यत्किंचितही सहानुभुति वाटत नाहीं.

इतर पात्रें म्हणजे नाना, सांब, माई व मालती हीं होत. नानाचा स्वभाव प्रेमळ दाखविला आहे.जानकीनें त्याच्या जीवाला थोडी बहुत गोडी आणिली. नाहींतर बायकोच्या मरणानंतर त्याला जीवन दुःसह झालें असतें. नाना मेल्यानंतर सांब व माई यांनीं प्रतिपाळ केला. केदार वनांतील या तिघांचें जीवन या काव्याचा रमणीय भाग होय. चांदिमा, कपिला या

जनावरांच्या वास्तव्यानें व सर्वांच्या परस्पर संबंधानें वाचकाच्या मनाला चटका लागतो. माईनें जानकीला पुराणांतरींच्या गोष्टी सांगाव्या, दळण दळतांना जानकीच्या हाताला फोड येऊं नये म्हणून स्वतः दळावें. तिला गृहिणीकर्तव्यें शिकवावीं. जानकीचें लग्न झाल्यानंतर सांब व माई कष्टी होऊन केदार वनाकडे परत आलीं. त्यांना त्यावेळीं किती उदास वाटलें असेल? जानकीचीं बाळपणींचीं खेळणीं पाहून त्यांच्या जीवाला किती चटका बसला असेल? कपिला जानकीला शोधण्यासाठीं किती आशाळभूत पणें इकडे पाहात असेल? सांब व माई जानकीच्या जीवनांतून निघून गेली पण वाचकांच्या मनांतून कांहीं केल्या निघून जात नाहींत. खरोखर त्यांचें जीवन मनाठकरांनीं अत्यंत हळुवारपणें रेखाटलें आहे.

जानकी–काव्य शोकपर्यवसायी आहे. पण काव्य वाचून झाल्यावर अरेरे, जानकीचा सगळा संसार इतक्या लवकर आटपावा ना, हें जीवन किती व्यर्थ आहे असें वाटल्याशिवाय राहात नाहीं. जानकीचा दोष कांहींच-नसतांना तिचा इतका विचका व्हावा याचें वाईट वाटतें व दैवापुढें कांहींच इलाज चालत नाहीं असें वाटून वाचक स्तब्ध होतो.

मालतीचें पात्र फक्त केशवाचें चरित्र भ्रष्ट करण्यापुरतें रेखाटलेलें दिसतें. ती विधवा व वैधव्यांत येणारे मोह प्रसंग व ते टाळणें कसें अशक्य होतें हेंच मालतीचें चरित्र दाखवितें. पुढें आपण मेल्यावर जानकीची स्थिति तशीच तर नाहींना होणार असें वाटून केशवाला धस्स होतें व तो तिला पाऊल वांकडें पडूं न देण्याबद्दल बजावतो.

येथपर्यंत कथानकाचें व पात्राचें विवेचन झालें. काव्याची चाल धांवती आहे. व कथानकाला पोषक आहे. वर्णनें फार सरस वठलीं आहेत.

माळाच्या पायथीं दाट अंबराई फुलावली
पळभी रक्तिमा सांठे माथ्यावरी उषेपरी
गळल्या मोहरीं तेवीं घोंसलेल्या फुलावरी
चालल्या गुंजनें, गेल्या दिशा मान्या निनादुनी

किंवा दिशांनी तोंस शोषूनी मघा, केलें रितें जया

आषाढाच्या फुलांतूनी श्रावणाचें निघे फळ
काळ्याभोर घनांच्या त्या पखाली थोर मोडुनी,
कैवारी देव दीनांचा भूमिमाया भरी क्षणीं

किंवा ब्रह्म गोलाचिया चाकीं पोहरे लाविले अती
भानुचा पोहरा आज बुडे काळाचिया जळीं

मनाठकरांच्या वर्णनांचें वैशिष्ट्य हें आहे कीं त्यांच्या उपमा किंवा वर्णनें हीं अगदीं आटोपशीर असतात. कुंचल्याच्या दोन तीन फटकाऱ्यांनीं सबंध चित्राची सूचना ते देतात. गिरीशासारखें वस्तूचें वर्णन ते देत बसत नाहींत. त्यामुळें मनाठकरांच्या कविता वाचतांना एखादी ओळ वाचतांच वर्ण्य विषयाचें भव्य चित्र एकदम डोळ्यासमोर उभें राहतें पण तें क्षणभरच. धांवत्या गाडींतून एखादें भव्य दृश्य दिसावें पण तें पचवि-ण्यापूर्वींच गाडी पुढें निघून जावी असें होतें. त्याला कारण जें वृत्त त्यांनीं स्वीकारलें आहे तें होय. चाल धांवती म्हणून वर्णनें आटोपशीर व उपमा हीं साजुक व चटकदार; जणूं काय 'पहा हें दृश्य पण अगदीं थोडा वेळ, कारण आपल्याला पुढें जावयाचें आहे' असेंच त्यांना म्हणावयाचें आहे. मोजक्या शब्दांत त्यांची करामत पहा:—

मध्यान्हीं अंबरीं चेंडू खालीं पडेल जाणुनी
मेघांचें लाविलें जाळें जगन्नाथें दिशांतरां

किंवा काळाच्याच मुखीं घोर विश्व सारें पेंड गमें
तारका त्यांत डाढांचीं शुभ्र टोकें चकाकतीं
अथवा खरवांत शिरे वाट, भुजंगी जेवि वारुळीं
किंवा निशा गेली पळोनीया, भानू ढगाळ अंबरीं
चढे पाईात कांडोरी जीवितार्ची जगाचिया

प्रसंग सहावा, यांत मनाठकरांनी वर्णनाची बहार केली आहे.


उषेचा घेउनी लाल बुरखा पाहीं साजक
तांतडीनें निघे जाया देशांतरास यामिनी
चपला गात नागीण, पडार्ना चाहूला गंम
गिरते घाइ घाईनें कुंकवाशा जलामधीं

आटपशीर पण भव्य वर्णनें व चटकदार पण गोड उपमा हीं मनाठकरांच्या काव्याचीं वैशिष्ट्यें होत. इतक्या मोजक्या शब्दांत इतकीं सुंदर वर्णनें, माझ्या पाहण्यांत आलीं नाहींत. त्यामुळें मनाठकरांचें 'जानकी काव्य बऱ्याच वरच्या दर्जाचें गणलें जाईल यांत शंका नाहीं.

मराठवाडीच्या आधुनिक कवितांत शोककाव्यें दोनच आहेत. एक मुकुंद यांचें ' प्रेमांजली ' व दुसरें मनाठकरांचें ' जानकी काव्य. ' बाकीचे कवी दीर्घ काव्य लिहिण्याच्या भानगडींतच पडले नाहींत. प्रेमांजलींत विकारांपेक्षां विचारविलास जास्त आहे. त्यामळें जानकी काव्य हें हिरव्या गार ताटव्यामध्यें बाजूला व एकटेंच असे लागलेल्या पिवळ्या फुलासारखें उदासरम्य वाटतें. मनाठकर तरुण आहेत, विद्वान् आहेत पण या तरुण वयांत जानकी काव्यासारखें शोककाव्य त्यांनीं लिहिलें आहे. मनाला कांहीं तरी जबरदस्त धक्का बसल्याशिवाय असें काव्य बाहेर पडणें शक्य नाहीं. तो काय धक्का असेल हें त्यांचे मित्र जाणोत. कविमनाच्या अथांग

मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

कृष्णाडोहांत उडी घेऊन भावना शोधणारे शोधोत. काठाशीं वाळुबरोबर खेळणाऱ्या कृष्णाकुमाराचें तें काम नव्हे. पण माझी मराठकरांना विनति हीच आहे कीं मराठवाड्याच्या साहित्योपवनांत उत्साहाचें वारें वाहात आहे, पहांटतारा जाऊन आतां उषःकालाची वेळ आली आहे. तेव्हां त्यांनीं आमचे मार्गदर्शक बनून आमच्या उत्साहांत सामील व्हावे. आमचे साहित्यिक म्हणजे दरिद्री मराठवाड्याजवळ असलेलीं बहुमोल रत्नेंच होत. तीं तळपण्यांतच आम्हाला अभिमान आहे व त्यांचें चीज आहे.



९

# बिदरकरांची कविता.

जन्म १७ - २ - १९०३

निजाम महाराष्ट्राला परिचित असलेले कवि मुकंद बी. ए. यांचें ' प्रेमांजलि ' हें काव्य प्रसिद्ध करून हैद्राबादच्या वाङमय चर्चा मंडळानें, मराठी साहित्यांत एका उत्कृष्ट खंडकाव्याची भर घातली आहे. आपल्या संस्थानांत पाहूं जातां साहित्योन्नतीकरितां झटणाऱ्या व्यक्ति व संस्था या बोटावर मोजतां येण्यासारख्या आहेत. यामुळें मुकुंदांचें खंडकाव्य हें आपल्या निजाम महाराष्ट्राच्या साहित्यिक उन्नतीचें एक द्योतकच आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

' प्रेमांजली ' चें परीक्षण करण्यापूर्वी आपल्याला या खंडकाव्याच्या प्रतिपाद्य विषयाकडे पाहिलें पाहिजे. काव्याचा विषय एका विधुराचा

आपल्या पत्नीच्या मृत्यूबद्दल विलाप हा आहे. प्रियेच्या आकस्मिक अनपेक्षित मृत्यूनें शोकसागरांत बुडून जाऊन, सभोंवतालचें जग श्याम अंधःकारमय वाटत आहे अशा काव्य–नायकानें हृदयांत सळसळणाऱ्या भावनांना काव्यरूपानें वाट मोकळी करून दिली आहे. खंडकाव्याचें मूळीं लक्षणच हें कीं तें अंतः सृष्टिविषयक असतें. कवीची दृष्टि खंडकाव्यांत नेहमीं अंतर्मुख असते व हृदयांत उचंबळून येणाऱ्या भावनांना तो काव्यांत ग्रथित करतो. या दृश्य काव्याची परंपरा आपल्या देशांत अगदीं अलीकडची आहे असें म्हणतां येत नाहीं. कालिदासाच्या 'मेघदूता' ची किंवा जयदेवाच्या 'गीत गोविंदा' ची गणना संस्कृत वङ्मयांतल्या उत्कृष्टोत्कृष्ट अशा खंडकाव्यांत होते. मराठी वाङ्मयांत सुद्धां संतकवींनीं आपल्या भक्तिरसानें ओथंबलेल्या कवितांनीं खंडकाव्याची परंपरा पाडली आहे. परंतु खंडकाव्य हें केवळ आनंदमयच असतें असें नाहीं, तर तें केवळ शोकमयहि असूं शकतें. इतकेंच नव्हे तर कांहींच्या मतें ज्या खंडकाव्यांत करुणरस पुरेपुर भरला आहे, तेंच श्रेष्ठ प्रतीचें काव्य होय. मनुष्याला शोकाचा आवेग असह्य झाला म्हणजे मग तो जितकें सरस काव्य निर्माण करूं शकेल तितकें केवलानंदमय अशा स्थितींत त्याच्या हातून उत्कृष्ट काव्याची निर्मिति होत नाहीं. या नियमाला अपवाद नसतात असें नाहीं, पण शोकप्रसंगीं आपल्या भावना जितक्या तीव्र स्वरूपाच्या असतात तितक्या त्या इतर कोणत्याहि स्थितींत असूं शकत नाहींत. यामुळें खंडकाव्यांत वर्ण्यविषय जर शोककारक असेल तर तें अधिक परिणामकारक ठरतें.

आपल्याला हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं खंडकाव्यांत इतर काव्यापेक्षां भावनांचा जोर अधिक प्रमाणांत असतो. भावनांचा उद्रेक झाल्यावर त्या काव्यरूपांत वर्णन करितांना उपमादि अलंकारांची निसर्गांत दृष्टीस

पडणाऱ्या वस्तूंवरून जोड घेण्यांत जे विचारांचे साह्य लागेल तितकेंच भावनांचा परिपोष हा मुख्य भाग असून उपमादि अलंकार हे केवळ त्यास सहाय्यीभूत होत. ते त्याज्य आहेत असें आमचें म्हणणें नाहीं. पण कवीनें केलेल्या त्यांच्या निवडीवरूनच आपल्याला त्यांच्या भावनांचा किती परिपोष उत्कृष्ट साधला आहे याची कल्पना करतां येते.

'प्रेमांजली ' च्या बाह्य वेषाकडे वळून पाहातां प्रथम गोष्ट जी नजरेस येते ती ही कीं हें काव्य खरोखरीच Lyric म्हणजे गेय आहे. गातां येणें हें खंडकाव्याच्या बाह्य वेषाचें मुख्य वैशिष्ट्य होय. या वैशिष्ट्याकडे लक्ष्य देऊनच कवि मुकुंद यांनीं काव्याची रचना करुणरस परिपोषास योग्य अशा असावरी रागांत केली आहे.

काव्याचीं एकंदरीत नव्वद पदें पाडण्यांत आलीं आहेत स्थूल मानानें असेंहि म्हणतां येईल कीं, प्रत्येक पदामध्यें एक कल्पना गुंफिली असून तिचा उपयोग मूलीभूत अशा विरह भावनेच्या परिपोषाकडे करण्यांत आला आहे. याला अपवाद आहेत पण त्यांचा विचार पुढें करण्यांत येईल. काव्याची लांबी पाहून, काव्य आहे यापेक्षां लहान झालें असतें तर विशेष रमणीय व परिणामकारक वठलें असतें असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं. कोणत्याहि काव्यांत भावनांचें वर्णन हा प्रधान विषय होय. मग खंडकाव्यांत त्याची योग्यता किती आहे हें सांगणें नकोच. पण भावनांची तीव्रता क्षणिक असते आणि म्हणून एकाच भावनेचा परिपोष करावयाचा असल्यास त्याची तीव्रता जितक्या लहान कवितेंत ग्रथित करतां येईल तितकी ती कविता अधिक परिणामकारक ठरेल यामुळें इंग्रजी वाङ्मयांत Lyrics या बहुधा लहानच असलेल्या आपल्याला दिसून येतील. भावना फार वेळ टिकत नाहींत व त्यांच्यावर एकदां विचारांचें व

पृथक्करणाचें आवरण आलें कीं तें काव्य खंडकाव्य या नांवास अपात्र ठरतें. खंडकाव्यें मोठीं आढळून येत नाहींत असें नाहीं पण कवि मुकुंद यांच्या काव्याकडे दृष्टि फेकतां प्रदीर्घ रचनेस लागणाऱ्या गुणांचा त्यांच्यांत अभाव दिसून येतो असें म्हणणें वावगें होणार नाहीं. शोक रसाचा योग्य तो परिपोष करण्याचा त्यांनीं शक्य तो प्रयत्न केला आहे. पण काव्याची अवास्तव लांबी हेंच त्या रसास मारक झालें आहे. खंडकाव्याची सर्वसाधारण व वरवरची परीक्षा म्हणजे तें काव्य वाचण्यांत आपण किती तन्मय होऊन जातों यावरून ठरवितां येतें. तन्मयतेच्या सरळ प्रवाहांत रसपरिपोषास अनावश्यक असलेला अडथळा आला म्हणजे त्या तन्मयतेचा भंग होऊन जातो. व काव्यांत वर्णिलेल्या भावनांचें तितक्याच तीव्र स्वरूपांत वाचकांच्या हृदयसागरांत प्रतिबिंब पाडणें जें खंडकाव्याचें उद्दिष्ट तें दुःसाध्य ठरतें. मुकुंदांच्या खंडकाव्याचें कोणतेंहि पद घ्या. तें सर्व दृष्टीनीं परिपूर्ण ठरेल परंतु संपूर्ण काव्य वाचून ज्या भावना वाचकांच्या मनांत जागृत व्हाव्या असा कवीचा हेतु होता, तो साध्य होत नाहीं. मुकुंदांच्या प्रेमांजलींत जिवंतपणाचा अभाव दिसून येतो हें ताडून पाहावयाचें असेल तर खिस्तवासी नारायण वामन टिळक यांचें 'माझी भार्या' हें काव्य व मुकुंदांचें 'प्रेमांजलि' दोन्हीं समोर ठेवून पाहा. श्री. रामचंद्र महादेव मराठे 'टिळकांच्या' काव्याची चर्चा करतांना म्हणतात, 'यांतील भावना जेवढ्या मधुर तेवढीच भाषाहि गोड पडली असून, मोजक्या पण वेंचक अलंकारांनीं कवितेला मोहकता आली आहे....... मनुष्यांच्या सामान्य विचारांचा परामर्ष घेऊनहि स्वतःचें वैशिष्ट्य प्रगट करण्याचा जो कवीचा मोठा गुण तो यांत निसंशय प्रतीत होतो. कवितेच्या माधुर्याची कल्पना वाचकांना पुढील श्लोकांवरून येईल.

तिच्या अल्पास्वल्पा कृति, लघु तिची चाटु गादितें
तिचीं प्रेमस्वप्नें मनिं, नयनिं, वाणींत उदितें,
तिच्या दीनासाठीं, अविरत दयेच्या लघुकृति
तिचे ते हेतू जे सहज हळु बाहेर पडती. '

तेंच ' प्रेमांजलि ' हें किती निर्जीव व निरस भासतें हें तें एकदां वाचूनही कळून येतें.

याला मुख्य कारण म्हणजे कवीच्या विचारांत सुसंबद्धता नाहीं हें होय. काव्य दीर्घ झाल्यामुळें भावनांची जी तीव्रता मधल्या कांही पदांतून आढळून येते ती सर्वत्र दिसून येत नाहीं. याला म्हणजे संपूर्ण काव्य लिहितांना कवीच्याच भावना सारख्या तीव्र स्वरूपाच्या नव्हत्या हें होय. Poetry is emotion remembered in tranquility " हें कविवचन जरी खरें असलें तरी त्या emotions प्रस्तुस कवीला आठवल्या नाहींत असें म्हणणें क्रमप्राप्त होतें. त्यांच्या काव्यांतल्या कित्येक पदांमधून भावनांच्या वर्णनापेक्षां विचारांची कसरत व नैसर्गिक वर्णनापेक्षां शद्बांवरची हुकमत हीं दृष्टोत्पत्तीस येतात. कांहीं पदें सरसतेच्या दृष्टीनें पूर्ण सांपडतात तर कांहीं अगदीं नीरस वाटतात. उदाहरणार्थ-

गृहकलहातें सांभाळुनि त्वां
शकट हांकिला संसाराचा
उपदेशातें सांगुनि मजला इत्यादि (४८)

अथवा—
' माला ' रडली पाहूनि तुजला
' माणिक ' होता सान लपविला
' मुरली ' जाउनि आजोळाला
नाजुक काळा विन्मुख झाला. इ. (५५)

नीरस पदांचें उदाहरण पुरें.

दीर्घ काव्याच्या ओघाला मारक असा दुसरा दोष म्हणजे प्रत्येक पदांमधून दिसून येणारी उपमांची गर्दी ही होय. कोणत्याहि पदाचा मुख्य उद्देश मूलीभूत भावनेचें उद्दीपन करणें हा असल्यामुळें उपमाउत्प्रेक्षालंकारांची गर्दी करणें हें त्या भावनेच्या उद्दीपनाला पोषक होत नाहीं. मुकुंदांच्या उपमा या खांडेकरांच्या उपमासारख्या होत. त्यांच्या उपमा विविध आहेत, नवीन आहेत, पण एका उपमेवरून दुसरी, दुसरीवरून तिसरी अशा उपमा त्यांना इतक्या सुचतात कीं त्यांचें कौतुक करण्याच्या भरांत मूळ भावनेचा लोप होऊन जातो. 'प्रेमांजलींत' प्रत्येक पदामधून उपमांची गर्दी आढळून येते. शब्दचित्र रेखाटतांना तें सूचक होण्याइतके लहान हवें. पण तें पूर्णपणें रेखाटण्याचा मुकुंदांना मोह आवरत नाहीं. मॅथ्यू अर्नाल्ड सारखें संपूर्ण वातावरण निर्माण केल्याशिवाय त्यांची प्रतिभा संतुष्ट होत नाहीं. हा प्रकार फक्त Objective काव्यामधूनच यशस्वी होऊं शकतो. आणि तो अर्नाल्डनें यशस्वी करून दाखविला आहे. हृद्य काव्यांतून अशा प्रकारचा प्रयोग करणें हें फार कठीण आहे, किंबहुना अशक्यच आहे. खंडकाव्यांत भावनेचें उद्दीपन शक्य तितक्या थोड्या उपमा घेऊन शक्य तितक्या थोड्या शब्दांतच करावयाचें असतें; उपमांवर वाजवीपेक्षां फाजील भर दिल्यानें त्यांचें कौतुक करण्यांतच वाचकाच्या बुद्धीला मूळ विषयाचा विसर पडतो. आणि खंडकाव्यास मूलीभूत असलेल्या भावनेचा विसर पडणें या सारखी अनिष्ट अशी कोणतीच गोष्ट नाहीं. उदाहरणार्थ खालील पद पहा.

पाळुनि मैना पंजरिं ठेविली
क्रूर बिडालें तिजला गिळिली

फडफडली किति गोड बोलली
निज नाथातें स्मरती झाली
असह्य तीतें तो वनमाली
व्याधभयें बहु पिंगा घाली
दूर अंतरीं घन कांतारीं
व्याधें त्यातें पिडिलें भारी
मृत्यू त्यास मृत्यु तीस । भेट खरी झाली

हें शब्दचित्र किती यथार्थ आहे. कुंचल्याच्या दोन तीन फटकाऱ्यानें सुंदर चित्र काढण्याऱ्या कुशल चित्रकारापेक्षां आपल्या अजब कल्पनाशक्तीनें हें वातावरण निर्माण करणाऱ्या कवीचें कौतुक करावेसें वाटतें. पण मृत पत्नीबद्दल विलाप ही जी मूलभूत भावना तिचें परिपोषण वरच्या पदानें होतें असें म्हणतां येईल काय? कवीच्या कल्पनाशक्तीची वाखाणणी करण्यांत आपण गुंग होऊन जातों आणि त्यामुळें आपल्याला खंडकाव्याच्या मूळ विषयाचा विसर पडतो. शब्दचित्रें निर्माण करण्यांत कवीचें कौशल्य पाहून एखादें Objective काव्य यांच्या हातून निर्माण होईल तर बरें असें वाटूं लागतें.

व्यक्तिशः पूर्ण पण संपूर्ण काव्याच्या दृष्टीनें तुटक व कल्पनेची सांखळी तोडणारीं पदें पाहून मुकुंदांना ही कल्पना उर्दू गजलावरून सुचली कीं काय अशी प्रबल शंका येते. गजलांतला प्रत्येक चरण हा आपल्या परीनें पूर्ण असतो. दुसऱ्या चरणाशीं त्याचा कांहीं संबंध नसतो. पण हा प्रकार हृद्य विशेषतः प्रदीर्घ काव्याला योग्य नाहीं हें वर सांगितलेंच आहे.

वरील दोष वर्ज्य केले असतां मुकुंदांचें काव्य सर्वानुमतें उत्कृष्ट

ठरण्यास कांहीं प्रत्यवाय नसावा असें वाटतें; त्यांची कल्पनाशक्ति वाखाणण्यासारखी आहे. त्यांच्या नव्वद पदांपैकीं प्रत्येकांत एकेक उपमा जरी घेतली तरी नव्वद अशीं बहुमूल्य रत्नेंच आपल्या हातीं येतात. या उपमांचे तीन भाग कल्पितां येतील. पत्नीविरहानें शोकाकुल झालेल्या नायकाला निसर्गांत शोकजनक अशींच दृश्यें दिसतात हा पहिला भाग व निसर्गांतील आनंदमय दृश्यें पाहून नायकाला आपल्या पत्नीचें साहचर्य इच्छेसें वाटतें हा दुसरा भाग आणि पत्नीच्या मृत्यूनें जीवाला आत्यंतिक असें दुःख होऊन स्वतः नायक मृत्यूची अपेक्षा करतो व मृत्यू येत नाहीं म्हणून निराश होतो हा तिसरा भाग. वरील तीन भागांपैकीं प्रत्येकाचीं एकापेक्षां जास्त उदाहरणें उद्धृत करणें स्थलाभावीं शक्य नाहीं.

हरित मालिका लतालतांची
दंवबिंदूनें चमकत होती
रत्नें उधळिलिं वसुंधरेनीं
पदरिं लपविलीं नव लतिकांनीं
खेळत त्यावर मोहक हरिणी
स्तनपानातें पाडस जमवुनि
रवंथ करितां डोले बैसुनि
डोळे हांसति माया पाहुनि
हर्षित हो व्याघ्र येत । छापा वरि घाली

दुसऱ्या प्रकारचें उदाहरणः—

शुभ्र मोगरा हांसत राही
कलिका खेळे तीतें बाही
अणुरेणूही रंजित होउनि

— मुकुंद

प्रसन्न दिसतो हृदया उघडुनि
मोहें मानस दंग होउनि
विकसित गमते सारी भुवनि
तूंच आज मूक होया कोप कसा धरिशी ! ( ११ )

आतां तिसऱ्या प्रकारच्या उदाहरणावर दृष्टि फेंका

हाय जीविता! कृतांत छळतां
घेशि भूमिका माया रमतां
अल्प सुखाचा चारा खाया
जन्ममरण या जोडाशि वायां
व्यर्थ कष्टतां दुःखा गिळितां
आत्मयज्ञ कां करिशी भता
तोडुनि तू बंधनास । मुक्त मरण्या होई ( ६० )

त्यांच्या उपमा सर्व वस्तूंमधून घेतलेल्या आहेत. चन्द्र व तारका, वायु व तारका, हरिण, दावानल व व्याध, लग्न मंडप, नीलोत्पल, काक व भुजंग, अजविलाप, ज्वालामुखी, पक्ष्यांचे सागर तीरांचे घरटें, मधुप व नलिनी इत्यादि. विवक्षित फारसी कल्पना आढळतात. उदाहरणार्थ—

गान रसाचा अमृत त्याला
चषक जाय भंगुनि हा । भुवरतीं पडला ( ९ )

किंवा— गळ्या मोगऱ्या दंव बिंदूच्या
कराळ काळे उधळुनि दिधल्या,
मोक्षपटाला जिंकुनि काळा
जाशी तूं हा अमर पदाला ( २१ )

फारसी कल्पना घेण्याविषयीं एक सूचना करावीशी वाटते, कोणत्याहि

कारणानें कां असेना निजाम महाराष्ट्रांतील साहित्य सेवकांना फारसी कल्पना आत्मसात् करून घेण्यास बरींच साधनें लाभलीं आहेत. इतर वाङ्मयांतील कल्पना आपल्या वाङ्मयांत आत्मसात् करून घेतल्यानें आपलें वाङ्मय संपन्न होतें हा सर्व ठिकाणचा व सर्व काळाचा अनुभव आहे. फारसी कल्पना आपल्या वाङ्मयांत घेण्याच्याविरुद्ध जी प्रतिक्रिया झालेली आपणास आढळून येते याला कारण ब्रिटिश इंडियांतल्या फारसी जाणणाऱ्या मराठी वाङ्मय सेवकांची धरसोडीची वृत्ति ही होय. यामुळें फारसीचे अलंकार मराठी साहित्यदेवीवर उठून न दिसतां फार बोजड दिसूं लागले. सौंदर्य संपन्न अशा फारसी कल्पनांचें अमूल्य सरस्वतीवर चढविण्याचें भाग्य निजाम महाराष्ट्रीयांना त्यांच्या राजकीय परिस्थितीमुळें लाभलें आहे. या दृष्टीनें कवि मुकुंदांनीं प्रयत्न केल्यास आपलें वाङ्मय समृद्ध होईल यांत शंका नाहीं.

पदलालित्य मुकुंदांना बहारीचें साधलें आहे. त्यांचीं पदें आपल्या ध्वनीनें एका सुंदर रमणीच्या नूपुरांच्या मंजुळ आवाजाची आठवण करून देतात. किंवा असेंहि म्हणतां येईल कीं काशीच्या विश्वेश्वर मंदिरांतून, येणारा घंटांचा ध्वनि गंगेवर नावमधून विहार करणाऱ्यांच्या कानावर येऊन जें गंभीर वातावरण निर्माण करतो तसें वातावरण मुकुंदांची पदें वाचतांना निर्माण झाल्याचा भास होतो. उदाहरणार्थ,

नाद रुपेरी पैंजणवाळा
निर्झरिणीचा घुंगुरवाळा
गोड वाटतो गिरिराजाला
स्वर्गंगेला धवल मुखीला ( ४५ )

अथवा— अजि लाडिवाळा कुठला वाळा
झुळझुळ बोलुनि रम्य लोपला

—मुकुंद

प्रसन्न सरिता शुष्क आटल्या
बालुकामयी निद्रित झाल्या    ( ६४ )

किंवा— बहर लागला द्राक्षलतेला
घोस लोंबले वसंतकालीं
तृषित दृष्टिला आरक्ताला
रसमय देही तांबुस लाला

ऱ्हस्वदीर्घाचे दोष फार आढळतात. कांहीं ठिकाणीं शब्दप्रयोग योग्य नाहींत. उदा. कारंजांतिल चपला लहरी। विरल ... ... खळखळ भारी ' कारंजांत लहरी नसतात, फवारे असतात व ते खळखळ करीत नसतात तसेंच ' खळखळले स्मित तुझें उसळलें! येथें खळखळले व उसळले हे शब्द चूक आहेत. पण एकंदरीत काव्याच्या अवलोकनांत हे दोष क्षुद्र आहेत व थोड्या सरावानें नाहींसे करतां येतील.

' प्रेमांजली ' नें निजाम महाराष्ट्राच्या साहित्यांत एक अमोलिक भर टाकली आहे हें परीक्षणाच्या आरंभीं सांगितलें तें वस्तुस्थितीला धरूनच आहे. गेल्या दहा वर्षांत निजाम महाराष्ट्राच्या साहित्यवृक्षाला पुन्हां हिरवी पालवी फुटून, दोनशे वर्षांपासून वाळून गेलेला हा वृक्ष पुन्हां टवटवीत दिसूं लागला आहे. आपल्या साहित्ययुगांतला हा काळ म्हणजे उषःकाळच होय. गोदाकांठच्या व या भाग्यनगरीच्या वाङ्मय सेवकांच्या उत्साहाकडे पाहून आपला भविष्यकाळ अत्यंत उज्ज्वल राहील या विषयीं केव्हांहि दुमत असणें शक्य नाहीं.

# १०

## पार्थिवांची कविता.

जन्म १९ - १२ - १९०७

श्री. कांत व कृष्णाकुमार यांच्याबरोबर पार्थिव हे नांदेड सांप्रदायांतील कवींत मोडतात व या दोघां कवींबरोबरच त्यांच्या कविता 'पहांटतारा' व 'फटत्कार' या कवितासंग्रहांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांच्या या कवितांवरूनच त्यांचें मराठवाड्यांतील वाङमयांत स्थान निश्चित करावयाचें आहे. त्यांची कवितासंपत्ति विद्यमान कवींत सर्वापेक्षां कमी आहे. त्यांच्या एकंदर प्रकाशित कविता अवघ्या तेवीस आहेत. या दृष्टीनें कोरेकल एका टोंकाला आहेत तर पार्थिव अगदीं दुसऱ्या टोंकाला येतील. इतक्या कमी कविता असण्याचें कारण समजत नाहीं. नाहीं तरी काव्याचें महत्त्व त्याच्या

वा. ता. पार्थिव

संख्येवरून मापावयाचें कां आंतील गुणावरून आजमावयाचें हा प्रश्नच आहे. घाटयांच्या कवितांचें परीक्षण करतांना मा. त्र्यं. पटवर्धन यांनी हाच प्रश्न उपस्थित केला आहे. " कवीची श्रेष्ठता ही मुख्यत्वेंकरून कशी कविता लिहिली यावरून, कां किती कविता लिहिल्या यावरून ठरावयाची हाहि प्रश्न आहेच " ( अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक पान २३७ )

पार्थिवांच्या एकंदरींत तेवीस कवितांचे विषय पाहिले तर त्यांच्या मनाचा ओढा कुणीकडे आहे हें दिसून येईल, ' प्रभात ' ' ईशचिंतन ' ' निरोप ' ' अश्रु ' ' टाका निराशा झणीं ' ' मागणें ' ' निर्धार ' ' करुणा ' ' धन्यतरू ' ' तो दिवस ' ' हृदयास ' या कविता ' पहाटतारा ' या संग्रहांत आल्या आहेत व ' फटत्कार ' मधें ' राहा माझ्या सोबतीस ' पराभूत वीर ' ' विसर्जन ' कल्लोल ' ' भरशील केधवां ' ' मन व हृदय ' ' दीपाम ' ' बंदिवास ' ' चाकरी ' ' जुगार ' ' फुलास ' ' परतून जा ' या कविता आल्या आहेत.

यांतील ' ईश चिंतन ' ' निर्धार ' राहा माझ्या सोबतीस ' ' भरशील केधवां ' या कविता भक्तिपर आहेत. दोन कविता ' परतून जा ' व ' निरोप ' या प्रणयपर आहे. बाकीच्या कवितांत सुद्धां भावगीतात्मक अशा कविता बऱ्याच आहेत. वस्तुनिष्ठ objective कविता म्हणजे ' तो दिवस ' ' करुणा ' इत्यादि आहेत. एकंदरीत कविता वाचून मनावर सर्वांत पहिला परिणाम जो होतो तो हा कीं, कवीचें मन निराशपूर्ण आहे. व्यवहारी जगांत कवीनें टक्केटोणपे खाल्ले आहेत व त्यामुळें त्यांचें मन हळवें झालें आहे, असें दिसतें. त्यांच्या ' हृदयास ' या कवितेंत त्यांच्या मनाचा विषण्णतेकडे कल स्पष्ट दिसून येतो.

ते म्हणतात—

जातात जाउंदे युगें जरी दुःखांत
पण ठेव लपवुनी हृदय तुझें पड्यांत
असतास सुखी जर, वरितें जग पंखांत
अन्यथा पडेना पीळ दुज्या अंतऱ्यांत
जोंवरी रंग फुलतात, तोंवरी गान
सांवरील कुणि ना अवघडलेली मान

असा जगावरील आपला बेभरंवसा प्रगट करून पार्थिव म्हणतात कीं अशा जगांत कसे तरी दिवस कंठावयाचे आहेत. जगांत कोणी कुणाचा नाहीं.

राहणें मागरे, उजाड या माळांत
ठेवणें कसा तरि जीव अशा देहांत

आणि शेवटीं पांघरील छाया काळी काळी गाढ
येऊनि अंत, आणील भाग्यदिन गोड

पार्थिवांची ही कविता त्यांच्या एकंदर वृत्तीची निदर्शक आहे. जगांतील प्रत्येक वस्तूची त्यांना दुःखपूर्ण Dark बाजू दिसते. त्यांची 'फुलास' ही कविता नितांत रम्य आहे. फुलाचें वर्णन पहा किती सुंदर वठलें आहे.

तुला सांगावें काय अरसिकांनीं?
मुकी होइल तुजविणें काव्यवाणी
रमणि–प्रीतीचा तूंच गळ्या श्वास

पण शेवटीं फुलास हा इषारा देतात—
क्षणें होइल वाळून तुझी राख
कुणी घेइल कानीं न एक हांक

तुझ्या झडलेल्या पाकळ्या सुरेख
तुला जाळाया राहती बरीक

त्यांच्या प्रणयपर कवितांत सुद्धां निराशेचेच बोल आहेत. ' निरोप ' या कवितेंत विषयलालसेला वाहिलेलें प्रेम समाजबंधनांची वंचना करतें हें पाहून धक्का बसलेल्या व डोळे उघडलेल्या तरुणीच्या हृदयाचे उद्गार आहेत. तसेंच ' परतून जा ' ही कविता त्याच प्रकारची आहे.

प्रियकर प्रणयिनीस म्हणतो:—

प्रेमा जाशी अखेर वंचुनि
कांटे नयनांतले फेंकुनी
भेदिती जरी हळुवार उरा
तूं जाच तुझ्या परतून घरा

ह्याच निराशेचा सूर ' विसर्जन ' या कवितेंत दिसून येतो. ते म्हणतात,

कां मी वाढविला कळे न मजला हा जीविताचा मळा
गेले व्यर्थचि, शिंपिलें जल तदा, तैसा जिवाचा लळा
गेल्या हास्य छटा फुलांतिल, तसा आनंद विश्वांतला
गेला कां न सवेंच जीव निघुनी, तो कासया राहिला ?

इतकी तीव्र निराशा पाहून पार्थिवांच्या कविता वाचतांना मन विषण्ण होतें. कांहीं कवी आजकाल फॅशन म्हणून निराशावादाचीं गीतें गातात व आजकालचा सगळ्यांत फॅशनेबल विकार म्हणजे भग्न हृदयाचा होय. ( Broken hearts are pleasant Complaint in London now-a-days' इति बर्नार्ड शॉ. ) पण पार्थिवांचीं निराशगीतें हीं निव्वळ बुद्धीच्या कसरती वाटत नाहींत. जीवनकलहांत त्यांना आलेल्या अनुभवाचे उद्गार दिसतात. विशेषतः ज्या व्यवसायांत ते सध्यां आहेत तो व्यवसाय

शरीराला व मनाला चिरडून टाकून निर्जीव बनविणारा आहे. या यांत्रिक आयुष्यांत मन किती निराश बनतें व जीवनाचें वैय्यर्थ पदोपदीं किती जाणवतें याचें प्रत्यंतर म्हणजे पार्थिवांच्या कविता होत. त्यांची 'चाकरी' ही कविता यशवंताच्या 'गुलामाचें गार्‍हाणें' या कवितेपेक्षां किती तरी परिणामकारक आहे. चाकरींत अकडलेल्या लोकांचे डोळे ही कविता वाचून भरून आल्याशिवाय राहावयाचे नाहींत.

या इथेंच येउानिया बलहि होई दुर्बळ
स्वतंत्रते नकोस तूं खळबळ मनिं निष्फळ
कुरकुर नच थकली तरि उगीच ताडितोस कां
उभा मी हात जोडुन करुनी नमन सारखा
वढाइ मारणें तुझी पिळल्या या उरे रगी
उपास काय काढूनी तुजशि दाखवूं सुगी?

चाकरीचा परिणाम शेवटीं काय तर पार्थिव म्हणतात—

मालक, आधार तूंच पारतन्त्र्यीं या मना
यौवनांतच मज जरा येउनि बघ करी खुणा
रुधिर थंड हें बघुनी मृत्यो! कां तूं फसशी
झडप घातल्याविणेंच घडि घडि कां परतशीं

ही कविता किती हृदय भेदून टाकणारी आहे. या मानानें यशवंताचें 'गुलामाचें गार्‍हाणें' हें अगदींच निर्जीव वाटतें.

अशा निराशेंतूनच पार्थिवांची वृत्ति ईशचिंतनाकडे वळली आहे. गाडगीळासारखा पार्थिवांचा स्वभाव मूळचाच हळवा नि एकलकोंडा नसावा असें वाटतें. तर परिस्थितीनें त्यांचें मन असें घडवलें असले पाहिजे. एरव्हीं प्रत्येक वस्तूची फक्त dark बाजूच त्यांना कां दृष्टीस पडली असती

ते फुलाकडे पाहतील तर त्यांना अगोदर हाच विचार सुचतो कीं हें फूल कोमेजून गेल्यावर त्याला कोणी विचारायचें नाहीं. इतकेंच काय त्यानें ढाळलेले अश्रुबिंदू सुद्धां उडून जातील व स्मृतिसुद्धां शिल्लक राहणार नाहीं. श्री. कोरेकल हे आपल्या अध्यात्मवादांतूनच जगाकडे निसर्गाकडे नाशवंत या दृष्टीनें पाहातात. म्हणजे त्यांच्या डोळ्यांना अध्यात्मवादाचा चश्मा लागला आहे, पण पार्थिवांची भूमिका तशी नाहीं. मूळच्या आनंदी व उत्साही स्वभावाला परिस्थितीनें विषण्ण बनविलेलें दिसतें व निराशेनें त्यांच्या मनावर जबरदस्त आघात केला आहे. मनांतील विचारांना वाट करून देण्याकरितां त्यांनीं तीन मार्ग स्वीकारिले आहेत. अश्रुरूपानें दुःखाला वाट काढून देणें; दुसरा मार्ग ईशचिंतनाचा व तिसरा मार्ग म्हणजे राष्ट्रीय विचारांचा. अश्रूंची महति वर्णन करतांना त्यांच्या काव्य-मय कल्पना पहा.

वास अश्रूचा समाधान हें, न मिळे दुर्भाग्याला
सीमा नुरली, कल्पांताचा दुर्दैवी तो ठरला
डोळे भरुनी अश्रू लोटले म्हणजे झालें काय!
मृणालकंदाहुनी मृदुलतर पर्वतपंक्ती होय
अश्रूवांचुन प्रेम बोलणें कुडीवांचुनी जीव
अश्रूजलाच्या शिवाय कैसी तरेल प्रीती नाव

इतकें म्हणून ते शेवटीं म्हणतात—

निधनानंतर अश्रू अंजली टाकुन जातां कोणी
थडग्या मधला ‘ धन्य ’ ध्वनी हा घुमेल त्याच्या कानीं

देवाला सुद्धां विनवितांना ते हेंच म्हणतात—

आण गळ्याची सख्या ईश्वरा! एकच दे वरदान
कुसुमाहूनि ही कोमल वाटो झेलाया वाग्बाण

पार्थिवांचीं ईश्वराचीं वर्णनें व भक्तिपर कविता इतर कोणत्याही कवी-पासून वेगळ्या आहेत. गाडगीळांची भक्ति ही परमेश्वराला सखा कल्पून त्याचीं गोचर वर्णनें करण्यांत आनंद मानते. कोरेकलांची भक्ति अद्वैती स्वरूपाची आहे. निराकार व बुद्धीस अगम्य अशा ईश्वराशी एकजीव हो-ण्याची धडपड दिसून येते. गाडगीळांच्या भक्तींतला जिव्हाळा हृदयस्पर्शी आहे. कोरेकलांच्याविषयीं आदर वाटतो. नांदापूरकर संसारसुखें भोगून उपरति झाल्यासरखें बोलतात पण पार्थिवांच्या भक्तींत निराशेच्या कडेस पोहोंचलेल्यांचा निर्धार आहे. त्यांचे उद्‌गार त्रागा करणाऱ्या भूमिजनाचे उद्‌गार वाटतात. माझ्या चुकांचें प्रायश्चित्त मी भोगीत असेन पण म्हणून कां मी तुझे नांव टाकीन. तुला मी कधींच सोडणार नाहीं त्यांची "राहा माझ्या सोबतीस" ही कविता मनाला चटका लावणारी आहे.

आलेरे भरासी देवारे, कणीस
मोडुनी दयाळा लाविशी भिकेस
माप खोटें काय? मला न जाणीव,
म्हणूनी ठेविशी नशीबीं उणीव?
आज वेळोवेळीं पेरलेली चूक
वैरे साधिते ती नासूनिया पीक!
भावी नांगरणी कणीं कणीं यश
राहा रुजवोनी माझ्या सोबतीस
कण कण घेई मोजुनी तूं रास
तुझ्या श्वासांतूनी स्फुरो माझा श्वास!

त्यांच्या ईशचिंतनपर कवितांतून सरसपणा पुरेपुर भरला आहे पण गीतांजलीप्रणीत रूपकांचा वास या कवितांना लागल्या सारखा वाटतो. रूपकें

त्याच धर्तीच्या आहेत. परमेश्वर येईल म्हणून मी खडबडून उठलों. मनां-तली फुलझाडी टवटवीत झाली. पाय धुण्याकरितां झारीतून सुवास जल भरून ठेविलें. तुला स्वागतण्याकरितां मी सारखा येरझारा करीत होतों व अखेर दारांत येऊन उभा राहिलों तों कळलें कीं तुझी स्वारी येऊन गेली. मग मला वाईट वाटून फकीरी बाणा अंगांत भरला व मी सारी मोडझोड केली.

नादांत तुझ्यारे, गेला झडुन पिसारा
होईल हंसें, जर जाइन मी माघारा
हा तव दारींचा हालणार न पहारा
भरशील केधवां माझा सांग कटोरा!

पार्थिवांच्या राष्ट्रीय वृत्तीच्या कांही कविता आहेत पण त्यांत सुद्धां विजयश्रीच्या पाठीमागें लागणाऱ्या मदांचा आवेश नाहीं तर पराभूत होऊनही धीर कायम टिकविणाऱ्यांचा निर्धार दिसतो. भावी विजयाच्या आशेची हिरिरी व दुर्दम्य उत्साह त्यांतून नाहीं पण पराभवांत सुद्धां मान ताठ ठेवण्याचा निश्चय आहे.

'पराभूत वीर' या कवितेंत ते म्हणतात.

'काय असें झालें कशानें डाव असा हुकला
वेगवान वारू स्वतांच्या टापांनीं बुजला
कोसळतां किल्ले पेलल्या तटबंदी भींता
ताच कशी खचली कळेना चिरबंद छाती'

असा त्यांना विस्मय वाटतो. त्यांच्या दृष्टीस अवसानघात दिसतो. स्वातंत्र्यार्थ कापाकापी करून रणांगणावर निजलेले वीर दिसतात, शृंख-लाबद्ध बंदिवान दिसतात. ज्यांनीं पराभव अजून अनुभविला नाहीं, ज्यां-ची धीरवृत्ति फितुरीनें व राष्ट्रद्रोह्यांच्या स्वार्थानें अजून भंगली नाहीं,

ज्यांना शृंखलाबद्ध होण्याचा तापदायक अनुभव अजून आला नाहीं, अ-शांचा उसळता आवेश पार्थिवानीं चित्रिला नाही. याचें कारण एकच कीं पार्थिवांची दृष्टी अजून आपल्या अवनतस्थितीकडे वळली आहे. त्यांच्या स्वभावतः धीर प्रकृतीचा विशेष हा आहे कीं अशा परिस्थितींत सुद्धां त्यां-चे राष्ट्रवीर आपलें ध्येय विसरत नाहींत व एकदां टाकून दिलेली धुरा मानेवर घेण्यास तयार नाहींत. शहीदांचा आत्मत्याग त्यांच्यांत आहे. धीर वृत्ति आहे पण ही वृत्ति परभवानंतरची आहे. अशा कवींची तुलना कांत कृष्णाकुमारादि कविशीं करतां येत नाहीं. श्री. महाजनांनीं आपल्या खाजगी पत्रांत पार्थिव व कृष्णाकुमार या कवींना श्री. कांतांचे सहचर, सहानुभव व सहमत ठरविलें आहे. पण पार्थिव व कांत यांच्या वृत्तींत जमीन अस्मा-नाचा फरक आहे. कांत प्रभात कालच्या द्वारावर उभे आहेत. त्यांना गत अवनतीची वा प्राप्त अवनतीचीं चित्रें दिसत नाहींत. त्यांना पराभव अजून ठाऊक नाहीं त्यांची हिरीरी त्यांना पुढें नेत आहे. पण पार्थिवांना पुढची प्रभात दिसते पण जगाचे टक्केटोणपे खाऊन अनुभवानें विवेकी बन-लेल्या त्यांच्या मनाचें धीरत्व जरी ढळलें नसलें तरी अयुष्यांत पराभव हो-ण्याचा संभव आहे. निराशेचे प्रसंग येऊं शकतात हें ते विसरूं शकत नाहींत व प्रभात राग आळवितांना सुद्धां त्यांना भैरवीचा विसर पडत नाही. दुसरा फरक हा कीं कांतांची दृष्टि देवादिकांच्या कल्पनेनें भारली गेली नाहीं पण पार्थिव शांतीकरितां ईशभक्तिकडे धांव घेतात. जो निर्धार नि त्रागा त्यांच्या राष्ट्रभावनेच्या कवितांत दिसून येतो तोच त्रागा त्यांच्या ईशभक्तींत दिसून येतो

पण पार्थिवांना शांतीचा लाभ झाला आहे काय? आम्हाला तर शंकाच वाटते. गाडगीळांचे पाय गृहसौख्याच्या व ईशभक्तीच्या जमिनी-

वर टेकले पण पार्थिवांचें तसे झालें नाहीं. त्यांच्या कवितांतून निर्धाराच्या आणि मूळांतून धैर्य असणाऱ्या वृत्तीचा आविष्कार नसता तर पार्थिवांना संपूर्ण निराशावादी ( Profoundly Pessimistic ) असें म्हणण्यास आम्हीं कमी केलें नसतें; पण तसें नाहीं. पराजय होणार हें कळूनहि एका स्कॉच सेनापतीनें उद्गार काढले होते ' We must just fight ' लढा हा चालू ठेवलाच पाहिजे. पार्थिवांच्या कविता वाचून त्या उद्गारांची आठवण होणें साहजिक आहे. परिस्थितीच्या प्रवाहांत ते सांपडले आहेत पण डोकें वर काढून ते हात मारीत चालले आहेत.

पद्माकरांचा रंगेलपणा, गाडगीळांचा हळवेपणा, कांतांचा आवेश, नांदापूरकरांची उपरातिपूर्ण वृत्ति, महाजनांचा प्रसन्न व तृप्त खानदानीपणा व कोरेकलांचा उदास अद्वैतवाद यांचा अभाव पार्थिवांच्या कवितांत असला तरी परिस्थिति, जन्म, निराशा व निराशेंतूनहि टिकविलेला निर्धार यांमुळें त्यांच्या कवितांना वैशिष्ट्य आलें आहे. नांदेड संप्रदायांतील सर्वच कवीमध्यें प्रसाद व लालित्य हा जो गुण दिसून येतो तो पार्थिवांतही आहे. क्वचित् ठिकाणीं भाषा दुर्बोध वाटते व कांहीं ठिकाणीं रूपकें फाजील रीतीनें लांबलीं आहेत. ' धन्य तरू ' ही कविता याचें उदाहरण आहे.

यापुढील कवितांतून पार्थिवांची प्रतिभा मराठवाड्याला आशावादित्वाचा संदेश देईल अशी अपेक्षा करणें अनाठायीं होईल काय!

# ११

## पोहनेरकरांची कविता.

**जन्म २१-९-१९०८**

श्री. पोहनेरकरांचा कवितासंग्रह 'बागशाही' इ. स. १९३१ त प्रसिद्ध झाला; त्याला आज इतका काळ लोटला तरी या संग्रहाचें परिक्षण कोणी केलेलें माझ्या पाहण्यांत आलें नाहीं व मराठवाड्यानें या कवीच्या वाङ्मयकृतीकडे जसें लक्ष्य द्यावें तसें दिलें नाहीं. हें असें होणार याची जाणीव हळुवार हृदयाच्या कविमनाला होती असें दिसतें. प्रस्तावनेंत वाचकांस उद्देशून पोहनेरकर म्हणतात,

" या 'बागशाही' पेक्षां पुष्कळशा अप्रतिम बागा तूं पाहिल्या असशील, म्हणून या वन्य कुंजाचा तिरस्कार करूं नकोस! कौतुकानें त्याच्याकडे पहा आणि समाधानाचा एकच कां होईना श्वास सोड,

तेवढ्यांतच हा गरीब माळी या त्याच्या श्रमांचें सार्थक झालें असें मानील.

आपली पहिली कविता ' बागशाही ' हींतसुद्धां कवीनें वाचकाला याच सुरांत विनाविलें आहे.

> कष्ट करुनी वाढवीली प्राणप्यारी बागशाही
> कौतुकानें पाहूनीया धन्य करि ही बागशाही
> ' मंसृतीच्या तल्खलीनें ' श्रांतलेल्या वाचका!
> शांतवाया त्वजिवाला लाविली ही बागशाही

कवीला आपल्या काव्यशक्तीच्या मर्यादेची जाणीव असावी कारण याच कवितेंत त्यानें—

> ' सत्कवींच्या कल्पनांचें नाचतें कारंज येथें
> त्या तुषारें आज फुलली प्रीतिची ही बागशाही'

असें म्हटलें आहे. या कवितासंग्रहांत एकंदर सव्वीस कविता छापल्या आहेत. यापैकीं एक कविता ही ' टागोरकृत गीतांजलीचा मराठी अनुवाद' आहे व दुसरा कविता ' चिरवियोगी हृदय ' ही एका फारसी कल्पनेवर आधारली आहे. बाकीच्या चोवीस कविता स्वतंत्र आहेत. या कविता इ. स १९३० च्या सुमारास लिहिल्या गेल्या आहेत. फक्त दोन कविता ' परापूजा ' व ' कशाला घेशि समशेर ' या कविता इ. स. १९२७ त लिहिल्या गेल्या आहेत. यावरून इ. स. १९३० मध्यें कवीची जी मनःस्थिति होती ती त्यानें या संग्रहांत चित्रिली आहे.

पोह्नेरकरांच्या कवितांचे स्थूल मानानें दोन भाग पडतात. प्रेमपर कविता व राष्ट्रीय कविता. यावरून त्यांची प्रवृत्ति कुणीकडे आहे हें कळून येतें. त्यांतल्या त्यांत प्रेमपर कविता या १९३० च्या पूर्वार्धांत पडतात, तर राष्ट्रीय कविता त्याच वर्षाच्या उत्तरार्धांत व १९३१ च्या

सुरवातीस येतात. प्रणयपर कवितांचे विषय खालीलप्रमाणें आहेत.

'प्रीतीचें गुज', 'गुलाबाचा रंग गुलाबी कां', 'उपवनांत', '! स', 'प्रेम दे न विषया थारा', 'प्रेमाचा पाठ', 'चिरवियोगी हृदय', 'जीवित सार्थक', 'चांदण्यांत', 'प्रेमाच्या परमेश्वरा', 'प्रीती अंतरल्यावर', 'प्रेम', 'प्रीतीचा गुलाब' या तेरा कवितांतून पोहनेरकरांनीं आपलें प्रेमाचें तत्वज्ञान विशद केलें आहे. प्रेम या कवितेंत ते म्हणतात:—

प्रेमाच्या साठीं मरणें
तें मरणें कैसें होई। ना कळे
प्रेमास्तव जगतीं जगणें
प्रेमाविण जगणें, मरणें. । हें खरें
प्रेमची, जगाचें सार, नसे आधार
जीविता कांहीं, प्रेमाविण कांहीं नाहीं ; जगतिं या

पोहनेरकरांच्या मतें जग प्रेमावर आधारलेलें आहे. प्रेमावांचून जीवित म्हणजे निःसार आहे. प्रेमाशिवाय जगांत कांहींच नाहीं.

परमेश प्रीतिचा दास, विश्वास तियेचा फास। हा असे
जीवास, अखिल विश्वास, सर्व जगतास, प्रीतिचा पाही
आधार तियेविण नाहीं। दूसरा

या प्रेमाचें दुसरें स्वरूप म्हणजेच आकर्षण होय. सृष्टींत परस्पराकर्षण आहे, त्यानेंच सृष्टि चाललेली आहे. प्रेम हीच एक जगाची शक्ति आहे. खुद्द परमेश्वर हा प्रेमाचा दास आहे. किंबहुना परमेश्वर म्हणजेच प्रेम आहे. व प्रेम परमेश्वर आहे. 'प्रेमाच्या परमेश्वरा' या कवितेंत कवि म्हणतो.

प्रेमास पूजीतांना स्वयें प्रेमची व्हावें
एकाच शरीराची जोपासना कशाला

— पोहनेरकर

असंख्य रूपें क्रीडा करुनी भोगूं प्रेमाला
अत्युच्च लाटवरीं उभे राहूं आनंदें
आकाश – अंगणांत झिम्मा खेळूं स्वच्छंद
नटूनी किरण रूपीं हंसवाव्या कलिका
तोडूनि बंधनांना आशा तृष्णा जाळूनी
प्रेमांत मरुनी जाऊं प्रेम राहूं होवोनी

पोहनेरकरांची प्रेमाची कल्पना म्हणजे सविकल्प समाधी नाहीं तर आशा तृष्णा जाळून व बंधनें तोडून प्रेमांत विरून जाणारी अशी आहे. ते प्रेमाला एक entity समजतात. निव्वळ भावना समजत नाहींत. नाहींतर प्रेमांत मरून जाणें याचा अर्थ समजूं शकतो, पण प्रेम होऊन राहणें म्हणजे काय याचा अर्थ हाच घ्यायचा कीं इतर क्षुद्र नि क्षुलक आशा तृष्णा काढून टाकून निव्वळ प्रेमस्वरूप होऊन राहणें हेंच आपलें ध्येय ठेविलें पाहिजे. कारण प्रेमाची भावना हीच एक महत्वाची भावना आहे, इतकेंच नव्हें तर प्रेम हेंच सृष्टीला आधारभूत आहे. सृष्टींतील सजीव निर्जीव वस्तूंना दृढतेनें जखडणारें तें बंधन आहे ही पोहनेरकरांची प्रेमाविषयीं कल्पना आहे. याबरोबरच त्यांनीं दुसऱ्या कल्पनेचा आविष्कार केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, प्रत्येक वस्तू ही स्वतः अपूर्ण असते. त्या वस्तूला दुसऱ्या वस्तूची जोड मिळाल्याशिवाय पूर्णता येत नाहीं व तोंपर्यंत त्या वस्तूचें सार्थक होत नाहीं. ही कल्पना ‘ जीवित सार्थक ’ या कवितेंत उत्तम रीतीनें मांडलेली आहे. चंद्र उगवलेला आहे पण त्याचें कौतुक करण्यास तारका नाहींत.

तारका, रत्नदीपिका, मनोहारिका, उगवतां पाही
चंद्राचें सार्थक होई । हें खरें

तसेंच कुमुदिनी पुष्करणींत हंसत बसली आहे.

परि न कां, जिवाचा सखा, प्रेम बालिका, सुविण्या यांचें
जन्माचें सार्थक व्हावें । मग कसें

इतकें सांगून शेवटीं कवि उद्गार काढतो—

जगिं जरी, प्रीत ना तरी, प्रणय अंतरीं; कसें हा त्याचें
सार्थक हें व्हावें साचें । या जगीं

मुख्य प्रीति अंतरल्यावर—

जरी प्रीतीविना राहूं जगांनी कायसें चीज
सुखानें देवदेवा! तूं येऊं दे शांतिची नीज

कोणास वाटेल, पोहनेरकरांच्या प्रेमाची कल्पना ही विषय कल्पनेहून आगळी नाहीं. पण त्याचा ही खुलसा कवीनें केला आहे. तो म्हणतो, राधामाधवप्रेमास लोक विषयी म्हणतात तर म्हणूं दे, कृष्णाच्या गोपी प्रेमास लोक विषयी म्हणतात तर म्हणूं दे. पण ज्या प्रेमाच्या सुरलींत वेदशास्त्र तल्लीन होतात, ज्याचे सूर हृदयाला भिडतांच त्यांत हेलकावे उत्पन्न करतात, ज्यामुळें हृदय आनंदून जातें व प्रेम प्रतिभेंत विरघळून जातें व विश्व प्रेमांत व प्रेम विश्वांत लीन होऊन भेदभाव सगळा हरून जातो, त्यांत विषयवासनेला थारा मिळूं शकेल काय?

सांगूं ये अखिल जगताला
प्रेम दे न विषया थारा

पण यांत पोहनेरकरांचा हाच सांगण्याचा अर्थ आहे कीं प्रेमांत कृत्रिम व दुष्ट भावनांना थारा नाहीं. वस्तूवस्तूंतील आकर्षणांत विषयवासनाच असणें हें दुष्ट आहे. प्रेमाचेंच आकर्षण आहे, प्रेमबंधनांतील सगळे संबंध पवित्र आहेत. पण कृत्रिम विषयावासनेचें व प्रेमाचें वावडें आहे. पोहनेरकरांनीं प्रेमाचें खालील प्रकारें समीकरण मांडलें आहे.

— पोहनेरकर

प्रेम = पावित्र्य = परमेश्वर

या जाणीवेनें प्रेमाचें तत्वज्ञान विशद करणारे पोहनेरकर हेच एक आपल्याकडील कवी दिसतात. त्यांच्या कवितांत उत्तान शृंगार नाहीं. त्यांची प्रेमगीतें विषयवासनारहित आहेत, असेंच त्यांच्या कवितांवरून म्हणावेसें वाटतें. त्यांचें प्रेम पवित्र आहे. सजीव निर्जीव वस्तूंना बांधण्याचें साधन आहे, तें प्रेम जगाचें अधिष्ठान आहे, परमेश्वर याच प्रेमाचा दास आहे. किंबहुना प्रेम म्हणजेच परमेश्वर, या प्रेमांत आशा तृष्णेला जागा नाहीं. किंबहुना ज्यांनीं वासनांचा त्याग केला आहे त्यांनाच प्रेमाची प्राप्ति होईल. या प्रेमानें मरणें म्हणजेच जगणें आहे व या प्रेमावांचून राहणें म्हणजेच मरण होय. प्रेम दृष्टि असली तरच चराचर सृष्टीचें रहस्य आपल्याला समजते. हे प्रेमाचे पाठ आपल्याला निसर्ग देतो ( कविता प्रेमाचा पाठ पान १७ ) हीं थोडक्यांत पोहनेरकरांची प्रेमाची Philosophy आहे. आणि प्रेमी हृदय असल्याशिवाय कवि, कवि होऊं शकत नाहींत. कवी निसर्गाचें रहस्य ओळखतो व रसिकास ओळख पटवितो ( कविता 'कवि' पान ५ ) सूर्य फुलांना आपल्या मऊ किरणांनीं खुलवितो, याची जाणीव कवीलाच होते. फुलाचा मधुगंध भ्रमराला कळविण्यास कवीच दूताचें काम करतो, कलिका–हृदयांतलें गुपित कवीच जाणतो व रसिकास कळविण्याचा अधिकार त्याचाच आहे. सकाळीं जेव्हां सविता गुलाल उधळीत येतो व प्राची दिशा प्रफुल्ल होते; त्यावेळीं कवीच रक्तिमा रंगावितो, दंवबिंदुरूपी मौक्तिक–मालेचे मूल्य कवीलाच कळतें, हा हंसऱ्या वसंताचा संवगडी आहे, वनांत वायू रम्य ताना घेतो त्याचे सूर कवि मनालाच कळतात, समुद्र नाचूं लागला कीं कवींचें हृदय हलूं लागतें. इतकें म्हणून पोहनेरकर म्हणतात,

सम्राज्य हें जगाचें लोळे पदीं कवींच्या
जगदीश जो जगाचा तो दास त्या कवीचा

कवीचें वर्णन जें पोहनेरकरांनीं केलें आहे तें नैसर्गिक अतएव रम्य वाटतें. केशवसुतादि कवींच्यासारखें त्यांनीं कवीविषयींच्या व कवि सामर्थ्याच्या भलत्याच कल्पना केल्या नाहींत. कवि हा रसिक आहे. त्याला सौंदर्यदृष्टि असते. निसर्गाशीं रममाण होऊन निसर्गातील सौंदर्य व समताल हेरण्याइतकें त्याचें अंतःकरण हळुवार असतें आणि म्हणून निसर्गाचें भाष्य कवीच करूं शकतो. हें अतिशयोक्तिरहित वर्णन पोहनेरकरानीं केलें आहे. नाहीं तर कवी हा जगाचा शास्ता आहे, देवानें ब्रह्मांड त्याला खेळायला दिलें आहे, तो वाटेल तें करूं शकतो इत्यादि भरमसाट विधानें त्यानीं केलीं नाहींत. अशा कवींची हजेरी प्राध्यापक माटे यानीं आपल्या बालकवींच्या कवितांच्या प्रस्तावनेंत घेतली आहे ( पान १७ )

" खाणारे आम्ही मोती । राजहंस भूमीवरती "

या राजहंसाच्या पाठीवरून हात फिरवून एवढेंच सांगावेसें वाटतें कीं, ' शुद्धीवर असावें ' कारण येथून पुढें शुद्ध चालल्याच्या खुणा स्पष्ट दिसतात

तेजाचे आम्ही दास । सत्याची धरिली कास ॥
देवाला फिरवूं मागें । दाखवितां कांहीं सोंगें ? ॥
देहाची पर्वा नाहीं । कीर्तीची चाडहि नाहीं ॥

हीं सारी शुद्ध बरळ आहे—

सुदैवानें पोहनेरकरांनीं कविकडे सगळें जग सुधारण्याचा, किंवा जगाला खेळणें म्हणून समजण्याचा मक्ता दिला नाहीं. त्यामुळें त्यांच्या ' कवि ' या कवितेंत अवास्तवता नाहीं. त्यांच्या कवितांतून कल्पनाविलास उत्तम प्रकारें दृष्टीस पडतो, ' गुलाबाचा रंग गुलाबी कां ' यांत विश्वाच्या पालनवाल्यानें लक्ष्मीचें चुंबन घेतलें व त्यामुळें ज्या रंगाचा आविष्कार झाला त्यांत

सुस्नात, होउनी त्यांत, त्याच रंगांत, फुलें जीं नटलीं
तीं गुलाब पुष्पें फुललीं । जगतिं या

अशी कल्पा केली आहे. चिरवियोगी हृदय या कल्पनेंतील हलुवार-पणा मखमालीला लाजवतो. प्रेमाच्या चिंतनांतच मरून गेलेल्या एका प्रेमी जीवनाच्या समाधीवर वरील वेलींचीं फुलें पडतांना समाधींतून हळूंच आवाज येतो.

पडतांच, फूल तेथोनि, समाधींतूनि, ध्वनी ये एक,
" हळुंच टाक फूल एकेक । मजवरी "

पण इतकें ही अलग होण्याचें कारण काय तर—

" आधींच, हृदय सुकुमार, त्यावरी भार,
प्रीतिचा होई, पडुनिया फूल मग होई । तें कसें "

फारसी कल्पना—

' आहिस्ता बर्गे गुलबफिशां वर मजारे मा '

यावर ही कविता आधारली असली तरी मूळ कवितेंतील मार्दव या कवितेंत पुरेपुर उतरलें आहे यांत शंका नाहीं व यावरून कवीच्या सौंदर्य-दृष्टीचा साक्ष पटते. ' चांदण्यांत , या कवितेंत कृष्ण यशोदेस विचारतो कीं, आई या चांदण्या, कुणीं कधीं कशा बनविल्या तें सांग. कां देवाच्या कांबळींतून हे मोती गळले आहेत, कां देवाघरच्या गाई.

गोपाळ चंद्र हा पहा । जाहला
कीं मुला, तशा परि पिलां, खाउ हा दिला, उधळुनि लाह्या
देवाची अघटित माया । ही असे

यशोदा उत्तर देतें कीं बाळा एकदां बालरवी परमेश्वराच्या पुजेला गेला होता, त्यावेळा स्वर्गीच्या वेलीवर फुलें बहरलीं होतीं. तीच फुलें वेऊन

त्यानें परमेश्वराला वाहिलीं पण प्रीतीच्या पहिल्या भेटींत प्रेमाश्रू दाटून आले व सूर्याच्या हातास कांपरें भरलें.

हातांस, भरुनि कांपरें, नजर चावळे, फुलें तीं गळलीं
पदकमलावरुनी ढळलीं । तेधवां
आकाश अंगणामाजी
तीं फुलें विखरुनी गेलीं । तेधवां
सुमनांची झाली शेज
कोमल पदयुगुलाखालीं । तेधवां
उचलण्या फुलें लगबगिनें
तो कौस्तुभ आला खालीं । तेधवां
आनंद, सर्वस्वच्छंद, विश्व सुखकंद, पाहतां हंसलीं
तारका स्वरूपें नटलीं । तीं फुलें

अशीच सुंदर कल्पना ' प्रभातीं ' या कवितेंत आहे. श्रीकृष्ण विचारतो, ' आई काल रात्रीं तारका लकलकत होत्या त्या आतां कुठें गेल्या बरें ? ' यशोदा उत्तरते, ' बाळा, या तारका म्हणजे रजनीचीं बाळें आहेत. रात्री रजनी त्यांना नीलवर्ण शेज करून निजविण्याचा प्रयत्न करते पण तीं तुझ्या सारखींच आहेत, निजविलें तरी निजत नाहींत, कोणी डोळ्याची उघडझांप करतें, कोणी अंगावरचें पांघरूण काढतें, कोणी दुसऱ्याला जागावितें, आणि आईला भंडावून सोडतें, अशा प्रकारच्या त्यांच्या खोड्या सारख्या चालू असतात व मग दमून भागून झोंप येते न येते तोंच अरुणोदय होतो. त्यांचा पिता बालरवी आहे. त्याला त्यांचें ऊन पडेपर्यंत निजणें आवडत नाहीं, मग रजनी तारकांना लगबगीनें उठविते व त्यांना दंवबिंदूच्या पाण्यानें न्हाऊं घालते. आणि मग वस्त्र नेसून ते जगांत

खेळण्याकरितां खालीं येतात.

बागेंत नाचती कोणी
वृक्षावर खेळत कोणी । खेळ ती
वाऱ्याशीं खिदळत कोणी
रंगले प्रीतिच्या गानीं । उपवनीं
हांसती प्रेम आनंद
काननांत कोणी धुंद । यापरी

पोहनेरकरांच्या काव्यांत एक प्रकारचा गोड हळुवारपणा आहे. त्यांची कविता ऋजु शुद्ध नि सात्विक वाटते. कल्पना गोड नि आल्हादकारक असतात. त्यांच्या प्रेमपर काव्यांत उत्तान किंवा अश्लील असें कांहीं नाहीं. त्यांचें प्रेम विषयवासना किंवा रतिलंपटतेविरहित आहे. त्यामुळें त्यांच्या कविता वाचतांना मनाला सात्विक आनंद वाटतो.

प्रेमरसप्रधान कवितांबरोबरच त्यांनीं राष्ट्रीय कविता केल्या आहेत व त्यांत जिव्हाळा व्यक्त केला आहे. पंडित मोतीलाल नेहरूंच्या मृत्यूवर त्यांनीं कविता" अश्रूमोचन ' लिहिली आहे. ते शेवटीं कळवळून म्हणतात.

जाळितें, हृदय पोळतें, आंत तोडितें, दयाळा देवा!
मोतिलाल धाडुनि द्यावा । तो पुन्हां

' हिंदमातेची संक्रांत ' ' कशाला घेशि समशेर ' ' महाराष्ट्र-वंदन ' ' शाहीर वंदन ' या कविता राष्ट्रप्रेमपर आहेत. ' हिंदमातेची संक्रांत ' या कवितेंतील खालील ओळी पहा.

' हिंद भूमीची अंजुली तारका स्वरूपें नटली
वैजयांतींतूनी गळाली तींच पुष्पें सुकुमार
संक्रांत हिंदमातेची रसिकालागिं सांगणें
पुत्रा! आज तियेसाठीं घेई सत्वर धांवणें '

'महाराष्ट्र वंदन' या कवितेंत त्यांनीं गडकऱ्यांच्या धर्तीवर कविता रचिली आहे पण त्यांच्या या कवितेंतून जिव्हाळा दिसून येत असला तरी आवेश आढळत नाहीं. त्यांच्या प्रेमपर कल्पनांचा आढळ या कवितेंत सुद्धां दिसून ओजाला कसा निर्जीव करतो ते पहा—

परि भास्कर दुरुनी लगबग ही पाहतो
तो गुलाल घेउनि हांसत अवलोकितो
या प्रिय चेष्टेनें लाजितता आणतो
प्रणय खेळ हा जिथें खेळतो स्वर्देवहि नित्य
तोच आमुचा महाराष्ट्र बा तूंच सत्य सत्य

हें व मार्दव दुसऱ्या ओळींतूनहि दिसून येतें 'हे महाराष्ट्रा ! तुझे पादप्रक्षालन करण्याकरितां चंद्रभागा, कृष्णा, गोदा, वेण्या इत्यादि सज्ज आहेत. इंद्रानें अभिषेक करण्याकरितां तुझ्या शिरावर मेघकलश धरला आहे. व तुझ्या पूजेकरितां वसंत माळी फुलें पुरवितो. तो समुद्र तुला पाहून आनंदित होत्साता तुला आलिंगिण्यास धांवतो पण हें अशक्य पाहून तुला वंदन करतो व तुझ्या पदावर खेळत तुझ्याच आश्रयानें राहतो.' ही कल्पना मनोरम असली तरी आवेशोत्पादक नाहीं तिनें आनंद वाटेल व कवीचें महाराष्ट्रप्रेम दिसून येईल पण काव्यांत उत्कटता असली तरी आवेश नाहीं. महाराष्ट्रास उद्देशून कवि म्हणतो:—

प्रेमानें गाइन गाणीं तव कीर्तिचीं
जन्मवरी हा एक छंद दे त्वद्गुण गाण्याचा
पुनर्जन्मिही तोच राहुंदे हेतु शाहिराचा

शाहिर त्यांना आवडतात. स्वतः शाहिर व्हावेंसे त्यांना वाटतें. त्यांचें अलीकडील काव्य शाहिरी थाटाचें आहे. आपल्या आठ ऑगस्ट १९४८

निबंध १५३ १७।८।

च्या खाजगी पत्रांत ते मला लिहितात.


" काव्यप्रांती प्रेमाची आराधना हा विषय सध्यां सुटला आहे आणि पोवाड्यांच्या रूपानें सध्यां सेवा चालू आहे. विद्यार्थी दशेत प्रोफेसर क्लब स्थापन करून तीन वर्षे प्रोफेसर हें मराठी मासिक काढल्यानंतर त्याच धुंदींत वागशाहीचा जन्म मराठी साहित्य संमेलनाच्या सुमूहर्तावर झाला. परंतु त्याच्या नंतर ' प्रेमा राम राम ' या कवितेंत प्रणयाला रामराम करून गद्य शाहिरी क्षेत्रांत पाऊल टाकलें आणि तें यशस्वीही ठरलें आहे "

श्री. पोहनेरकरांचें अलीकडील लिखाण धार्मिक आहे. कांहीं लिखाण ऐतिहासिक आहे " पोहनेरकरांनीं ' नरसिंह लीलामृत व पंचीकरण ' या दोन अप्रसिद्ध ग्रंथांसंबंधीं प्रसिद्ध केलेली माहिती वाचनीय आहे " ( विहंग माला संमेलनांक पान १२ ) त्यांचे पन्नास पोवाडे लिहून तयार आहेत. तसेंच " आचार्य श्रीकृष्णांनीं सांगितलेला योग, " ' साधकांचा साधन योग ' ' नवरत्नहार ( दासबोधावरील निबंध ) ' इत्यादि लिखाण तयार आहे. पण अजून अप्रकाशित आहे. यावरून पोहनेरकर पूर्वीच्या प्रेमपर कवितापासून दूर गेले आहेत हें दिसून येईल. पण त्यांच्या प्रसिद्ध कवितांवरूनच आपल्याला त्यांचे मराठवाड्यांतील काव्यप्रांतातील महत्वमापन करायचें आहे. त्यांच्या कविता साध्या सरळ व शुद्ध आहेत. लोकप्रिय चालीच्या अनुकरणांत ' येइ भाई येथ पाही लाविली ही वागशाही ' ' हें तुझ्या हातिचें फूल म्हणुनि मज प्यारें ' इत्यादि कविता उघड उघड अनुकरणात्मक आहेत व कवितांवरून अजून एकदा हात फिरण्यास हवा होता असें वाटतें. पण त्यांच्या कविता दुर्बोध नाहींत, सरळ आहेत नि प्रासादिक आहेत. पण त्या कविता किशोरावस्थेंतील वाटतात व या कवीच्या मनावरील उमलत्या यौवनांत झालेले संस्कार त्यांत वर्णिले आहेत. या कविता

पाहून शुद्ध सात्विक व प्रसन्न अशा पण नवीनच उमललेल्या बटमोगऱ्याची आठवण होते. व कविता वाचून मन प्रसन्न होतें. शाहीर व धर्माचार्य पोहनेरकराकडे पाहूनही किशोर पोहनेरकरांचा विसर मराठवाड्याच्या काव्य प्रेमी रसिकांना पडणार नाहीं. शाहीरी पेशा त्यांनीं आतां पत्करला आहे. बागशाहींतल्या त्यांच्या राष्ट्रीय कवितांत उत्कटता आहे पण आवेश नाहीं. पण त्यांच्या अलीकडील कवितांतून ओज दिसून येतें. आमच्या काव्यांत प्रचलित परिस्थितीचें चित्र उमटावें हीच आमची इच्छा आहे. आणि म्हणून आमचेंही पोहनेरकरांना हेंच सांगणें आहे.

" राष्ट्रशाहिरा! ऊठ अतां तूं सांवर डफ दिमडी
थाप डफाची पुन्हां घुमवि तूं सान्या भीमथडी "

मराठवाड्याच्या पाहिल्या शाहीराला माझा मुजरा.



# १२

## कृष्णाकुमार गोळेगांवकराची कविता.

**जन्म १५ मे १९१०**

प्रथम हें स्पष्ट केलें पाहिजे कीं प्रस्तुत परिक्षक व कवि कृष्णाकुमार यांचा नामसादृश्यापलीकडे कांहीं संबंध नाहीं. श्री. श्री. के. गोळेगांवकर यांचा कृष्णाकुमार या नांवाखालीं कवितासंग्रह 'पहांटतारा' व 'फटत्कार' या पुस्तकांतून प्रसिद्ध झाला आहे. याशिवाय त्यांच्या दोन कविता महाजनांनीं संपादिलेल्या 'कवि संमेलन भाग दुसरा' या पुस्तकांत छापल्या आहेत. यांच्या एकंदर सत्तावीस कविता छापल्या गेल्या आहेत यामुळें कांत व पार्थिव यांच्या काव्याचें महत्वमापन करण्यांत अल्प काव्यसंपत्तीची जी अडचण उभी राहते तीच कृष्णाकुमारांच्या काव्यपरीक्षणांत उभी राहते. पण ईशभक्तीचा व अंधश्रद्धेचा पांगुळगाडा धरून चालणाऱ्या

मराठवाड्यांतील काव्यदेवीला ताठ उभी करण्यास लावून तिला नवीं क्षितिजें व नवीं दृश्यें दाखविणारे कांत व कृष्णाकुमार हे दोघेच असल्या-मुळें त्यांच्या काव्याचें महत्व त्यांच्या कवितांच्या संख्येवरून न करतां त्यांच्या काव्यगुणांवरून करणें इष्ट ठरतें.

कृष्णाकुमारांच्या कवितांपैकीं दोन कविता तावडतोब नजरेंत भरतात नि त्या म्हणजे 'ईशपृच्छा' व 'अरजी' या कविता होत. 'ईशपृच्छा' या कवितेंत ते देवाला म्हणतात 'देवा सगळीकडे अनीतीचा बाजार भरला आहे त्यांत काम, लोभ, दंभ इत्यादि वस्तूंची देवघेव होत आहे. साधूंचा संसार उत्तम प्रकारें चालला आहे. पण अशा अनीतिमय बाजारांत आपल्या नामाचा गजर ऐकून तूं अधीर होत आहेस. तुला दुसऱ्या कशा-चीच चाड नाहीं. फक्त आपल्या नांवाचीच चाड आहे. पापी अजामिळानें पुत्राच्या मिषानें तुझें नांव घेतलें कीं तूं मुक्त करायला धांवलास. अनीतीची मूर्तीच असा व्याध त्यालाही तूं मुक्त केलेंस असें किती तरी दाखले निघूं शकतील पण —

ध्यानीं परी ठेवा कृष्णाईचा बाळ
येतां कळिकाळ न भिणार
नको यज्ञ, याग, नको भक्ति योग
वृथा ऐसें सोंग कशासाठीं ?
हातीं नीति दंड धरितां कठीण
देवा लोटांगण घेशील तूं !

म्हणजे कृष्णाकुमारांनीं अनीतीवर पांघरुन घालून फक्त नांवाची चाड बाळगणाऱ्या देवाशीं दावा मांडला आहे व नीतिदंड हातीं घेऊन ते निर्धास्त झाले आहेत. 'अरजी' या कवितेंतील निर्वाणीचा बाणा पहा.

" कां न बनावें नास्तिक आम्ही तुम्हिच टाकिली जर नीत
चमत्कृतींतच अध्यात्माचा काय तरी झाला अंत
धर्माधर्म न ठावा मजला नास्तिक केवळ मी बनलों
आणि कुणाची धरिलि न परवा विचारवारुणि ही प्यालों
विचार हा कीं मदिरेंतच या वसुंधरा ही धवळावी !
शुक्रगुरूची वंचित विद्या पुन्हां एकदां उजळावी !
परमात्म्याला तुमच्या कळवा ' युद्धाला तूं सिद्ध रहा !
चोर लिपीनें कशास जगशी सोक्षमोक्ष कर ' म्हणा तया

मध्ययुगीन वाङमयाचा व विचारप्रणालीचा पाया ईशभक्तीवर उभारला होता. तो पाया आतां ढांसळून जाण्याची वेळ आली आहे. नवीन ध्येयें नवीं क्षितिजें व नवें अधिष्ठान यांची आवश्यकता आहे. कांतांनीं बंडखोरीचा संदेश समाजाला दिला आहे तर प्रभंजक कृष्णाकुमारांनीं नीतीचा दंड हातीं घेतला आहे. त्यांना आतां कोणत्याच गोष्टीची भीती नाहीं. त्यांना कुणाच्याच मदतीची आवश्यकता भासत नाहीं. ' व्यर्थ दुजांची अनुकंपा ती ' या कवितेंत ते म्हणतात—

ज्याचे त्यानें घाव सोसणें
वृथा तयांचें अश्रु ढाळणें
सारें त्यांचें तें वर क्रांती
व्यर्थ दुज्याची अनुकंपा ती"

या वरील तीन कवितांवरून कृष्णाकुमार हे जुन्या संतकवींचीच परंपरा चालवण्यास तयार नसून आधुनिक वातावरणाशीं ते समरस झाले आहेत, हें दिसून येईल. त्यांच्या कवितांचे विषय राष्ट्रीय, सामाजिक, प्रणयपर व निसर्गवर्णनपर आहेत. आपल्या ' शांतिदूत ' या कवितेंत त्यांनीं भारतीय महात्म्याला नमन केलें आहे.

मराठवाड्यांतील आधुनिक कविता —

विश्वि एकला शांतिदूत तूं!
अध्यात्माची धवलकीर्ति तूं!
औदार्याची मूस मूर्त तूं!
प्राणहि वेंचिशि पतितासाठीं
यज्ञ म्हणूं कीं म्हणूं आहुति

व शेवटीं आशा प्रगट करितात कीं,

जाइल वितळुनि धुकें तमाचें
साम्य भारता दे नरकाचें
घडेल दर्शन त्या दिवसाचें
सर्व तयारी ही ज्यासाठीं!
यज्ञ म्हणूं कीं म्हणूं आहुति

त्यांची ' हुतात्मा ' ही कविता त्यांच्या हृदयांतील वीरपूजेच्या वृत्ती दाखविते

कापून मान जरि पडली खाली निश्चल तरिही वीर
सळसळोनी रक्त उसळे
वाळलेलें तृणहि द्रवलें!
दचकून भीतिनें भिजुनीं बसले जागीं पत्थर धीर!
भरत मुनिच्या वंशजांनों!
झोंप टाका बांधवांनों
ये अळशावरती स्वयें जान्हवी वाहत दोन्ही तीर
देशद्रोही शत्रु कोणी
तेंहि यारे गृध्र बनुनी
द्या स्पर्श एकदां करुनि तनूला, कराच इतुका धीर

' स्वातंत्र्य नसेल तर ' ही कविता वाचकांनीं संपूर्णपणें अवश्य वाचून

पाहण्यासारखी आहे. कांतांच्या ' आमुचा दसरा ' या कवितेंतील हृदयभेदीपणा त्यांच्यांत नसला तरी तोच आवेश व तीच तळमळ आहे.

ब्रह्मांडाची तृती जेथें, स्वयें अमृत येऊन
घ्या घ्या म्हणतां तृप्त जयांची नसे जाहली पूर्ण
माती चाटुनि तया म्हणावें शांतीस तुम्ही धरणें
मोत्यावांचुन खडे खाउनी हंसानीं वा जगणें !

आणि शेवटीं कृष्णाकुमार म्हणतात—

" स्वातंत्र्याचा दीप उजळला नाहीं तोंवरि येथें
बरी सुखाची जरी मिळाली कालझोंप जिवातें "

' जयोस्तुते ' या कवितेंत निराळयाच तऱ्हेनें त्यांनीं स्वातंत्र्य देवीची आराधना केली आहे.

उठली मग अंबा । खणखणली । शस्त्रास्त्रांची जाळी
पडलीं शिरकमळें । भूमितला । मोहर चैत्री फुलला
आलें स्वातंत्र्य । सर्वत्र । मंगलमय सुखसत्र । जय जय जय जय जय

कृष्णाकुमारांचा सडेतोडपणा व स्वातंत्र्यप्रेम हें या कवितांमधून पुरेपूर दिसून येतें. सामाजिक अन्यायाचा निषेध ते ' शेतकरी ' या कवितेंत प्रगट करितात. त्यांचा शेतकरी म्हणतो.

मांसच दिसे मज रुधिर गळे !
जिथें जिथें ही नजर वळे,
उंच उंच हीं पहा देवळें
जिथें चालती धार्मिक चाळे
यज्ञ–वेदिंतुनि होम पेटले
भोंवळ येउनि मिटले डोळे !

माझेंच दिसे मज रुधिर गळे
शेतकरी मी, कुणी न पुसते।
अश्वत्थाम्या परी हिंडतों!
जखम भराया स्नेह याचितों
लचके तोडिति उलट कावळे!
माझेंच दिसे मज रुधिर गळे.

ही कविता कांतांच्या मजूर या कवितेशीं ताडून पाहतां येण्यासारखी आहे. कांतांचा मजूर त्यांना शिबिराजाची आठवण करून देऊन म्हणतो.

या श्येनांनो! या सारे करूनी पाळें
घ्या अपुलें भारंभार तनुलचकें तोडुन सगळें!

पण कृष्णाकुमारांच्या शेतकऱ्याला, रंगणाऱ्या उषेंत, महिऱ्या संध्येंत उद्यानांतील गुलाबांत, मदिरेंतल्या लालींत, विलासिनींच्या ओठीं व गालीं रवालयांत, नृपसिंहासनीं, मण्यांत, देवळांत, यज्ञवेदींत, सगळीकडे स्वतःचेंच रक्त सांडलेलें दिसतें. औदार्याची सीमा करणाऱ्या शिबिराजाची उपमा कांतांना मजूराकडे पाहून सुचते तर कृष्णाकुमारांना जगांकडून गांजलेल्या, पीडिलेल्या व ग्रस्त अशा शेतकऱ्यांना पाहून भारती युद्धांतून, निर्धन मणी विरहित, जखमी व एकेकट्या वणवण भटकणाऱ्या अश्वत्थाम्याची आठवण होते. कांत मजूरांच्या स्वार्थत्यागाकडे जगाचें लक्ष्य वेधूं इच्छितात तर कृष्णाकुमार शेतकऱ्यांची तळमळ, त्यांच्या मनांतला हेवा व तगमग नजरे· समोर आणतात—

हा मोठा फरक कांत व कृष्णाकुमार यांत आहे. कृष्णाकुमारांनीं नीतिदंड हातांत धरला आहे. कांतांनीं

'बुडविले इष्कप्याल्यांत लौकिकी छंद'

छंद असें म्हणून प्रचलित समाजाशीं बंडखोरी पुकारली आहे. याच्यांत नष्ट झालों तरी मला त्याची पर्वा नाहीं असें कांत म्हणतात पण कृष्णाकुमारांनीं तशी वृति धारिली नाहीं. त्यांच्यांत नीतीचा कठोरपणा पण त्याबरोबरच उभे ठाकून लढण्याचे डावपेच त्यांना माहीत आहेत. आपल्या एकमात्र सामाजिक कवितेंत आर्यस्त्रीवरच्या आपत्तींचें सोशिकपणाचें वर्णन त्यांनीं किती तळमळीनें व मार्मिकतेनें केलें आहे पहा, त्यांची आर्यस्त्री म्हणते.

" तूंच शक्त कां रे अगस्ते सिंधूला प्याया
आजवरी असल्या जाहल्या कितीतरी आर्या
टाकिलास पिउनी वारिधी—जरि नुसता क्षार
पचविलेंच यांनीं त्यांतलें जहर तीव्र पार !
कालकूट पिउनी मिरविशी नीलकंठ जगतीं,
पहा महादेवा ! येउनी अबलांची कीर्ती
विषाचाच कीं या जाहल्या शमवाया दाह
नागिण ही काळी बांधिली पोत गळा काय !
आणि चंद्रकोरी मांडिलें भालावर ठाण
वाहतेच गंगा आमुच्या नित्य अश्रुंतून
तृतिय नेत्र किंवा उघडला हा भालावरला
नव्हेंच हें कुंकू, त्यांतल्या उफाळल्या ज्वाला
नेत्र तुझा जाळी जगाला—समोर दिसल्याला
नेत्र आमुचा हा जाळितो परंतु आम्हाला "

वरील उतारा जरी मोठा असला तरी कृष्णाकुमारांची भूमिका स्पष्ट करण्यास आवश्यक आहे. त्यावरून कृष्णाकुमारांची अनीतीची चीड स्त्रीदुःखाबद्दल वाटणारा जिव्हाळा व त्याचें वर्णन करतांना व्यक्त झालेला

उपरोध, हे स्पष्ट दिसून येतात.

कृष्णाकुमारांच्या प्रणयपर कविता पांच सात आहेत. त्यांत सर्वांत मला ' स्वप्न चंचला ' ही कविता फार आवडली. यांत प्रसाद, लालित्य व हुरहुर या गोष्टी फार उत्तम रीतीनें व्यक्त झाल्या आहेत. कविता वाचतांना मला मोहितलाल मुजुमदारांच्या बंगाली कवितांची आठवण झाली

' कोण गडे तूं मिटिशी डोळे !
आवळुनीया मउ करकमळें
वाजुं न देशी मुकिं पाउलें तूं
लागुं न देशीं लव चाहूल तूं
हळूं पावलीं येशीं किति तूं
पिसाट पुरतें मजला केलें
जो जो पुसतों नव भासविशीं
स्वप्नचंचला तर तूं नसशीं ?
जागृति माझी लयास नेशीं
मधु धुंदींतच मज गुंगाविलें
कोणं गडे तूं मिटिशीं डोळें '

तशीच " कोण सुधा ने घट भरभरुनी " यांतील खालील ओळी,

तुझीच छाया त्या नयनिं भरे
शंकेचे कां रचिशिं मनोरे
प्रणयाचें तुज नवीन वारें
तुझेंच तुजला कळें न अजुनी
कोण सुधा ने घट भरभरुनी

कृष्णाकुमारांच्या ' फटत्कार ' मधील कवितांत ' पहांट तारां ' तील कवितांपेक्षां जास्त Polish पॉलिश दिसून येतें. त्यांच्या दोन कविता ' वियोगी ' व ' सौंदर्यदर्शन ' या किता या दृष्टीनें चांगल्या आहेत. त्या वाचून बुद्धीला आनंद होतो पण हृदयावर परिणाम होत नाहीं. रसात्मक काव्यमय हिशेबानेंच पहायचें तर गंगाधर धनवटे यांनीं लिहिल्याप्रमाणें बुद्धीला आनंद देणाऱ्या या कवितेंतील रस हा आल्हादरस समजावा ( ज्योत्स्ना एप्रील १९३८ ) कृष्णाकुमारांच्या या प्रणयपर कवितांमधून आल्हादरस भरपूर आढळून येतो. विहंगमाला संमेलन विशेषांकांत श्री. श्रीधर व्यंकटेश केतकर हे कृष्णाकुमारांच्या विषयीं खालीलप्रमाणें लिहितात " ' वियोगी ' या काव्यांतील कृष्णाकुमारांचा पुढील श्लोक मन प्रसन्न करतो.

उषा हंसत ये निशा मुरडुनी प्रवेशा करी
परी उभयतांहि त्या कुटिल जाणिलें अंतरीं
नये किमपि त्यां दया हंसुनि येथुनी चालती
कळे विरह कोठुनी प्रणयमग्न झाल्याप्रती

त्यांच्या ' सौंदर्य दर्शनांतील ' कांहीं श्लोक सौंदर्याच्या कॅटलॉगप्रमाणें वाटतात. त्यांची ' प्रबोधन ' ही कविता मधुर आहे. "

कृष्णाकुमारांची कविताशैली मोहक आहे. कविता करतांना त्यांना कष्ट पडतात असें वाटत नाहीं. शब्दांची घडण चांगली आहे व प्रणयपर कवितांतील कल्पना आल्हाददायक आहेत. तरुण मनाला तर खात्रीनें चटका लावणाऱ्या आहेत पण त्यांचें वैशिष्ट्य या कवितांमधून नाहीं, तर त्यांच्या राष्ट्रपर, व नीतिपर कवितांतून आहे. मराठवाड्यांतील काव्याच्या इतिहासांत त्यांचें स्थान या वरील कवितांवरूनच ठरविलें जाईल. मराठवाड्यांतील जुन्या संतकवींचें वैशिष्ट्य त्यांच्या ईशभक्तीपर कवितांमधून

व्यक्त होतें. भोंवतालच्या राजकीय समाजिक व नैसर्गिक घडामोडींशीं ते कधींच तादात्म्य पाऊं शकले नाहींत. हंसराज पर्यंत म्हणजे इ स. १८६५ पर्यंत हीं संतकवींची परंपरा मराठवाड्यांत टिकली. भगवंतराव तोंडेवाल्यानीं अर्वाचिन कवितेस आमच्या प्रांतांत सुरवात केली. पण आधुनिक कवींत सुद्धां ईशभक्तीस प्राधान्य दिलें गेलें. महाजनांच्या कवितांत सामाजिक कवितांबरोबर ईशस्तुति भरपूर आढळते. पद्माकर तर निसर्गप्रेम व ईशप्रेम या दोन भावनांच्या तडाख्यांत सांपडले आहेत. गाडगीळ आपल्या मर्यादित वर्तुळाच्या बाहेर जात नाहींत. व

निरतांत रुचिराकृती तव सुकोमला पाहुनी
मदीय मन माधवा अमित जाय तें मोहुनी

जगांतील सुखदुःखें उच्चनीचता वगैरे पूर्व कर्मांचीं फळें आहेत, असें ते म्हणतात. नांदापूरकर तर "उपरती वरती मज दे रती" असें विरक्तपणानें उद्गार काढतात. कोरेकल तर अध्यात्मवाद कोळून प्याले आहेत. आमच्या कवींबद्दल साधारणपणें खालील सिद्धांत मांडतां येतील

(१) गाडगीळ — घरगुती भावना व ईशप्रेम
(२) कोरेकल — अध्यात्म प्रेम
(३) महाजन — समाजप्रेम व ईशभक्ति
(४) पद्माकर — निसर्ग प्रेम व ईशभक्ति
(५) नांदापूरकर - निसर्ग प्रेम व ईशभक्ति
(६) पोहनेरकर— राष्ट्रप्रेम व ईशभक्ति
(७) पार्थिव — राष्ट्रप्रेम व ईशभक्ति
(८) कृष्णाकुमार - नीति प्रेम व राष्ट्रप्रेम
(९) कांत — बंडखोरी व राष्ट्रप्रेम

अर्थातच हा सिद्धांत स्थूलमानानें झाला, पण एक गोष्ट स्पष्टपणें दिसून

— कृष्णाकुमार

येते ती ही कीं इतर कवींना पूर्वसंचित व ईशभक्ति हीं आपल्या जीवनाचीं मूलतत्वें वाटतात पण कांत व कृष्णाकुमार यांनीं या कल्पनांना पूर्णपणें फाटा दिला आहे. वर्तमानांशीं ते पूर्णपणें समरस झाले आहेत व भविष्याकडे त्यांचे डोळे लागले आहेत. मध्ययुगीन विचारप्रणालीकडे या दोघांनीं पण पाठ फिरविली आहे. कृष्णाकुमारचा ' शेतकरी ' व कांतांचा ' मजूर ' हे आतां काव्यदेवीचे नवे विषय आहेत. पारलौकिक गोष्टींना या दोघांनीं एकदां नव्हे तीनदां तलाख दिला आहे. कृष्णाकुमारांनीं तर ईश्वराला लढाईचें आव्हान दिलें आहे, कांत तर त्याची वास्तपुस्तही करीत नाहींत. काव्यदेवीचा रथ आतांपर्यंत जमीनीपासून चार बोटावर अधांतरीं चालत होता तो यांनीं जमीनीवर आणून टेकविला आहे किंवा असें ही म्हणतां येईल कीं मध्ययुगांतील चिखलांतून कांत व कृष्णाकुमार या दोघांनीं काव्यदेवीचा रथ बाहेर काढला आहे व या दोघा चक्ररक्षकांनीं रथाला इष्ट दिशेकडे वळण दिलें आहे. कृष्णाकुमारांचें महत्व या दृष्टीनें कांतांच्या बरोबरीचें आहे. ते आतां वृत्तपत्रव्यवसायामध्यें पडल्यामुळें त्यांचें कवितेवरील लक्ष उडून कांतावरच जबाबदारी येऊन पडली आहे, पण कृष्णाकुमारांनीं नवीन कविता करून मराठवाड्यांत आधुनिकतेची वीज खेळवावी अशी आमची त्यांना आग्रहाची विनंति आहे. मराठवाड्यांतील काव्यप्रेमी रसिकांचे डोळे त्यांच्याकडे लागले आहेत.

# १३

## कांत यांची कविता.

जन्म २० सप्टेंबर १९१३

माझ्या टेबलावर ' फटत्कार ' या नांवाचा कवितासंग्रह पडला आहे. तो संग्रह चाळतां चाळतां त्याच्या मुखपृष्ठावर अगदीं सुबक व घडीव अक्षरांत खालील शब्द दिसले.

" माझे नवपरिचित पण जुनेपणाच्या सलगीनें वागणारे रसिक मित्र कृष्णाकुमार एम. ए. यांस सप्रेम भेट " तारीख ८ – १ – ४३ फसली म्हणजे आक्टोबर १९३३ ची आहे.

हें पुस्तक पाहिल्याबरोबर मला श्री. कांत यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. संध्याकाळीं पांच वाजण्याची वेळ होती. मी मोअज्जमजाही मार्केट जवळच्या आपल्या खोलींत बसलों होतों तों कवि

मुकुंद ' प्रेमांजली ' कर्ते हे एका तरुणाला बरोबर घेऊन आले. कृश देहयष्टी, काळा सांवळा चेहरा व कांहींसे मलूल भाव असा माझा तात्काळ ग्रह त्या तरुणाकडे पाहून झाला. पण त्याच्या डोळ्यांत असामान्य असंतोष नि उतावीळपणा भरला होता. डोळे एका ठिकाणीं टिकत नव्हते. जीवाला कसली तरी ओढ लागल्यासारखें दिसत होतें. मला कल्पना होईना कीं हा तरुण कोण असावा तोंच मुकुंद विदरकरांनीं सांगितलें, ' हेच ते कवि कांत. '

अन कांतांनीं आपलें व्यक्तित्व पूर्णपणें आपल्या काव्यांत ओतलें आहे. आपण नेहमीं असें पाहतों कीं लेखकाच्या चेहऱ्यावरून त्याचें लेखन कसें असेल याचा आपल्याला अंदाज काढतां येत नाहीं. केशवसुत, करंदीकर, किंवा अलीकडे तर फाटक, वा. म. जोशी यांच्याकडे पाहून ते इतके नामांकित लेखक असूं शकतील अशी कल्पना येत नाहीं पण कवि कांत यांच्या असंतुष्ट, चंचल नी उतावळ्या चेहऱ्याकडे पाहिलें व त्यांच्या बंडखोर काव्याकडे पाहिलें कीं त्यांच्या कवितांतून बंडखोरपणा व दुर्दम्य आवेश कां ओसंडून वाहत आहे याची कल्पना येते.

श्री. कांत यांच्या कविता ' पहांट तारा ' व ' फटत्कार ' या दोन कवितासंग्रहामधून छापलेल्या आहेत ' पहांट तारा ' १९३९ मधें उगवला व मराठवाड्याच्या सुप्त सारस्वताला ' फटत्काराचा ' तडाखा १९३३ मध्यें बसला. अलीकडे मधून मधून कांत यांच्या स्फुट कविता राजहंस वगैरे मासिकांतून नी अमरज्योत वगैरे नियतकालिकांतून आल्या आहेत. पण संग्रह असा प्रसिद्ध झाला नाहीं.

' पहांट तारा ' व ' फटत्कार ' मधून मिळून कांतांच्या एकूण अठ्ठावीस कविता आल्या आहेत. यां पैकी सात आठ कविता निसर्ग वर्णपर

आहेत, व आठ कविता सौंदर्यवर्णनपर, नी उरलेल्या कविता सामाजिक व स्वत:विषयक आहेत. सामाजिक शब्दाचा मी अगदीं व्यापक अर्थ घेऊन म्हणतों आहें प्रचालित समाजाला जखडून टाकणारीं बंधनें मग तीं कोणत्याहि प्रकारचीं असोत कांतांना मुळींच सहन होत नाहींत. हीं बंधनें तटातट तुटून जावींत, व्यक्तित्वाचा पूर्ण विकास व्हावा याची सारखी तळमळ कांतांना लागली आहे. व हीं बंधनें तुटण्याकरितां त्यांना एकच उपाय सुचतो नी तो म्हणजे बंडखोरपणाचा, बेछूटपणें वागण्याचा. काळच असा आला आहे कीं बेछूटपणें वागणें हेंच सध्यांच्या परिस्थितीस आवश्यक आहे, नियमन व नियम पालन कोणाला तर जिवंत व तृप्त समाजाला पण मेलेल्या वा मृतवत् समाजानें रूढींना कवटाळून बसावें नी त्याला नियमन म्हणावें हें कांतांना अगदीं आवडत नाहीं. त्यांचें म्हणणें बंडखोरपणा हाच एक उपाय आहे, त्या शिवाय समाजाला दुसरा मार्ग नाहीं. आपल्या 'मधुराणी' या कवितेंत ते म्हणतात.

" सांडु दे फेस! घे भरी भराभर बाले,
बस ठेवुं नको तूं आज रिकामे प्याले
मधुराणी, कर पाजुनी जिवाला धुंद
बुडविले इष्क प्याल्यांत लौकिकी छंद
भर प्रेमा, भरिशी–भरुं दे चषक विषानें
टाकितो पिउन, हांसून, आणि तृप्तीनें"

अशी त्यांची वृत्ति आहे. भीती कुणाची, समाजाचीच ना, पण समाजांत त्राण तरी कुठें उरला आहे. व समाजानें आमचें काय केलें आहे, म्हणून आम्ही त्याची पर्वा करावी. या दुर्दम्य उच्छृंखलपणांत कांतांचा खरा जोम व त्यांचा कस पुरेपुर दिसून येतो. त्यांना समाजांतील अन्याय सहन होत नाहींत, व ऐश्वर्यांत लोळणाऱ्याला ते खडसावून विचारतात

— कांत

खेळतां नाच मधुरंग, नभचुंबित रंगमहालीं
कधिं विचार ये कां, हाडें पिचलींत कुणाचीं खालीं
नृपतिनो! पृथ्वि मोलाचे, मुकुटांत जवाहिर जडलें
किति युगानुयुग कोणाचे तें रक्त गोठुन बनलें

'आमुचा दसरा' या कवितेंत त्यांची तळमळ हृदय हलवून सोडते. ते म्हणतात.

पायीं बेडी, तीवर गावें नाचून
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण
दिवस उगवुनी तेज न दिसलें सुमनें फुललींत
ऐसा झाला दसरा आमुचा स्वातंत्र्यावीण

त्यांची मातृभूमीविषयींची तळमळ जन्मठेप या कवितेंत त्यांनीं व्यक्त केली आहे.

आशा वांछा एकच चित्तीं,
मित्रांना शत्रुंना विनंती
मातृभूमिची मुठभर माती
मरता पदरीं घ्या बांधोनी!
आई, नमितों श्यामल चरणीं!

ही तळमळ व उत्कटता त्यांनीं आपल्या गोदागीतांत पण व्यक्त केली आहे.

मोद सकल माझा तुझिया लहरिंतुन वाही
होय मृत्तिकेची पाचू तुझ्या जलें बाई
दूर मज कधीं ही कोठें लोटुनी न देई
मरतांही मज निज पदरें झांक तूं दयाळे

तसेंच आपल्या मातृभाषेविषयींची त्यांची निष्ठा रोमांच उत्पन्न करते.

माते तुझ्या गोड दुग्धामृताची

सवे आमुची तोडिल्यापासुनी
तुझ्याच दुग्धावरी मायभाये!
अम्ही वाढलों पोसलों आननीं

इतकें म्हणून ते म्हणतात, या भक्तींत जरी आम्हाला मरण आलें तरी,

गातील गाणीं अमुचीं कबरें
मराठी खुल्या माळरानावरी

उत्कटता व आत्यंतिकता हें कांतांच्या कवितांचें वैशिष्ट्य आहे. त्यांची उत्कटता ही दीपशिखेवर झेप घेणाऱ्या पतंगाची आहे. तिला आपल्या नुकसानाची व दाहकपणांत जळून खाक होण्याची पर्वा नाहीं. माझ्या आयुष्याचें कांहीं होवो, त्यांतून संगीत निघत असलें तर आयुष्य मातीमोल झालें तरी पर्वा नाहीं, यांतच सार्थक आहे अशी त्यांची विचार सरणी आहे. प्राचीन भारतांत आपलीं हाडें देऊन इंद्राला वज्र तयार करून देणारा दधीचि त्यांना आदर्श वाटतो, शिबी राजासारखे आपले लचके तोडून आधुनिक ऐश्वर्यवंतांचीं चैन सोयिस्कर करून देणारे आजकालचे मजूर पाहून त्यांना गहिंवर येतो, व आपलें जीवन दग्ध करून साऱ्या जगांत क्रांतीची आग लावणारे आधुनिक त्यागी पुढारी पाहून त्यांना स्फूर्ति होते व त्यांनाहि वाटतें कीं आपण सुद्धां आपल्या त्यागानें जीवन सार्थक करावें, ही विचारसरणी त्यांच्या रोमरोमांत भिनली आहे. 'फटत्कार,' व 'जलतरंग' या कविता मराठी भाषेंत अमर होण्यासारख्या आहेत. ते उन्मत्तपणानें म्हणतात

माझ्या हृदयींच्या आघातें निर्मित
असें हें संगीत आळापीं तूं!
पर्वा न घावांची, मृण्मय प्याल्यांची
माझ्या हृदयाची गीतासाठीं!

तसेंच —

फडफडाट पंखांचे होती,

अंगिं धुंदिच्या लहरी उठती,
निखाऱ्यांत मम पंख करपती
तरिहि फुलावितों गान !
येउन रुतला बाण स्वांती
धुळींत पडतां पडतां अंतीं
एक तान फेकीन तुला ती
खचित करित बेभान, पारध्या सूं सूं सुटल बाण

या अपूर्व उत्कटतेमुळेंच कांतांचें काव्य हें खरोखरच विदग्ध काव्य या नांवाला पात्र ठरलें आहे. त्यांचें जीवन, त्यांचें व्यक्तिमत्व हें म्हणजे एक भडकलेली आगच आहे. कांतांच्या कवितेंत अध्यात्मकता किंवा गूढ गुंजन मुळींच नाहीं. चहूं बांजूंनीं आग पेटली असतां डोळे मिटून आत्म-चिंतन करून ' उपरती वरती मज दे रती ' म्हणणाऱ्या नांदापुरकरांसारखे ते विरागी नाहींत. कांतांना या आत्मचिंतनाचें वावडे आहे व आधुनिक मराठवाड्याला त्यांचा संदेश बंडखोरपणाचा, व जीवघेण्या बेछूटपणाचा आहे. त्यांचीं प्रणयगीतें व निसर्गगीतें हृदयंगम साधलीं आहेत पण त्या कविता म्हणजे वरून राख आंत जळजळीत निखाऱ्यासारखीं वाटतात, ' रंगवूं नको निज पद रमणी ' या मनहारी कवितेंत तरुणीला ते म्हणतात,

सहज मृदुल तव पाउल पडतें
तरुण हृदय त्या तिथें चिरडतें
रक्त तेंच तव पदीं लागतें
हीं कशास मेंदी मग वरुनी
रंगवूं नको निज पद रमणी

त्यांच्या प्रणयपर कविता नितांत मनोहर आहेत. स्त्रीसौंदर्य त्यांच्या

चंचल मनाला क्षणभर भुरळ पाडतें व त्या वर्णनांत ते तितकेंच तल्लीन होऊन जातात. ' गति मोहना ' या कवितेंत,

सलज्जा पौर्णिमा झाली तुझ्या पाहून वदनातें
सुलीला उर्मिळा नेमी शिके अन् वजि नृत्यातें

या शब्दांनीं त्यांनीं सौंदर्याला आळविलें आहे.

तसेंच— ओढ्यामधुनी कळशी भरुनी
घेतांना शिरिं, अंग तोलुनी
ते मीन पाहती तुझ्याकडे

आणि— आरक्ताचि तव गुलाब तळवे
रंग तयांना कशास व्हावे?
रंग उपेमधिं काय भरावे

असें त्यांना वाटतें. त्यांच्या निसर्गवर्णनपर कवितासुद्धां मनाला आल्हाद देतात. ' बाई कलिके ' शारदी सृष्टि, व ' हूड पवन ' या कवितेंत त्यांची प्रतिभा प्रकर्षानें प्रगटली आहे.

संध्या गिरिवर ताराराणी फुगडी फूं ग खेळे
जाइजुईचा गजरा शिरिंचा चंद्रकलेचा ओघळे
हंसगामिनी गंगाबाई, पदर फडकतो वातें
मंद चालता मौक्तिकमाला पदराखालुन रुळतें

किंवा ' बाई कलिके ' या कवितेंत—

कां गाल फुगवुनी अशी बैससी बाई!
आकांत कराया असें जाहलें कायी
ही नयनीं झालीं गरदी कां अश्रूंची
कां हिरे माणकें उगीच उधळायाचीं

— कांत

किंवा 'हूड पवन' या कवितेंत—

विनविती, लता त्या किति
व्रस्थाळच पवन
पदरास झोंबतो तरिहि फूलें दे म्हणुन

या ओळी बालकवींची आठवण करून देतात. कवि कांत यांची शब्दांची घडण मनोहर आहे. त्यांच्या ओळी म्हणजे ताजमहालच. किति मधुर नी किति गेय. गातांना त्यांचा ध्वनीच किती आनंद देतो कानाला.

सांजरंगि जळ निळें तळपतें
रूप तुझें त्यामधें झळकतें
लाट निजसुरीं मृदु पुटपुटत
जणुं ओठ्याला तव स्वप्न पडे

वगैरे ओळी म्हणजे निव्वळ शब्दरचनेनेंच मनाला आनंद होतो.

उपमा, विशेष वापरण्याकडे कवि कांत यांचा कल दिसत नाहीं तरी पण त्यांच्या उपमा समर्पक नि लघु आहेत. उदाहरणार्थ—

मनिंच्या सुखमय आठवणी परि
तव सांचल जल चंचल हें करि

किंवा— सुवा जलद हा बघुन नाचतो कवि सृष्टीचा मोर

पण एकंदरींत उपमा फारच कमी आहेत. त्यांच्या अठ्ठाविस कवितांतून मोजून पांच सात उपमा मला सांपडल्या. याचें कारण त्यांना वर्ण्य वस्तूच्या आविष्करणांत उपमांची जरूर भासत नाहीं इतकें उत्तम ते वर्णन करूं शकतात. या उलट प्रकार नांदापूरकर वगैरे कवींचा आहे,

कांहीं कवितांतून त्यांचा हळुवारपणा मखमालीपेक्षांही मऊ वाटतो. 'आई; तोडुं नको लेकरूं' ही कविता वाचून मला संत कवींच्या 'भरून आलें आभाळ ग, लेकरूं आपुलें संभाळग' ची आठवण झाली. तसेंच

'पहांट तारे'च्या सुरवातीस मराठवाडीच्या साहित्याची प्रभात त्यांनीं वर्णन करतांना कमालीचा जिव्हाळा दाखविला आहे.

तेज दिशांनां चढे न अजुनी, सहस्त्रकर नच नभांत ग
निळ्या डोंगरीं तेज फिकटते परि झुळझुळ ये वहात ग
पहांट तारा डुलत फुलत ये विरल कृष्ण घन तमांत ग
सूर्यदूत पाहुन हांसते रात कौतुकें घनांत ग

कांतांच्या कवितेंत दोष नाहींत असें नाहीं. सर्वांत मोटा दोष म्हटला म्हणजे प्रास जुळविण्याच्या भरांत ऱ्हस्व दीर्घांची त्यांनीं फार ओढाताण केली आहे. अणुरेणुंत, जरि, आलिस, भीशि, कोणाति, भिरीभिरी, तुम्हि ठाऊक, कोटि, हातघाइ. कांतांसारख्या शद्बरचनाकाराला असें करायला नको. दुसरा दोष असा कीं कांतांची काव्यसंपत्ति फार अल्प आहे. जुन्या संतकवींप्रमाणें उदंड कविता प्रसवणें जरी शक्य नसले तरी आधुनिक कवींची दमछाटी इतक्या लवकर कां होतें हें विचारणीय आहे. त्यांचा 'लज्जित खंजीर' प्रसिद्ध होणार म्हणून गाजलें पण पुढें काय झालें कळत नाहीं. पण ते दीर्घ काव्य प्रसिद्ध झालें तर मराठी वाङ्मयांत चांगलीच भर पडेल यांत शंका नाहीं.

मराठवाड्याच्या सद्यःस्थितींत १९३० ते १९४० चें दशक काव्य निर्मितीच्या दृष्टीनें महत्वाचें आहे. या दहा वर्षांत 'पहांट तारा' 'फटकार' 'महाजनांची कविता' 'माझी फुलें,' 'बागशाही' 'जानकी काव्य' 'प्रेमांजलि' 'काव्य कुसुम कलिका' वगैरे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत व इतर होत आहेत व या दशकांत कवि पद्माकर, मनाठकर, कांत, पार्थिव, कृष्णाकुमार, कोरेकल, गाडगीळ, लेले, पाटील, महाजन, फुलारी वगैरेंच्या कुंजनांनीं मराठवाड्याचें साहित्योपवन गजबजून गेलें आहे. जुन्या व नव्या संधिकालावर उभे असलेले कोरेकल, धार्मिक

— कांत

प्रवृत्तीचें रसाळ महाजन, विरागी व अंतर्मुखी नांदापुरकर, फुलापेक्षांहि नाजुक मनाचे गाडगीळ व फुलारी या सर्वांच्या कवितां लोकांसमोर आहेत पण या दहा वर्षांत सगळ्यांत जास्त ठसा काव्याच्या संपत्तीनें नव्हे ( कारण कांत काव्यासंपत्तींत कोरेकलांच्या पासंगालाहि पुरणार नाहींत ) तर उन्मत व दाहक उत्साहानें कांत यांनीं उमटविला आहे. नव्या मराठवाड्याचे बंडखोर कवि ते आहेत. भविष्याची तमा न बाळगतां, आपल्या ध्येयाकरितां उत्कटतेनें आत्माहुति तयार करण्यास ते प्रवृत्त आहेत. अध्यात्माचें गूढ गुंजनाचें, शून्य संशोधनाचें व त्यांचें प्रेम अहिनकुलवत् आहे. त्यांना वर्तमानकाळ दिसतो व भूत काळांतले दधीचि, शिबि, उपमन्यू वगैरे महात्मे दिसतात. ध्येयाकारितां जळून खाक होण्यांत त्यांना तमा वाटत नाहीं. कठिण काळांतून जात असलेल्या व संघर्षांत सांपडलेल्या मराठवाड्याला त्यांचा हाच संदेश आहे.

‘ फडफडाट पंखांचे होती
अंगीं तेजोलहरी भिनती
निखाऱ्यांत मम पं[illegible] कुसुमती
तरि हि फुलावि[illegible] गानि

५८५५
REFBK-0005855

## विक्रीस तयार.

---

अलम् महाराष्ट्रास सर्वांगसुंदर लिखाणाची
पैदास करणारे म्हणून परिचित असलेले
निजाम महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध साहित्यिक

**कृष्णाकुमार एम्. ए.**

यांच्या

● ज्वलंत लेखणींतून उतरलेला
लघुकथा संग्रह ●

# ' उषा '

● क्राऊन साईज, ॲंटिक् पेपर,
दीडशेंच्यावर पृष्ठसंख्या मजबूत व
सुंदर बांधणी ●

कि.] विक्रीस तयार आहे. [रु. १॥

---

पत्ता :— गोदावरी प्रेस
चौक-बाजार नांदेड.